# <u>मिरा भाईंदर महानगरपालिका</u>

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा. महासभा दि. १८/०२/२०२६**

बुधवार दि. १८/०२/२०२६ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०२ दि. १०/०२/२०२६ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय  करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**<u>उपस्थित सदस्य</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | मेहता डिंपल विनोद | महापौर |
| २) | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | उपमहापौर |
| ३) | गेहलोत हसमुख मोहनलाल | सदस्य, गटनेता |
| ४) | शर्मा मानशी रमेश | सदस्या |
| ५) | ॲड. श्रध्दा संदिप कदम | सदस्या |
| ६) | तिवारी अशोक सुर्यदेव | सदस्य |
| ७) | पंकज पांडेय (दरोगा) | सदस्य |
| ८) | मयेकर रजनीकांत पांडुरंग | सदस्य |
| ९) | गोहील शानू जोरावरसींग | सदस्या |
| १०) | दत्ता जया रथीन | सदस्या |
| ११) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| १२) | दिव्या प्रसाद परब | सदस्या |
| १३) | योगिता सतीप्रसाद शर्मा | सदस्या |
| १४) | गणेश गोपाळ शेट्टी | सदस्य |
| १५) | तरुण सुभाष शर्मा | सदस्य |
| १६) | स्मिता विशाल पाटील | सदस्या |
| १७) | प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| १८) | गुप्ता कुसुम संतोष | सदस्या |
| १९) | पुरोहीत मधुसूदन मनोहरलाल | सदस्य |
| २०) | वंदना मंगेश पाटील | सदस्या |
| २१) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| २२) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| २३) | मेबल नोएल कोरीया | सदस्या |
| २४) | जैन सुनिता रमेश | सदस्या |
| २५) | परेश जयंतीलाल  शाह | सदस्य |
| २६) | कोठारी भरतकुमार नथमलजी | सदस्य |
| २७) | डॉ. भव्या पिपलिया (शाह) | सदस्या |
| २८) | आभा अमेय पाटील | सदस्या |
| २९) | ॲड. रवि व्यास | सदस्य |
| ३०) | किमया सुहास रकवी | सदस्या |
| ३१) | कोमल विठ्ठल नावन्धर | सदस्या |
| ३२) | भगवती तुगनचंद शर्मा | सदस्य |
| ३३) | सुरेश खंडेलवाल | सदस्य |
| ३४) | सुनिल चंपालाल चौधरी | सदस्य |
| ३५) | रिजवाना अनवर खान | सदस्या |
| ३६) | सना खलील देशमुख | सदस्या |
| ३७) | जय राजेंद्र ठाकूर | सदस्य, गटनेता |

| | | |
|---|---|---|
| ३८) | महेश नरेश म्हात्रे | सदस्य |
| ३९) | विरकर आकांक्षा शंकर | सदस्या |
| ४०) | सावंत दिपक कल्याणराव | सदस्य |
| ४१) | करुणा किशोर पाटील | सदस्या |
| ४२) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| ४३) | डोंगरे सचिन सुरेश | सदस्य |
| ४४) | विशाल जगन्नाथ पाटील | सदस्य |
| ४५) | लक्ष्मण गणपत जंगम | सदस्य |
| ४६) | स्नेहा शैलेश पांडे | सदस्या |
| ४७) | रुपाली शिंदे मोदी | सदस्या |
| ४८) | वैती विजया हेमचंद्र | सदस्या |
| ४९) | जैन प्रिती चंद्रकांत | सदस्या |
| ५०) | थेराडे संजय अनंत | सदस्य |
| ५१) | ज्योत्सना जालींदर हसनाळे | सदस्या |
| ५२) | पारधी तुषार यशवंत | सदस्य |
| ५३) | यशोदा अनिल ताटे | सदस्या |
| ५४) | भोसले अनिल बाबुराव | सदस्य |
| ५५) | मोहन गोपाळ म्हात्रे | सदस्य |
| ५६) | सुरेखा प्रकाश सोनार | सदस्या |
| ५७) | मनस्वी प्रमोद पाटील | सदस्या |
| ५८) | मनिष प्रितम पराशर | सदस्य |
| ५९) | अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ६०) | जाट प्रतिभा चंदु | सदस्या |
| ६१) | भावसार वंदना संजय | सदस्या |
| ६२) | नवीन गुप्तेश्वर सिंह | सदस्य |
| ६३) | आनंद दत्ताराम मांजरेकर | सदस्य |
| ६४) | अरोरा दिपीका पंकज | सदस्या |
| ६५) | बेलानी हेमा राजेश | सदस्या |
| ६६) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ६७) | निर्मला बाबुराव सावळे | सदस्या |
| ६८) | ॲड. मयुरी सचिन म्हात्रे | सदस्या |
| ६९) | नीला सोन्स | सदस्या |
| ७०) | विवेक महेंद्र उपाध्याय | सदस्य |
| ७१) | तारेन वेंचर मेंडोन्सा | सदस्य |
| ७२) | शेख रुबिना फिरोज | सदस्या |
| ७३) | आयरिन पॉल कॉड्रस | सदस्या |
| ७४) | अनिल दिवाकर सावंत | सदस्य |
| ७५) | परमार हेतल रतीलाल | सदस्या |
| ७६) | भट दिप्ती शेखर | सदस्या |
| ७७) | संजय बाळाजी पवार | सदस्य |
| ७८) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ७९) | कांबळी श्रध्दा सुधीर | सदस्या |
| ८०) | सिमा कमलेश शाह | सदस्या |
| ८१) | दुबे मनोज रामनारायण | सदस्य |
| ८२) | अनिल रवजीभाई विराणी | सदस्य |
| ८३) | रफिक गुलाब पठाण | सदस्य |
| ८४) | आफरीन मुझफ्फर हुसेन सय्यद | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ८५) | रुबिना फैजूल्ला शेख | सदस्या |
| ८६) | अशरफ अहमद मिस्त्री | सदस्य |
| ८७) | नयना गजानन म्हात्रे | सदस्या |
| ८८) | भानुशाली वर्षा गिरधर | सदस्या |
| ८९) | संजय वसंत थरथरे | सदस्य |
| ९०) | भोईर जयेश वत्सला भानुदास | सदस्य |
| ९१) | शॉन लिओ कोलासो | सदस्य |
| ९२) | बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| ९३) | डिमेलो फ्रिडा बर्नड | सदस्या |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १) | प्रियंका करणीदान चारण | सदस्या |
| २) | त्रिपाठी कविता सुशील | सदस्या |

**रजेचा अर्ज – निरंक**

**मा. महापौर :-**

सर्व सदस्यांनी आपले स्थान ग्रहण करावे. सर्व सदस्यांना माझी विनंती राहणार आपआपल्या जागेवर बसून घ्यावे. अनिलजी मेरी आपको विनंती रहेगी आपके गटनेता और सभी सदस्यो से विनती है सन्माननिय स्थान आपको दिया हूवा है उसपे आप बैठतेही सभा हम आगे लेके जायेंगे।

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम मेरी आपसे और आयुक्त साहब से हाथ जोडके विनती रहेगी जो सिलसीला चला आ रहा है वह इतिहास है विरोधी पक्ष एक बाजूमे सत्ताधारी एक बाजूमे हम लोग साथ नही बैठेंगे तीन लाईन आपने दिया है हम १६ नगर सेवक है हमे तीन लाईन देदो अगली महासभा में आप सिटींग अरेंजमेंट चेंज करावो या अब करो १६ नगर सेवक विरोधी पक्ष के बाकी सत्ताधारी ७९ नगर सेवक।

**मा. महापौर :-**

अभी प्रोटोकॉल के हिसाब सेही जोभी यहा पे ७९ नगर सेवक है, वह प्रोटोकॉल के हिसाब सेही यहाँ पे सब बैठे है किसी भी प्रोटोकॉल का यहा पे उल्लंघन नही किया हूवा है आपके यहापे भी आपका प्रोटोकॉल का उल्लंघन हूवा नही है यहापे सभी का सन्मान किया हूवा है। आप सभी को विनती है की प्लिज अपना स्थान ग्रहण करीये।

**अनिल सावंत :-**

मॅडम, हमारा विरोधीपक्ष का प्रोटोकॉल और सिनॅरीटी आप लोक डिसाईड नही कर सकते हों। हमारे मे सपोझ पहिली बार आफरीन चुन के आई है हमारी नेताजीकी वह बेटी है।

**हसमुख गेहलोत :-**

महापौर मॅडम, मुझे आज सुन के बहूत खेद हो रहा है और जो वरीष्ठ हमारे सावंत साहब कह रहे है की हमारी नेता की लडकी है क्या यह घर है व्यवसाय है? और विषय क्या है, सावंत साहब बोल रहे है की आज बैठने दिजीये अगली बार जैसा बोलोगे वैसा कर लेंगे तो आज वैसा सुधार क्यो नही कर सकते सावंत साहब ? सावंत साहब मे आपसे और नवनिर्वाचीत जितनेभी नगर सेवक है उनसे विनती करता हूँ कृपया कर के महापौर मॅडम जो कह रही है जो संबोधीत कर रही है कृपया उसको सुन लिया जाये। आपकी बात का मान रखा जायेगा आपकी बात का सन्मान रखा जायेगा उसके पहले कोईभी बिचमे अळथळा निर्माण ना करे यह हाथ जोड के विनती है।

**जय ठाकूर :-**

महापौर मॅडम, मेरा यह कहना है की, आपने हर एक नियुक्त सदस्यका नाम लगाया हूवा है वह कोन से प्रोटोकॉल के है नाम लगाया और आपने वह कैसे निर्धारीत किया की वह उसकी सिट है और वह उसी सीट पे बैठेगा। जैसा बैठने का हसमुखजीने कहा की किसीका पारिवारीक सीट है उनकी सीट निर्धारीत नही होती वैसे मे आप लोगोसेभी कहूँगा की किसी किभी सीट आप नही निर्धारीत नही कर सकते की कोन नेम कहा बैठेगा, अगर आप प्रोटोकॉलकी बात करते हो तो यह कोनसे प्रोटोकॉल के तहेत आपने हर व्यक्तीका सीट पे वहापे नाम लगाया यह प्रोटोकॉल का आप मुझे बताईये।

**हसमुख गेहलोत :-**

महापौर मॅडम, आपल्या माध्यमातून सर्व नगर सेवकांना मनापासुन विनंती करतो शुरुवात के शुभ काम को शुरुवात करले फिर जो सावंत साहब बात कर रहे है और हमारे नवनिर्वाचित जय ठाकूरजी बात कर रहे है उस विषय

पे हम बादमे बात करेंगे पहिला महापौर यांचे भाषन किंवा त्यांचे वक्तव्य आहे ते प्रत्येकाने ऐकून घ्यावे ही हाथ जोडून विनंती आहे.

**अनिल सावंत :-**

आम्ही खाली बसून ऐकून घेणार, आपण महासभा चालवा आम्ही जिथे बसलो आहेत तिथे बसवा तुम्हाला जर शक्य असेल तर एका माईकची इथे व्यवस्था करा।

**मा. महापौर :-**

आपल्या सर्वांची व्यक्तीगत माईकची व्यवस्था इकडे आहे तुम्ही जाणून बूजून कशा साठी हे करत आहात ?

**अनिल सावंत :-**

आमचा हा अपमान आहे.

**मा. महापौर :-**

तुमचा कोणाचाही अपमान ह्या महासभेत होणार नाही असे झाले पण नाही आणि ह्यापुढे होणार पण नाही. तुमचा मान सन्मान आहे तुमची चेअर आहे माईक आहे तुम्ही तुमच्या सीट वर बसून सर्व कारभार आपल्याला करायचे आहे.

**अनिल सावंत :-**

आपण कारभार करुना आम्ही खाली बसतो त्यात काय वाईट आहे ? फक्त शक्य होत असेल तर इथे एक माईक द्या नाही दिला तरी चालेल.

**शर्मिला बगाजी :-**

मॅडम, आपण बोलले की हे प्रोटोकॉल प्रमाणे आहे पण आमच्या चेअर आहेत त्यात गॅप तर ठेवा.

**मा. महापौर :-**

सर्व व्यवस्थित पणे केलेले आहे. सर्वांचा मान सन्मान इकडे ठेवलेला आहे. सर्व प्रोटोकॉल प्रमाणे इकडे बसायची सोय केलेली आहे. आपल्या सर्व सदस्यांना माझी विंनती राहणार आहे परत एकदा की तुम्ही सर्व तुमच्या चेअर वर बसून जा.

**मा. उपमहापौर :-**

महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलतो सावंत साहब और गटनेते जय ठाकूरजी इथे महासभेचे कामकाज चांगले चालले पाहिजे मान सन्मान सगळ्यांना दिला पाहिजे ह्या सभागृहाचे पावित्र्य राखले गेले पाहिजे त्याप्रमाणे आजची पहिली सभा आहे जसे की हसमुख गेहलोतजीने सांगितलं की सुरुवात करुया आणि मग तुमचे जे काही ऑब्जेक्शन असतील त्याच्यावर डिस्कस करुया आणि दुसरी गोष्ट अनिलजी ह्या सभागृहात ९५ नगरसेवकांची संख्या आहे त्याप्रमाणे त्यांना ती बसायची आसन व्यवस्था आहे ती आपण सलग राईट टू लेफ्ट प्रोटोकॉलनुसार केलेली आहे तुम्ही जे बोलले प्रोटोकॉल नाही याच्यात सिनॅरीटी असते राईट पासुन ते लेफ्ट पर्यंत जे सदस्य ५ टर्मचे आहेत ४ टर्मचे आहेत ३ टर्मचे आहेत २ टर्मचे आहत जे नविन आहेत सगळ्यांना त्याहिशेबाने आम्ही स्थान दिलेले आहे आणि ७९ आहेत त्याच्या नंतर आपले कॉंग्रेस पक्षाचे सलग जे आहेत १६ सीट ते आपण तिथे ठेवलेले आहेत. आणि दुसरी गोष्ट तुम्ही जे बोललात त्याप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिकेची अधिसूचना आहे त्यात लिहीलेले आहे की पालिका सदस्यांची आसने महापौर नेमील अशा क्रमाणे पालिका सदस्य महानगरपालिकेच्या सभेत आपल्या आसनावर बसतील म्हणजे पुर्नता जो अधिकार आहे हा महापौरांचा आहे ते जे बोलतील त्याप्रमाणे आपले सगळे बसले पाहिजेत आणि तुम्हाला तो मान सन्मान दिलेले आहे तुम्ही गटनेते आहेत म्हणून तुम्हाला लेफ्ट कडून पहिली सीट दिलेली आहे. आमचे जे पक्षाचे नेते आहेत मदनसिंगजी सीनियर आहेत ५ टर्मचे त्यांना पण आम्ही तिथे स्थान दिले आहे त्याच्या नंतर तुमच्या बाजूला आम्ही तुम्हाला स्थान दिलेले आहे अनिल सावंत आहेत त्यांचे पण ३ टर्म आहेत म्हणजे प्रत्येकांचे आम्ही सिनॅरीटी व्हाईज त्यांना आपण स्थान दिलेले आहे. आणि हे सभागृह आहे याच्यामध्ये जस अनिलजी बोललेत की आमच्या पक्षांच्या नेत्यांची कन्या आहेत तर आम्ही पण त्यांना मान देतोय परंतु हे सभागृह आहे ह्या सभागृमध्ये सिनॅरीटी जी आहे किंवा जे काही आहे तो प्रोटोकॉल प्रमाणे त्यांना ते बसावे लागेल त्यामध्ये तुम्हाला असे वाटले की माझी खुर्ची त्यांना द्यावी तर तुम्ही देवू शकतात आणि तुम्ही पुढे बसवू शकात हा तुमचा अधिकार आहे.

**सना देशमुख :-**

महापौर मॅडमला अधिकार आहेत जागा द्यायचं पण तो डिस्क्रीमिनेटरी होता कामा नये. विरोधी पक्ष समजून त्यांच्या संख्याबळ प्रमाणे त्यांना रिकगनेशन मिळायला पाहिजे.

**मा. उपमहापौर :-**

शंभर टक्के तुम्हाला ते स्थान दिलेले आहे. तुम्हाला सगळ्यात चांगले स्थान दिलेले आहे तुम्हाला फ्रंट सिट दिलेली आहे, फ्रंट रो दिलेला आहे, सेकेंड रो दिलेला आहे. आमचे सुध्दा नगरसेवक फ्रंट पासून ते लास्ट पर्यंत बसलेले आहेत. तुम्हाला सुध्दा विनंती आहे ज्या प्रमाणे मँडेट दिले आहे मिरा भाईंदरच्या जनतेने की सगळ्यांना ७८ निवडून दिलेले आहेत त्याप्रमाणे आम्ही पण तुम्हाला मान देतोय. आम्ही पण तुम्हाला फस्ट टू लास्ट आमचे पण सदस्य फस्ट टू लास्ट बसलेले आहेत आपल्याला पण विनंती आहे फस्ट टू लास्ट बसावे.

**हसमुख गेहलोत :-**

महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलतो नेहमी त्यांची अडचण असते त्यांचे नेते नेहमी बोलतात की आम्ही कायद्याच्या हिशेबाने चालू आता आमचे उपमहापौर साहेब त्यांनी असे वक्तव्य केले आणि त्या वक्तव्यामध्ये त्यांनी सुचना पण मांडली आणि नियम पण दाखवले. महापौर मॅडम मला बघायचे आहे की नियमाच्या हिशेबाने त्यांचे जे नेते बोलत आहेत काही तरी पुस्तक दाखवतात आणि ते बोलतात आम्ही नियमाच्या हिशेबाने चालू आता फक्त नियम दाखवले आहेत. महापौरांचा अधिकार आहे आणि ते बोलत आहेत राईट ऑफ व्हॅल्यूऐशन रिक्वेलिटी व्हॅल्युऐशन विषय कुठला चालू आहे कुठला विषय घेतात महापौर मॅडम? इतनी अच्छी तरीकेसे जानकारी देने के बावजूद भी अगर वो नियम को नही मानते जो नियम बनाये है उसको नही मानते मतलब यह अपमान किसका कर रहे है? सभागृह का अपमान कर रहे है तो हाथ जोड के विनती है फिर से एकबार कह रहा हूँ सभी से कृपया कर के नियमो को मानिये आपना मान सन्मान हमारे हाथ मे है। मेरे डॅडी हमेशा कहा करते थे हमारा मान सन्मान हमारे हाथ मे किसी और के हाथ मे नही है।

**मा. महापौर :-**

ह्या ठिकाणी परवानगी घेऊन बोलायचे.

**जय ठाकूर :-**

महापौर के परवानगी से बोल रहा हूँ, मे नियम किही बात कर रहा हूँ जैसे इन्होने कहा आप सिनियर और जुनियर को ऐसा कर के आपने बिठाया मान लिजीए किसी पार्टी मे किसी सभा मे कोई व्यक्ती २० साल का है और वह प्रमुख पद पे है तो वह कहा बैठेगा ? वह आगेही बैठेगा तो आपने मे मेरा नही बोल रहा हूँ आप सब नियम की बात कर रहे हो तो मुझे वो नियम बताईये जो आपने नेम प्लेट लगाया वह नेम प्लेट आपने किस नियम के तहत लगाया वहा आपने नियम फॉलो क्यो नही किया अगर आपने सीट अदा की तो आपने नेम लगाते वक्त नियम फॉलो क्यो नही किया वो नियम दिखाईये आप नियम की बात कर रहे है।

**मा. महापौर :-**

स्पेसिफीक आप कोन से नाम पे बोल रहे है आप बोलीए ?

**जय ठाकूर :-**

सभी का नाम ले रहा हूँ।

**मा. महापौर :-**

सभी का नाम प्रोटोकॉल के हिसाब से बराबर लिखा हूवा है।

**जय ठाकूर :-**

हमारे उपमहापौर साहब नियम की बात कर रहे है आप महापौर मॅडम प्रोटोकॉल की बात कर रही है तो मुझे लगता है नियम जादा महत्वपुर्ण होता है।

**मा. महापौर :-**

तो नियम सेही किया है पुरा नियम सेही किया है गटनेताजी। आपका भी सन्मान है आप गटनेता हो इसीलिये आपका लगाया हूवा है।

**जय ठाकूर :-**

बताईये कोन से नियम मे नेम प्लेट लगाने का नियम है ?

**मा. महापौर :-**

यह तो कच्चा लगाया है इसके बाद तो पेसिफीक नेम प्लेट हम लोग अच्छेसे लगाने वाले है।

**हसमुख गेहलोत :-**

महापौर मॅडम आपल्या परवानगीने, ठाकूरजी हमारे उपमहापौर ध्रुवकिशोर पाटीलजीने नियम भी बताये साल भी बताया और ॲक्ट (२८) २००२ के अंदर जो पास हूवा व ॲक्ट २८ के तहेत आपके नेता सावंत साहब भी पढ रहे है। उनको पढने दिजीए और वह ध्यान से पढ लिजीए खाली चिल्लाना है खाली बेहेस करनी है खाली हाऊस को

डिस्टर्ब करना है यह अगर आपकी मनशा है तो यह एकदम गलत है। पब्लिक देख रही है पत्रकार भी देख रहे है सभी सुन रहे है कृपया करके दिशाभूल ना करे।

(सभागृहात गोंधळ)

**दिपीका अरोरा :-**

महापौर मॅडम, सभाशास्त्र के हिसाब से इनको स्टडी कर के आने को बोलीये की महापौर का सभागृह मे महापौर जो है वो अंतीम निर्णय लेती है, और उन्होने एक नियोजन किया है जो सभी को फॉलो करना अनिवार्य है। तो सभाशास्त्र सिख के आईये फिर बात किजीए।

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलतो, आपण ह्या ठिकाणी आल्यापासून ह्या सभागृहाचा वेळ वाया जात आहे ही काय सभ्यता नाही. महापौर मॅडम सभागृहामध्ये अशा प्रकारे बसणे आणि महापौर मॅडम हा सर्वस्वी आपला तुमचा अधिकार आहे. आणि तुम्ही सांगुन सुध्दा उपमहापौरांनी दोन वेळा रिक्वेस्ट करुन सुध्दा गट प्रमुखांनी ह्या ठिकाणी आमच्या गटप्रमुखांनी पण दोन चार वेळा ह्या ठिकाणी हात जोडून त्यांना विनंती केली तेव्हा पण हे ऐकत नसतील तर कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करत असतील तर महापौर मॅडम ही सभ्यता सभागृहाची नाही. आपण याच्या अगोदर बऱ्याच वेळा ह्या सभागृहाचं लक्ष वेधले आहे परंतु ही सभागृहाची सभ्यता नाही. ह्यांना जर बसायचे नसेल तर ह्या सभागृहाच्या बाहेर जावू शकतात. महापौर मॅडम हे फक्त सभागृह नाही याच्यात ज्वलंत प्रश्न ह्या मिरा भाईंदर शहराचे ह्या साठी ही सभा लावलेली आहे. महापौर मॅडम, आपला ११ वाजेचा टाईम आहे आता ११.४५ होत आलेले आहेत आपण सभेला सुरुवात करावी अशी मी आपणास विनंती करतो.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम, मैने पहिले भी बोला है .................

**मा. महापौर :-**

आपको मेने प्रोटोकॉल के हिसाब से बैठने के लिये कहा सब कुछ व्यवस्थित प्रोटोकॉल के हिसाब से ही मेने किया है अब आप बोल सकते है।

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम, तुमच्या परवानगीने बोलतो एक गोष्ट लक्षात घ्या विरोधी पक्षा कडून तुमचा अपमान किंवा उपमहापौरांचा अपमान होणार नाही याची खात्री बाळगा. आमच्या सदस्याच्या पायाला दुखत होतं म्हणून तो बसला असेल हरकत नाही त्याच्या बद्दल मी माफी मागतो. आता उपमहापौरांनी एक कानून वाचून दाखवला कायदा वाचून दाखवला सचिव साहेब माझा तुम्हाला प्रश्न आहे हा कायदा आहे का? सचिव साहेबांनीच उत्तर द्यायचे आहे हो किंवा नाही एवढेच सांगा.

**हसमुख गेहलोत :-**

महापौर मॅडम आपल्या परवानगीने, कायदा ते वाचतात नियमावली त्यांच्या हातात दिलेली आहे त्यांच्यावर ते प्रश्न उभे करतात पहिला मला ह्यांना प्रश्न करायचा आहे की हे नियमावली मानतात की नाही पहिला हे सांगाव.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम, हा रुल नाही महाराष्ट्र प्रांतिक अधिनियमामध्ये कुठेही याची नोंद नाही ही आहे. उपविधी अशा जवळ जवळ १० ते १२ उपविधी आपण राज्य शासनाला पाठविलेल्या आहेत. उपविधी प्रमाणे कामकाज चालावं ह्या सभाशास्त्राचा नियम आहे. आणि ही उपविधी राज्य शासन ॲप्रुव्ह करतं. २००२ मध्ये बनलेली ही उपविधी अजून पर्यंत ॲप्रुव्ह झालेली नाही. त्यामुळे हा कायदा होऊच शकत नाही. महापौरांना याच्यामध्ये अधिकार दिलेले आहेत ते महापालिकेने दिलेले आहेत. याच्यामध्ये कुठे राज्य सरकार लिहीलेले नाही. मिरा भाईंदर महानगरपालिका अधिसुचना ज्याला राज्य शासनाचं ॲप्रुव्हल लागतं आणि त्यामुळे हा कायदा नाही ही उपविधी आहे जी अजुन ॲप्रुव्ह झालेली नाही. सभेचे कामकाज चालाव ही आमची सुध्दा प्रामाणिक इच्छा आहे तुमचा कुठेही अपमान होणार नाही आपण उच्च डायसवर बसलेले आहात आम्ही खाली बसून सभा चालवू आपण कामकाज करुन घेऊ.

**मा. महापौर :-**

माझी परत एकदा विनंती राहणार सर्व सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसून जावे तुम्हाला सर्वांचा उचित स्थान दिलेले आहे.

**भगवती शर्मा :-**

सावंतजी आप इतने सिनियर नेता है, मै बरसो से आपके साथ इसी सदन मे देखा हूँ इसीको आप लेहरा लेहरा के कई बार बोले है की यह नियम है इसी को लेकर के आपने इस सभा के अंदर मे कई निर्णय लिये है। अतिथ को ध्यान मे रखीये आज आपको सुविधा अच्छी नही लग रही है इसको अभी मंजुरी नही मिली तो यह एक सरासर

गलत है, रही बात यह आपके गटनेता ने बोला की क्रम उसमे निकाला है महापौर नेमील अशा क्रमाने यह आपका अधिकार है। क्रम का भी यह कोई बोल नही सकता रही बात इनको अपनी सीटे आगे पिछे करनी है तो यह कर सकते है इस लिये महापौर मॅडम आपसे निवेदन है नियम के हिसाब से इस सभा का कामकाज आप चला रही है आगे की कार्यवाही सुरु करें।

**मा. महापौर :-**

सचिव महोदय सभेला सुरुवात करावी.

**महापालिका सचिव :-**

मा. महापौरांच्या परवानगीने, मिरा भाईंदर महानगपालिकेची मा. महासभा बुधवार दि. १८/०२/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०२ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.

**मा. महापौर :-**

सभेला सुरुवात करायच्या अगोदर मला सर्वांचे एक अभिनंदन करायचे आहे. सर्वप्रथम सर्वांना नमष्कार महाराष्ट्रचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वंदन करुन मी आजच्या सभेसाठी उपस्थित असलेल्या सर्वांचे मना पासुन स्वागत करते. मिरा भाईंदर महानगरपालिकेचे प्रथम नागरीक म्हणून मला पुन्हा एकदा महापौर पदावर सेवा करण्याची संधी दिल्या बद्दल मी देशाचे यशस्वी प्रधानमंत्री आदरणीय नरेंद्र मोदी साहेब, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री आदरणीय देवेंद्र फडणवीस साहेब, भारतीय जनता पार्टीचे प्रदेश अध्यक्ष आदरणीय श्री. रविंद्रजी चव्हाण साहेब, ह्या शहराचे लोकप्रिय आमदार आदरणीय नरेंद्रजी मेहता साहेब, जिल्हा अध्यक्ष आदरणीय दिलीप जैन साहेब यांचे मी मना पासून आभारी आहे. विशेष करुन माझा मिरा भाईंदर शहराच्या जनतेने जो विश्वास माझ्यावर आणि आमच्या पक्षावर दाखवला आहे त्याबद्दल मी जनतेचे आभार मानते. तसेच आजच्या ह्या सभेत उपस्थित सन्मा. उपमहापौर ध्रुवकिशोर पाटील साहेब, आयुक्त, राधाबिनोद शर्मा साहेब सर्व नवनिर्वाचीत नगरसेवक, नगरसेविका यांचे मी स्वागत आणि अभिनंदन करत आहे. त्याच प्रमाणे ह्या सभेसाठी उपस्थित असलेले सर्व नागरीक पत्रकार बांधव आणि महानगरपालिकेचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांचेही मी मना पासून स्वागत करीत आहे. माझा महापौर पदाचा ह्या कार्यकाळामध्ये मिरा भाईंदर शहरातील सर्व समाजातील नागरीकांना आणि सर्व पक्षांना सोबत घेऊन शहराचा सर्वांगीन विकासासाठी मी सदैव कटीबध्द राहील. शहराच्या प्रगतीसाठी मला आपले सर्वांचे बहूमोल सहकार्य आणि मार्गदर्शन लाभेल अशी मी आशा बाळगते. त्याच प्रमाणे आजची ही सभा अत्यंत शांततेने आणि चांगल्या वातावरणात पार पाडावी असे मी सर्वांना आवाहन करते. परत एकदा मी सर्व सदस्यांना विनंती करत आहे आपल्या सर्वांनी आपले स्थान ग्रहण करावे आपली पहिली महासभा आहे आपण खेळीमेळीच्या वातावरणात आपल्याला सभा पार पाडायची आहे आपले जे सदस्य आहेत त्यांना परत एकदा मी विंनती करते की सर्वांनी आपले स्थान ग्रहण करावे. धंन्यवाद जय हिंद जय महाराष्ट्र.

**मा. आयुक्त :-**

सर्वांना नमस्कार, महापौरांच्या परवानगीने एक दोन शब्द बोलतो अनिलजी आज पहिली महासभा आहे आमची विनंती आहे की तुम्ही खुर्चीवर बसा जो प्रोटोकॉल आहे ॲक्चुअलमध्ये महासभेचे प्रिसायडींग ऑफिसर महापौरच आहेत म्हणजे प्रिसायडींग ऑफिसर इज मेअर त्यामुळे आपण जी सिटींग अरेजमेंट केलेली आहे त्याचे पण ही महासभा झाल्या नंतर एक कॉंफरंस रुमध्ये बसून चर्चा करु की कशी सिटींग अरेजमेंट करायची, कशी केली नाही केली म्हणजे आपण नंतर चर्चा करु. पण आता पहिली महासभेमध्ये खाली बसून विषय घेणे आम्हाला चांगले वाटत नाही. तर आमची विनंती आहे सर्वांनी बसून घ्या आपण नंतर एक वेळेस पुन्हा चर्चा करु की कशी सिटींग अरेजमेंट करायची..................

**ज्योत्सना हसनाळे :-**

आयुक्त साहेब, महापौरांच्या परवानगीने बोलते आता तुम्ही सांगता की परत चेंज करायचे एकदा ठरवा की कोणी कुठे बसायचे.

**मा. आयुक्त :-**

मी चेंज करायचे सांगत नाही नंतर चर्चा करु असे सांगत आहे.

**ज्योत्सना हसनाळे :-**

चर्चा करा पण चेंज करु नका तुम्हाला जेवढी चर्चा करायची असेल तुम्ही करु शकता पण आता सिटींग अरेंजमेंट तुम्ही जी केलेली आहे तीच ठेवा नाही तर मग ह्या खुर्ची वरुन मला जर दुसऱ्या खुर्चीवर टाकल तर मी खाली बसेल. सर्व सदस्यांनी ते ॲक्सेप्ट केलेले आहे आपआपल्या खुर्चीवर बसायचं मला वाटते सन्मा. सावंत साहेब

आपण सुध्दा ह्या खुर्चीवर आसन ग्रहण करावे कारण हा महापौरांचा अधिकार आहे. त्यामुळे आपण महासभेमध्ये आपले विषय मांडायला आलो आहोत कुठे बसायचे कुठे नाही बसायचं कुठल्याही खुर्चीवर बसलो तरी आपण विषय मिरा भाईंदर शहराचेच मांडणार आहोत. तर कृपया मला आपल्याला विंनती करायची आहे महापौरांनी आपल्याला तीन वेळा विनंती केली आपण त्यांचा विनंतीचा मान राखून आपल्या स्थानावर बसावं.

**मा. आयुक्त :-**

मी काय सांगतो मेयर प्रिसायडींग ऑफिसर आहेत ते मेयर डिसाईड करणार ते पण मी सांगितलेले आहे. आज पहिली महासभा आहे खुर्चीवर बसून आपण जे विषय घेतले तर व्यवस्थित होईल आम्हाला असे वाटत आहे. आपणाला विनंती आहे थँक्यु.

**शर्मिला बगाजी :-**

महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलत आहे आपण हाच विषय ऑलरेडी आपला एक तास वाया गेला हा जो विषय होता तो तुमच्या मुळे गेला. हा विषय आधीच झाला असता आपल्या महासभेच्या आधीच झाला असता तर एवढा गोंधळ झाला नसता. आम्ही तुमचा मान ठेवून आपले जे कामकाज चालू आहे ते चालवणारच आहोत परंतु आयुक्त साहेबांनी जे वक्तव्य केले ते वक्तव्य आपल्याकडून आलेलं नव्हत म्हणून आणि ते आलं असं तर कदाचित आम्ही हे केलं असतं फक्त आपण बसण्यासाठी आम्हाला सूचना दिली किंवा रिक्वेस्ट केली परंतु जे आयुक्त साहेबांचे वक्तव्य होत की ह्या मिटींग नंतर आपण त्याच्या बद्दल चर्चा करु अस वक्तव्य आलं असत तर चांगल झालं असतं एवढा वेळ गेला नसता.

**मा. महापौर :-**

अशी काही चर्चा होणार नाही आता हे प्रोटोकॉल ते लास्ट पर्यंत असच चालणार आहे.

**अनिल सावंत :-**

सन्मा. व्यासपीठ आयुक्त साहेब तुमचा आदर राखुन आपण कामकाजाला आता सुरुवात करुया तो विषय मागे पडून जाईल आम्ही खाली बसलो काय आणि वरती बसलो काय काही फरक पडत नाही. आम्हाला व्यासपीठाचा पुर्ण आदर आहे. आम्ही त्यांच्या खालीच बसलो आहोत. मी अभिनंदनाचा ठराव मांडत आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित महापौर श्रीमती डिंपल मेहता जी यांचे भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस आणि शिवसेना यांचे मिरा-भाईंदर विकास आघाडीतर्फे मनःपूर्वक अभिनंदन. परत एकदा महापौर बनण्याचा मान आपल्याला मिळाला. यापूर्वी श्रीमती मायराजी मेंडोंसा, श्रीमती गीता जैन, श्रीमती निर्मलाजी सावळे, श्रीमती कॅटलिन परेरा, श्रीमती ज्योत्स्ना हसनाळे यांनी हे पद भूषविले आता परत एकदा आपल्याला प्रथम नागरिक बनण्याचा मान मिळाला आहे हा ईश्वरी संकेत आहे. त्याचा योग्य वापर मिरा-भाईंदर शहराचा विकास करण्यासाठी आपण कराल ही अपेक्षा आहे. आम्ही विरोधी पक्षात असलो तरी विरोधासाठी विरोध अजिबात करणार नाही. परंतु शहराच्या विरोधात एखादा विषय असेल तर त्याला नक्की कडकडून विरोध करू. आजच्या नवनिर्वाचित नगरसेवकांमध्ये बहुतेक नगरसेवक नवीन आहेत त्यांनी निवडणूक काळात बरीचशी आश्वासने लोकांना दिलेली आहेत ती पूर्ण करायला आपण सहकार्य कराल ही अपेक्षा आहे. विरोधी पक्षात आम्ही १६ नगरसेवक आहोत पाच लाख लोकांचे प्रतिनिधित्व आम्ही करत आहोत आमचेही कामे आपण कोणताही भेदभाव न करता कराल ही अपेक्षा आहे. आजची स्त्री अबला नसून ती सशक्त आहे जी कुटुंब सांभाळण्यासोबतच चंद्रयान सारख्या मोहिमा, संरक्षण, शिक्षण, उद्योग, राजकारण यामध्ये आघाडीवर आहे. स्त्री ही आदिशक्तीचे रूप असून तिचा आदर करणे तिचा सन्मान करणे संधी देणे हे समाजाचे कर्तव्य आहे यातून खऱ्या स्त्री शक्तीचा गौरव होतो स्त्री ही केवळ काम करणारी मशीन नाही तर ती प्रेम वात्सल्य दया आणि करुणा यांची मूर्ती आहे. आपण महापौर पदाच्या काळात सर्वांना समान न्याय द्याल अशी इच्छा बाळगून आघाडी परिवारातर्फे आपल्याला परत एकदा शुभेच्छा. आपला कार्यकाल निष्कलंक राहो ही ईश्वरा जवळ प्रार्थना.

**वर्षा भानुशाली :-**

महापौर मॅडम, आपकी परमिशन से जैसे ऐ हमारी भी पहली यह टर्म की महासभा है, वैसे सचिव साहब किभी यह पहली महासभा तो आपको भी हार्दिक शुभकामना और यह महासभा आप पारदर्शकता से पार करेंगे ऐसी अपेक्षा धन्यवाद।

**निर्मला सावळे :-**

तथागत गौतम बुध्द महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज यांना वंदन कोटी कोटी नमन. पहिलीच महासभा ह्या ठिकाणी आपण आयोजित केलेली आहे. एक महिला नेतृत्व आम्हाला ह्या ठिकाणी लाभलेले आहे म्हणून ज्योतीबा फूले आणि सावित्रीबाई फूले यांच्या मार्गावर आम्ही चालणारे सर्व भगिनी महिला त्यांनी ज्ञानाचा प्रकाश दाखवून आम्हाला ह्या ठिकाणी अनुभव आणि समाजाची सेवा करण्यासाठी पाठविलेले आहे.

मिरा भाईंदर शहराने जो आमच्यावर विश्वास दाखवून ह्या शहरामध्ये आम्हाला सहभागी करुन घेतल आणि आमच्या भारतीय जनता पार्टीचे आमचे लोकप्रिय भारत देशाचे पंतप्रधान यांच्या कार्याची प्रचिती घेऊन आम्ही पुढे कार्य करणार आहोत. तसेच आमचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री जो पुर्ण महाराष्ट्राचा विकास करण्यासाठी आपल्या जीवाचंराण करतात असे आम्हाला महाराष्ट्राला लाभलेले मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस तसेच आमचे कार्यसम्राट विकासाचा पेहलू घेऊन चालणारे आदरणीय आमदार नरेंद्र मेहताजी यांच्या मार्गदर्शना खाली आम्ही नवनिर्वाचीत सर्व सभागृहातील सदस्य कार्य करणार आहोत आणि शहराच्या पुर्ण विकासासाठी आमचा हातभार राहणार आहे आपल्यालाही खुप खुप शुभेच्छा आणि नविन निवडून आलेल्या सर्व नगरसेवकांना खुप खुप शुभेच्छा धन्यवाद, जय हिंद जय महाराष्ट्र जय भिम.

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलतो "भारत माताकी जय" महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवरायांना वंदन करुन आजच्या ह्या टर्म च्या पहिलेच महासभेला उपस्थित असलेल्या आमच्या भारतीय जनता पार्टीच्या नवनिर्वाचीत महापौर आदरणीय डिंपलजी मेहता, उपमहापौर ध्रुवकिशोरजी पाटील, भारतीय जनता पार्टीचे गटनेते हसमुखजी गेहलोत आणि ह्या सभागृहामध्ये उपस्थित असलेले सर्व नवनिर्वाचीत सदस्य प्रथम: आपले भारतीय जनता पार्टीच्या वतीने मनपुर्वक हार्दिक अभिनंदन करतो. अभिनंदन करत असताना आता मगाशी आमचे मित्र अनिल सावंत ह्यांनी अभिनंदनाचा ठराव मांडला त्यात त्यांनी म्हटलेले आहे की आम्ही कुठल्याही बाबतीला कशालाही विरोध करणार नाही. तर मला ह्या अभिनंदनाच्या ठरावावर त्यांना परत एकदा कळकळीची विनंती करायची आहे आपण ठरावामध्ये पण म्हटलेले आहे की आपण विरोध करणार नाही आम्हालाही माहिती आहे की आपली सभेला सुरुवात झालेली आहे आपण प्रत्येकाच्या दुसऱ्याच्या माईक वरती न येता आपआपल्या प्रत्येकाच्या टेबला वरती सगळ्यांचे स्वतंत्र माईक दिलेले आहेत त्यामुळे आपण तिकडे जावून आपली भूमिका ह्या ठिकाणी आणि जनतेशी निगडीत असलेल्या प्रश्ना वरती त्याठिकाणी चर्चा करावी अशी मी पुनष्च एकदा आपल्या सर्व सदस्यांना विनंती करतो महापौर मॅडम आणि ह्या शहराने ह्या भारतीय जनता पार्टीला बरच काही दिलेले आहे. ६१ नगरसेवकांवरुन ह्या ठिकाणी ७९ नगर सेवक झालेलो आहोत. महापौर मॅडम, हे फक्त आपले श्रेय नाही तर ह्या ठिकाणी जनताजर्नादनने दिलेले हे प्रेम आहे. आणि म्हणून दोन्ही हात जोडून मी ह्या जनता जनार्दनांचे ह्या ठिकाणी आभार व्यक्त करतो. आणि ह्यापुढे ह्या जनतेने दाखवलेला विश्वासाला ह्या सभागृहात तरी कदापी तडा जावू देणार नाही ह्या जनतेचे प्रश्न ह्या ठिकाणी मग विरोधक असतील किंवा आपण स्व:ताही ह्या ठिकाणी जे जनतेचे प्रश्न असतील ते तात्काळ सोडविण्याचे काम आपण ह्या सभागृहातून करु आणि पुनश्च एकदा इथे आलेल्या सर्व नवनिर्वाचीत सदस्यांच महापौर, उपमहापौरांच भारतीय जनता पक्षाच्या वतीने आणि आपले कार्यसम्राट आमदार आदरणीय नरेंद्रजी मेहता यांच्याही वतीने मी आपले सर्वांचे स्वागत करतो अभिनंदन करतो धंन्यवाद.

**अभिनंदन ठराव क्र. ०१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित महापौर श्रीमती डिंपल मेहता जी यांचे भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस आणि शिवसेना यांचे मिरा-भाईंदर विकास आघाडीतर्फे मन:पूर्वक अभिनंदन. परत एकदा महापौर बनण्याचा मान आपल्याला मिळाला. यापूर्वी श्रीमती मायराजी मेंडोंसा, श्रीमती गीता जैन, श्रीमती निर्मलाजी सावळे, श्रीमती कॅथलिन परेरा, श्रीमती ज्योत्स्ना हसनाळे यांनी हे पद भूषविले आता परत एकदा आपल्याला प्रथम नागरिक बनण्याचा मान मिळाला आहे हा ईश्वरी संकेत आहे. त्याचा योग्य वापर मीरा-भाईंदर शहराचा विकास करण्यासाठी आपण कराल ही अपेक्षा आहे. आम्ही विरोधी पक्षात असलो तरी विरोधासाठी विरोध अजिबात करणार नाही. परंतु शहराच्या विरोधात एखादा विषय असेल तर त्याला नक्की कडकडून विरोध करू. आजच्या नवनिर्वाचित नगरसेवकांमध्ये बहुतेक नगरसेवक नवीन आहेत त्यांनी निवडणूक काळात बरीचशी आश्वासने लोकांना दिलेली आहेत ती पूर्ण करायला आपण सहकार्य कराल ही अपेक्षा आहे. विरोधी पक्षात आम्ही १६ नगरसेवक आहोत पाच लाख लोकांचे प्रतिनिधित्व आम्ही करत आहोत आमचेही कामे आपण कोणताही भेदभाव न करता कराल ही अपेक्षा आहे. आजची स्त्री अबला नसून ती सशक्त आहे जी कुटुंब सांभाळण्यासोबतच चांद्रयान सारख्या मोहिमा संरक्षण शिक्षण उद्योग राजकारण यामध्ये आघाडीवर आहे स्त्री ही आदिशक्तीचे रूप असून तिचा आदर करणे तिचा सन्मान करणे संधी देणे हे समाजाचे कर्तव्य आहे यातून खऱ्या स्त्री शक्तीचा गौरव होतो स्त्री ही केवळ काम करणारी मशीन नाही तर ती प्रेम वात्सल्य दया आणि करुणा यांची मूर्ती आहे. आपण महापौर पदाच्या काळात सर्वांना समान न्याय द्याल अशी इच्छा बाळगून आघाडी परिवारातर्फे आपल्याला परत एकदा शुभेच्छा आपला कार्यकाल निष्कलंक राहो ही ईश्वरा जवळ प्रार्थना.

**सुचक :- श्री. अनिल सावंत** **अनुमोदन :- श्री. जय ठाकुर**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**दिनेश जैन :-**

महापौर मॅडम, हे जे आता खाली बसलेले आहेत प्रोटोकॉल प्रमाणे बसलेले आहेत परंतु आपण ह्यांना मान देतो की तुम्ही खर्ची वरती बसा आपण तसेच बसवलेले आहेत. तुम्ही ह्यांना मान देतात की तूम्ही खुर्ची वरती बसा तुमचा स्व:तचा माईक घ्या आणि विषय मांडा. पण ह्यांना जर महासभा चालू द्यायचीच नाही तर त्याच्यावर आपण काही मार्ग काढू शकत नाही. प्रोटोकॉल के हिसाब से खुर्ची पे बैठो ना।

**अनिल सावंत :-**

मॅडम, हा विषय संपलेला आहे दिनेश जैन सारखे नगर सेवक जर असा अपमान आमचा करणार असतील तर आम्ही वेगळी भूमिका घेऊ. आमचा प्रोटोकॉल काय आहे तो त्यांना दाखवून देवू त्यांना समज द्या. परसनल अटॅक करायचा नाही विषय संपलेला आहे.

**मा. महापौर :-**

आपणाला सर्वांना परत एकदा विनंती आहे सावंत साहेब तुम्ही सर्व आपल्या खुर्चीवर बसावे मी कामकाजाची प्रक्रिया सुरु कतर आहे महासभेच्या कामकाज आता सुरु करावे.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम, तुमच्या मान राखून लंच पर्यंत आम्हाला इथेच बसू द्या नंरत आपण मार्ग काढू.

**शर्मिला बगाजी :-**

महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलते खरच आम्हाला अभिमान आहे की आपण दुसऱ्यांदा महापौर झालात मिरा भाईंदर शहराचा इतिहास आहे की स्त्री शक्तीचा जास्त नारा चालतो आणि खरोखरच मागील आपल्या जेव्हा पासून महानगरपालिका निर्माण झाली तेव्हा पासून जास्तीत जास्त महापौर आपले ह्या महिला आलेल्या आहेत. परत एकदा आपल्याला संधी मिळालेली आहे आणि त्याबदल अभिनंदन आणि खरच इथे पण मेजॉरीटी महिलांचीच आहे तर महिलांचा सन्मान व्हावा ही आपलीही भूमिका आहे सभागृहाने पण तशीच भूमिका मांडली पाहिजे आणि त्याचा मान सन्मान केला पाहिजे. मॅडम आपला अनुभव दांडगा आहे आमच्या बरोबर २०१२ पासून मी तुमच्या बरोबर आहे तेव्हा पासून तुमचा स्वभाव आणि कामाची पध्दत आम्ही बघितलेली आहे तर आपणाला परत एकदा शहराचं प्रथम सदस्य म्हणून आणि महापौर म्हणून आपण निवडलेले आहात आमच्या कडून आमच्या पक्षाकडून आणि पुर्ण मिरा भाईंदर शहर वासियांकडून आपल्याला खुप खुप अभिनंदन त्यानंतर ध्रुवकिशोर पाटील साहेब त्यांचा अनुभव मेबी ह्या सभागृहात सगळ्यात सिनियर असावे असे मला वाटतं. आणि त्यांचा स्वभाग त्यांनी सगळ्या पक्षामध्ये काम केलेले आहे हे तेच बोलले आहेत म्हणजे सगळ्या नेत्यां बरोबर काम करण्याचा त्यांचा अनुभव दांडगा आहे आणि त्याच्यामुळेच कदाचित आपल्याला हे सर्वोच्च पद मिळालेले आहे त्याबदल आपलं खुप खुप अभिनंदन. साहेब आम्हाला थोळी उनिव भासेल कारण ठराव बोलताना जो स्पीड बुलेट ट्रेन ध्रुवकिशोर साहेबांची होती ती बुलेट ट्रेन पकडायला अजुन पर्यंत लोकांना शिकाव लागेल तर ती उनिव भासेल परंतु ती उनिव तुम्ही उपमहापौरांच्या खुर्चीवर बसून ती उनिव आमची भरुन काढाल तरीही सगळ्या पक्षांकडून कारण आपण सर्व पक्षांचे कार्यकर्ते होते तर त्या सगळ्या पक्षांकडून आणि मिरा भाईंदर शहर वासियांकडून आणि विशेष म्हणजे उत्तन वासियानकडून देखील प्रभाग-२४ मधून सर्व आमच्या उत्तन वासियांकडून विशेष आपले अभिनंदन आणि मॅडम परत एकदा आम्हाला माहित आहे की तुम्ही आम्हाला वारंवार बदण्याची विनंती करत आहात परंतु तरीही देखील आम्ही तुमचा कोणताही अपमान होणार नाही किंवा सभागृहाचा अपमान होणार नाही कामकाज सुरळीत चालेल याची आम्ही शास्वती देतो आणि पुन:श्च दोघांचेही पुन्हा एकदा अभिनंदन करते.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर, महापौरांच्या अभिनंदनाच्या ठरावावर बऱ्याचशा लोकांनी आपली मत व्यक्त केली. विविध लोकांनी ह्या शहराचे महापौर म्हणून नेतृत्व केलं मला अस वाटतं तुम्हाला ते भाग्य मिळाले तुम्ही दुसऱ्यावेळेस महापौर झालात कारण प्रत्येक जण एक वेळा झाले तुम्ही दोन वेळा झालात आणि अतिशय मला खात्री आहे ह्या शहरवासियांना खात्री आहे की तुमच्या कार्यकाळात अतिशय चांगल्या पध्दतीने काम झाले याच्या नंतरही होईल. मा. उपमहापौरांच सुध्दा अभिनंदन मी सन्मा. कॉंग्रेसचे जेष्ठ सदस्य आमचे मित्र अनिल सावंत यांना ह्या ठिकाणी विंनती करेन की कुठल्याही सभागृहाचे कामकाज मग ते लोकसभे पासून राज्यसभे पासून विधानसभे पासून विधानपरिषद पर्यंत ज्या वेळेला सदस्य खाली बसतात तर ते त्या सभागृहाचा अपमान आहे ते सभागृहाचे भूषन नाही आणि म्हणून

ह्या ठिकाणी भले तुमचे काही म्हणणे असेल पण अशाच पध्दतीने दोन्ही साईटने जर आपण अडून बसलो तर बघा बाहेर पत्रकार सगळे पत्रकार कक्षामध्ये आहेत उद्या ह्या बातम्या अतिशय ठळक पणे ते बाहेर घेतील आणि ते आपल्या शहरासाठी भूषण राहणार नाही. मी सर्वांच्या वतीने मा. आयुक्त साहेबांनी अतिशय चांगल्या पध्दतीची सुचना केली चांगल्या पध्दतीने तुम्हाला समजावलं मी काँग्रेसच्या आणि आघाडीच्या सदस्यांना सर्वांच्या वतीने ह्या ठिकाणी विनंती करतो की तुम्ही खरोखर तुमच्या आसनावर बसून घ्या हे आपल्या शहरासाठी चांगले नाही परिस्थिती बदलत राहते संख्याबळ कुठे कधी वाढेल कधी कुठे कमी होईल जीवना मध्ये परिवर्तन हा निसर्गाचा नियम आहे आणि म्हणून तुम्हाला सांगतो की परिवर्तन होत राहील. आज संख्येने जास्त असणारी एका टाईमाला संख्येने कमी होते ही गोष्ट सुध्दा ह्या सभागृहाने बघितली आहे. आणि म्हणून मी पुनश्च एकदा विनंती करतो की तुम्ही निश्चित पणे सर्वांनी याच्यामध्ये लहान मोठ मानसन्मान हा विषय न घेता सर्वांनी मनाचा मोठेपणा करुन तुम्ही खुर्चांवरती बसून घ्या. मी ह्या शहरामध्ये ज्यांनी ह्या शहराचे नेतृत्व केलं त्या कुटूंबातल्या पुन्हा सदस्यांचं सुध्दा ह्या शहर वासियांचं त्याच्याप्रती प्रेम राहिले आहे ते कायम राहील पण त्यांनी सुध्दा तशा पध्दतीची वागणी असायला पाहिजे. आमच्या पुर्वजांनी जर चांगल कार्य केलं असेल आणि आम्ही जर भूमिका वेगळी केली तर आमच्या पुर्वजांसाठी सुध्दा भूषण नाही आमच्या साठी सुध्दा ते भूषण नाही. म्हणून सर्व सदस्यांना अनिलजी तुम्हाला ह्या गटाचे तुम्हाला नेतृत्व करायचे आहे ज्याला म्हणून पुढे जागून लागून त्या गटाचा जांगळी बनायचा असेल त्याच्याकडे कौशल्य असायला पाहिजे तुमच्याकडे ते आहे आणि म्हणून मी ह्या ठिकाणी तुम्हाला सांगतो की ज्या ठिकाणी तुम्हाला सभागृहामध्ये व्यवस्था केली आहे त्याठिकाणी बसाल आणि ह्या सभागृहाचं कामकाज सुरळीत पणे पार पाडाल अशा पध्दतीची विनंती करतो पुनश्च एकदा महापौर, उपमहापौरांना तुमच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा देतो धंन्यवाद जय हिंद जय महाराष्ट्र.

**हसमुख गेहलोत :-**

महापौर मॅडम, आपल्या परवानगीने ऑलरेडी हा विषय झालेला आहे विषयाला सुरुवात करावी अशी विनंती आहे.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम, उपमहापौरांचे अभिनंदन परत एकदा मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये ६ वेळा निवडूण येवून ध्रुवकिशोर पाटील यांनी इतिहास रचला त्यांना उपमहापौर मिळालेल्या संधीचा ते मिरा भाईंदर शहराचा विकास करण्यासाठीच उपयोग करतील अपार कष्ट कार्यकत्यांशी नागरीकांशी जोडलेली नाळ प्रशासनीक अनुभव यामुळे श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचा कार्यकाळ यशस्वी राहील अशी खात्री आहे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व शिवसेना यांची मिरा भाईंदर शहरातर्फे श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचे हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी मंगलमय हार्दिक शुभेच्छा.

**मा. उपमहापौर :-**

महापौर मॅडम, छत्रपती शिवाजी महाराजांना मानाचा मुजरा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षण महर्षी महात्मा ज्योतीबा फूले, महात्मा गांधीजी व इतर आपले सर्व महापुरुष यांना विनंम्र अभिवादन करतो. पंतप्रधान आदरणीय मोदीजी, ह्या महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब, भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष महाराष्ट्राचे रविंद्र चव्हाण साहेब, मिरा भाईंदरचे कार्यसंम्राट आमदार नरेंद्र मेहताजी, भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष दिलीप जैनजी, महापौर डिम्पल मॅडम, सर्व नगर सेवक पत्रकार बंधु नागरीक ह्या सर्वांना सप्रेम नमस्कार. आज ह्या पवित्र सभागृहात उपमहापौर म्हणून उभे राहताना मन अक्षरशा भरुन आले. बोलायचे भरपुर आहे परंतु शब्द निघत नाही कारण की आज ज्या डायस वरती मी बसलो गेले जवळ जवळ २५ ते ३० वर्ष तपस्या करावी लागली त्याच्या नंतर ह्या डायस वरती मला बसायला मिळालं. कधी असं स्वप्नात पण वाटलं नव्हतं की मी इथे बसू शकतो पण हे शक्य झाले फक्त भारतीय जनता पार्टी आणि नरेंद्र मेहता यांच्यामुळे भारतीय जनता पार्टीच्या सर्व नेत्यांचे, पक्षाचे मी मना पासून धंन्यवाद करतो आणि ह्यांचा मी सदैव रुणी राहील. आज फडणवीस साहेबांच्या कारकिर्दीमध्ये महाराष्ट्रामध्ये इलेक्शन झाल्या जिल्हा परिषद, नगरपंचायत, आणि महानगरपालिका ह्या सर्वांमध्ये आपण हायट्रीक मारली आणि सर्वात जास्त नगरसेवक आपण भारतीय जनता पार्टीचे निवडूण दिले त्याबद्दल फडणवीस साहेबांचे आणि चव्हाण साहेबांचे मी अभिनंदन करतो. उपमहापौर हे पद सन्मानाचे असले तरी त्याहून अधिक जबाबदारीचे पद आहे. ही खुर्ची सत्ता गाजविण्यासाठी नसते तर ही जनतेची सेवा करण्यासाठी असते आणि शहराच्या विकास करण्यासाठी असते. सत्ताधारी आणि विरोधक असा भेदभाव नकरता सर्वांची काम करणं हे आमचे कर्तव्य आहे आणि त्या प्रमाणे आम्ही हे काम करणार. ज्या प्रमाणे नरेंद्र मेहता भारतीय जनता पार्टीचे आमदार यांनी मिरा भाईंदर महानगरपालिकेची निवडणूक लढविताना मिरा भाईंदर शहराचा विकासा साठी संकल्प घेतला होता तो संकल्प पुर्ण करण्यासाठी महापौर मॅडम, मी आणि आपण सगळे भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक सर्वांना सोबत घेऊन ह्या शहराचा विकास

आपल्याला करायचा आहे आणि त्यासाठी तुमची सगळ्यांची आम्हाला सहकार्याची अपेक्षा आहे. आपण सर्वजण वेगवेगळ्या विचारधारेचे आहेत परंतु आपले इंटेन्शन फक्त एकच आहे की आपल्या शहराचा आपल्याला विकास करायचा आहे आपल्या प्रभागाचा आपल्याला विचार करायचा आहे. काम अनेक आहेत पाणी आहे मेट्रो आहे रस्ते आहेत स्वच्छता आहे आरोग्याची काम आहेत अशी अनेक कामे आपली आहेत. आपल्याकडे ५ वर्ष पडलेली आहेत आणि आज आपल्या सगळेच काम एकाच वर्षी करणे ते पण शक्य होणार नाही पण आपल्याला ते काम करायची आहेत. आणि मी सगळ्यांना खात्री देतो की महापौर मॅडम आणि आम्ही आपल्याशी सुसंवाद साधून ह्या शहराचा विकास आपण करायचा आहे. तसेच मी जरी एवढ पद जरी मला भेटलेले आहे तरी पण मी एक सामान्य नगरसेवका प्रमाणेच सामान्य नागरीका प्रमाणे मी काम करण्याचा प्रयत्न करणार आणि मी ते करणार. जस शर्मिला मॅडम बोलले स्त्री शक्तीचा नारा दिलेला आहे आणि स्त्री शक्तीला आम्ही नेहमीच मान दिलेला आहे आणि आज मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कारकिर्दीत बघा सगळ्यात जास्त महिलाच महापौर आहेत. आणि त्यांनी तुम्हाला तीन वेळा विनंती केलेली आहे अनिलजी तरी सुध्दा ते बसले नाहीत मग हा सीटचा अपमान नाही का ? दुसरी गोष्ट मॅडम यु आर राईट की मी माझी जी राजकीय कारणी सुरुवात झाली ती एक विद्यार्थी व्यवस्थेमुळे झाली मी भारतीय विद्यार्थी सेनेचा कार्यकर्ता होतो आणि त्याच्यानंतर मी अस करत करत कधी नगर सेवक झालो त्यावेळी इथे काँग्रेसची सरकार होती सत्ता होती आणि मी कधी विश्वास ठेवला नाही की मी नगरसेवक बननार परंतु नशिबाने नगरसेवक बनलो त्याच्या नंतर चार टर्म राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये काढले त्याच्या नंतर दोन टर्म भारतीय जनता पार्टीमध्ये काढले आणि भारतीय जनता पार्टी आल्या नंतर रियली जेवढा मान सन्मान ह्या पक्षाने दिला तो अजुन पर्यंत मला कधीच भेटलेला नाही हे जाहिर प्रमाणे सांगतो. कधी मी डायस वरती इथे होतो मी गेले २० वर्ष इथे बसलेलो होतो आणि मी कधीच अपेक्षा केली नाही की हे अस इथे पदावर मी बसू शकतो हे शक्य झाले. दुसरी गोष्ट तेरेण मेंडोन्सा आहे त्यांच्या वडीलां बरोबर मी काम केलं त्यांच्या आजी बरोबर पण काम केलं आणि त्यांच्या आजोबा बरोबर पण काम केलं त्यांच्या आत्या बरोबर पण काम केलं सगळ्या बरोबर काम केलं. तसच शॉन कोलासो आहे त्यांच्या वडीलां बरोबर पण काम केलं आपली आफ्रीन मॅडम आहे मुज्जफर हूसेनजी उपमहापौर होते तेव्हा मी नगर सेवक होतो त्यांची मम्मी उपमहापौर होते तेव्हा पण मी होतो म्हणजे असे अणेक उन्हाळे पावसाळे मी बघितलेले आहेत म्हणून अनिलजी आणि जय ठाकूरजी तुम्हाला आम्ही पुन्हा एकदा विनंती करतो की पोस्टमेंटशीप ठेवली पाहिजे. एखाद्या महापौर मॅडमने आपल्याला सांगितल्या नंतर त्यांचा आदर ठेवणे आपल्याला पटत नाही जेव्हा आपले आई वडील आपल्याला जेव्हा सांगतात एखादी गोष्ट तेव्हा ती पटत नाही तरी आपण ती करतो. मान सन्मान ठेवतो तसच अनिलजी हे सिनियर आहेत त्यांना ह्या सभागृहाचा अनुभव आहे आपण पहिल्यांदा आलात आणि आपण हूशार आहात आपण पण सूध्दा बाहेरुन राहून सगळे महानगरपालिका जवळून बघितले आहेत सविना मॅडम पण जुन्या आहेत रुबिना फिरोज मॅडम पण जुन्या आहेत वंदना विकास मॅडम पण जुन्या आहेत आणि आपण सगळे नविन आहेत. अनिलजी और जयजी मी मान्य करतो आता पण बसायचे आहे तूम्हाला नंतर पण बसायचे आहे पण आता बसले तर वाईट होईल की महापौर मॅडमचा तुम्ही आदर सत्कार मान ठेवून बसलात त्यांना पण बरं वाटेल. आम्ही तुमची पण डिमांड ॲक्सेप्ट करतो की तुम्हाला जर पाहिजे तर त्याप्रमाणे आम्ही सभागृहामध्ये व्यवस्थित एक करणार तूम्ही सांगितलं आम्ही ॲक्सेप्ट करतो जर आम्ही ॲक्सेप्ट करतो तर तुम्ही पण ॲक्सेप्ट केले पाहिजे आणि आयुक्तांनी पण सांगितलं आहे आज पहिली महासभा आहे तर थोळस आपण पण एक पाऊल पुढे टाका. त्या जंगमने काय सांगितलं बघा साहेब, की सत्ता येते जाते नगरसेवकांची संख्या कमी जास्त होत राहते पण हे लक्षात ठेवले पाहिजे त्याप्रमाणे सुध्दा तूम्ही पहिली महासभा आहे ठिक आहे होतात कधी कधी आपण पण थोळ ॲक्जस्ट केले पाहिजे त्या पध्दतीने बसा आमची पुन्हा एकदा विंनती आहे मतभेद ठेवूया पण मनभेद नको वाद करुया कशा साठी तर विकासा साठी परसनल नाही कारण उद्या आपल्याला जनतेलाच उत्तर द्यायचे आहे खुर्ची मिळाली म्हणून मी मोठा झालो नाही लोकांनी विश्वास दिला म्हणून जबाबदार झालो आहे इतिहास पद विचारत नाही तो विचारतो की तुम्ही जनतेसाठी काय काम केले आहे. तर माझी तुम्हाला विनंती आहे की आपण महापौर मॅडम प्रशासनाला आणि आम्हा सगळ्यांना सहकार्य करा आणि नक्कीच मिरा भाईंदर शहराचा आपण विकास करु तुमच सर्वाच पुन्हा एकदा अभिनंदन पुढच्या वेळी तुम्हाला ५ वर्षा नंतर पुन्हा निवडणूकांना सामोरे जायचे आहे अस चांगलं काम करा हीच शुभेच्छा धंन्यवाद जय हिंद जय महाराष्ट्र.

**अभिनंदन ठराव क्र. ०२ :-**

परत एकदा मीरा-भाईंदर महानगरपालिकेमध्ये सहाव्या वेळा निवडून येऊन श्री. ध्रुवकिशोर पाटील यांनी इतिहास रचला. त्यांना उपमहापौर पद मिळालेल्या संधीचा ते मीरा-भाईंदर शहराचा विकास करण्यासाठी नक्कीच उपयोग करतील. अपार कष्ट, कार्यकर्त्यांशी नागरिकांची जुळलेली नाळ प्रशासनिक अनुभव यामुळे श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचा कार्यकाल यशस्वी राहील याची खात्री आहे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि शिवसेना यांची मिरा-भाईंदर

विकास आघाडी परिवारातर्फे श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचे हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी मंगलमय हार्दिक शुभेच्छा.

**सुचक :- श्री. अनिल सावंत अनुमोदन :- श्री. जय ठाकुर**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

परत एकदा विनंती करते महिला खाली बसलेली आहेत मला आवडत नाही कृपया करुन तुम्ही सर्व बसून जा. सचिव महोदय कामकाजाची सुरुवात करावी.

**महापालिका सचिव :-**

आजच्या सभेला प्रश्नोत्तरे निरंक आहेत त्यामुळे आजच्या सभेसाठी एकूण २ लक्षवेधी प्राप्त झालेल्या आहेत. एक आहे सन्मा. सदस्य अनिल सावंत साहेबांची आणि दुसरी आहे सन्मा. सदस्य प्रशांत दळवी साहेबांची तर दोन्ही लक्षवेधी मी महापौर मॅडमकडे सुपुर्द करत आहे.

**मा. महापौर :-**

दोन लक्षवेधी आलेल्या आहेत परंतु आपल्या सभेला खुपच विषय असल्यामुळे आपल्याला वेळ कमी आहे म्हणून आपण दोन्ही लक्षवेधी फेटाळण्यात येत आहेत, पुढचा विषय घ्या.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम हरकत नाही तुम्ही पुढचा विषय घ्या पण मी जो विषय मांडला आहे त्याची सविस्तर प्रशासना बरोबर चर्चा करुन रितसर विषय घेऊन या कारण हा ज्वलंत विषय आहे.

**महापालिका सचिव :-**

प्रकरण क्र. ०३, दि. ०३/०२/२०२६ रोजीच्या मा. विशेष महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**हसमुख गेहलोत :-**

दि. ०३/०२/२०२६ रोजीच्या मा. विशेष महासभेचे इतिवृत्तांत कायम करण्यात येत आहे.

**भगवती शर्मा :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. ०३ :-**

दि. ०३/०२/२०२६ रोजीच्या मा. विशेष महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ०३ :-**

दि. ०३/०२/२०२६ रोजीच्या मा. विशेष महासभेचे इतिवृत्तांत कायम करण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. हसमुख गेहलोत अनुमोदन :- श्री. भगवती शर्मा**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**महापालिका सचिव :-**

प्रकरण क्र. ०४, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २० मधील तरतुदीनुसार स्थायी समिती गठीत करणेबाबत.

**हसमुख गेहलोत :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २० (२) अन्वये महानगरपालिकेने सार्वत्रिक निवडणुकीनंतर आपल्या पहिल्या सभेत पालिका संदस्यापैकी [सोळा] व्यक्तींची स्थायी समितीचे सदस्य म्हणून नेमणूक केली पाहिजे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३१ (अ) अन्वये, महानगरपालिका मान्यताप्राप्त पक्षाचे अथवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटाचे किंवा आघाडीचे किंवा फ्रंटचे तौलनिक संख्याबळ विचारात घेता व

महानगरपालिकेतील अशा पक्षांच्या किंवा गटाच्या संख्याबळाच्या प्रमाणात स्थायी समितीमध्ये सदस्यांचे नामनिर्देशन करील अशी तरतुद आहे.

तौलनिक संख्याबळानुसार स्थायी समितीवर खालील प्रमाणे भारतीय जनता पक्षाचे १३ सदस्यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ.क्र | सदस्यांचे नाव | पक्ष / गट / आघाडी / फ्रंट |
|---|---|---|
| १ | श्री. हसमुख मोहनलाल गेहलोत | भारतीय जनता पार्टी |
| २ | श्री. पंकज सुर्यमणी पांडेय | भारतीय जनता पार्टी |
| ३ | श्री. दिपक कल्याणराव सावंत | भारतीय जनता पार्टी |
| ४ | श्री. विशाल जगन्नाथ पाटील | भारतीय जनता पार्टी |
| ५ | श्री. संजय अनंत थेराडे | भारतीय जनता पार्टी |
| ६ | श्री. आनंद दत्ताराम मांजरेकर | भारतीय जनता पार्टी |
| ७ | श्रीम. वंदना संजय भावसार | भारतीय जनता पार्टी |
| ८ | श्रीम. हेतल रतीलाल परमार | भारतीय जनता पार्टी |
| ९ | श्री. मनोज रामनारायण दुबे | भारतीय जनता पार्टी |
| १० | श्री. गणेश गोपाळ शेट्टी | भारतीय जनता पार्टी |
| ११ | श्री. अनिल रवजीभाई विराणी | भारतीय जनता पार्टी |
| १२ | श्री. नविन गुप्तेश्वर सिंग | भारतीय जनता पार्टी |
| १३ | श्री. श्रीप्रकाश जिलेदार सिंग | भारतीय जनता पार्टी |

**जय ठाकूर :-**

मिरा भाईंदर विकास आघाडी तर्फे स्थायी समितीचे सदस्य म्हणून १) श्री. अनिल दिवाकर सावंत २) श्रीम. शर्मिला विन्सन बगाजी ३) श्री. जय राजेंद्र ठाकूर यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

**मा. महापौर :-**

स्थायी समिती सदस्य म्हणून भारतीय जनता पार्टीचे १३ सदस्य आणि मिरा भाईंदर विकास आघाडीचे ३ सदस्य सर्वानुमते ठराव मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ०४ :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २० मधील तरतुदीनुसार स्थायी समिती गठीत करणेबाबत.

**ठराव क्र. ०४ :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २० (२) अन्वये महानगरपालिकेने सार्वत्रिक निवडणुकीनंतर आपल्या पहिल्या सभेत पालिका संदस्यापैकी [सोळा] व्यक्तींची स्थायी समितीचे सदस्य म्हणून नेमणूक केली पाहिजे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३१ (अ) अन्वये, महानगरपालिका मान्यताप्राप्त पक्षाचे अथवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटाचे किंवा आघाडीचे किंवा फ्रंटचे तौलनिक संख्याबळ विचारात घेता व महानगरपालिकेतील अशा पक्षांच्या किंवा गटाच्या संख्याबळाच्या प्रमाणात स्थायी समितीमध्ये सदस्यांचे नामनिर्देशन करील अशी तरतुद आहे.

तौलनिक संख्याबळानुसार स्थायी समितीवर खालील प्रमाणे भारतीय जनता पक्षाचे १३ सदस्य व मिरा भाईंदर विकास आघाडीचे ०३ सदस्य असे एकुण १६ सदस्यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ.क्र | सदस्यांचे नाव | पक्ष / गट / आघाडी / फ्रंट |
|---|---|---|
| १ | श्री. हसमुख मोहनलाल गेहलोत | भारतीय जनता पार्टी |
| २ | श्री. पंकज सुर्यमणी पांडेय | भारतीय जनता पार्टी |
| ३ | श्री. दिपक कल्याणराव सावंत | भारतीय जनता पार्टी |
| ४ | श्री. विशाल जगन्नाथ पाटील | भारतीय जनता पार्टी |
| ५ | श्री. संजय अनंत थेराडे | भारतीय जनता पार्टी |
| ६ | श्री. आनंद दत्ताराम मांजरेकर | भारतीय जनता पार्टी |
| ७ | श्रीम. वंदना संजय भावसार | भारतीय जनता पार्टी |
| ८ | श्रीम. हेतल रतीलाल परमार | भारतीय जनता पार्टी |
| ९ | श्री. मनोज रामनारायण दुबे | भारतीय जनता पार्टी |
| १० | श्री. गणेश गोपाळ शेट्टी | भारतीय जनता पार्टी |

| | | |
|---|---|---|
| ११ | श्री. अनिल रवजीभाई विराणी | भारतीय जनता पार्टी |
| १२ | श्री. नविन गुप्तेश्वर सिंग | भारतीय जनता पार्टी |
| १३ | श्री. श्रीप्रकाश जिलेदार सिंग | भारतीय जनता पार्टी |
| १४ | श्री. अनिल दिवाकर सावंत | मिरा भाईंदर विकास आघाडी |
| १५ | श्रीम. शर्मिला विन्सन बगाजी | मिरा भाईंदर विकास आघाडी |
| १६ | श्री. जय राजेंद्र ठाकूर | मिरा भाईंदर विकास आघाडी |

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**महापालिका सचिव :-**

प्रकरण क्र. ०५, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३० (१) मधील तरतुदीनुसार महिला व बालकल्याण समिती गठीत करणेबाबत.

**हसमुख गेहलोत :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३० (१) अन्वये, महानगरपालिकेस, वेळोवेळी आपल्या पालिका सदस्यांमधून (महिला व बालकल्याण समितीसह) विशेष समित्यांची नेमणूक करता येईल.

महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीवर सदस्यांचे नामनिर्देशन करताना, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३१ (अ) अन्वये, महानगरपालिका मान्यताप्राप्त पक्षाचे अथवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे किंवा आघाडीचे किंवा फ्रंटचे तौलनिक संख्याबळ विचारात घेईल व महानगरपालिकेतील अशा पक्षांच्या किंवा गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात महिला व बालकल्याण समितीमध्ये सदस्यांचे नामनिर्देशन करील अशी तरतुद आहे.

महानगरपालिका प्रारुप सभा कामकाज नियम ४ (ब) अंतर्गत महिला व बालकल्याण समिती सदस्य संख्या नऊ इतकी निश्चीत आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ३० (१) अन्वये महानगरपालिकेस, वेळोवेळी आपल्या पालिका सदस्यांमधून (महिला व बालकल्याण समितीसह) विशेष समित्यांची नेमणूक करता येईल अशी तरतुद आहे. परंतु, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात विशेष समित्यांकरिता सदस्य संख्या नमुद नाही.

मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ मध्ये एकूण ९५ नवनिर्वाचित पालिका सदस्य निवडून आलेले असुन, उक्त पालिका सदस्यांनी मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालयात नोंदणी केलेल्या पक्ष/गट/फ्रंट/आघाडीचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| भारतीय जनता पार्टी | मिरा भाईंदर विकास आघाडी (भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस + शिवसेना) | अपक्ष |
|---|---|---|
| ७८ | १६ | १ |

प्रशासनाने महिला व बालकल्याण समितीची मुदत व सदस्य संख्या निश्चित करणेसाठी प्रस्तावित केलेले आहे. तद्अनुषंगाने महिला व बालकल्याण समितीची संदस्य संख्या नऊ इतकी निश्चित करण्यात येत असुन, समितीची मुदत १ वर्षाकरीता राहील.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३१(अ) अन्वये, तौलनिक संख्याबळाचे प्रमाणात महिला व बालकल्याण समितीवर सदस्यांचे नामनिर्देशन खालीलप्रमाणे होत आहे.

| **अ.क्र.** | **पक्ष/गट/आघाडी** | **समिती सदस्य ९ प्रमाणे** | **प्रस्तावीत सदस्य** |
|---|---|---|---|
| १ | भारतीय जनता पार्टी | ७८ ÷ ९५ X ९ = ७.३८ | ७ |
| २ | मिरा भाईंदर विकास आघाडी (भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस + शिवसेना) | १६ ÷ ९५ X ९ = १.५१ | २ |
| ३ | अपक्ष | ०१ ÷ ९५ X ९ = ०.०९ | ० |
| | **एकुण** | | **९** |

तौलनिक संख्याबळानुसार महिला व बालकल्याण समितीवर खालील नऊ सदस्यांची नियुक्ती करण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

| अ.क्र | सदस्यांचे नाव | पक्ष / गट / आघाडी / फ्रंट |
|---|---|---|
| १ | श्रीम. अनिता जयवंत पाटील | भारतीय जनता पार्टी |
| २ | श्रीम. रुपाली शिंदे मोदी | भारतीय जनता पार्टी |
| ३ | श्रीम. सुरेखा प्रकाश सोनार | भारतीय जनता पार्टी |
| ४ | श्रीम. जया रथीन दत्ता | भारतीय जनता पार्टी |
| ५ | श्रीम. स्नेहा शैलेश पांडे | भारतीय जनता पार्टी |
| ६ | श्रीम. हेमा राजेश बेलानी | भारतीय जनता पार्टी |
| ७ | श्रीम. दिप्ती शेखर भट | भारतीय जनता पार्टी |
| ८ | श्रीम. शेख रुबिना फिरोज | मिरा भाईंदर विकास आघाडी |
| ९ | श्रीम. रिझवाना अनवर खान | मिरा भाईंदर विकास आघाडी |

**अनिता पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**जय ठाकूर :-**

मिरा भाईंदर विकास आघाडी तर्फे महिला व बालकल्याण समिती सदस्य म्हणून १) श्रीम. शेख रुबिना फिरोज २) श्रीम. रिझवाना अनवर खान यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

**अनिल सावंत :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

महिला बालकल्याण समिती सदस्य म्हणून भारतीय जनता पार्टीचे ७ आणि मिरा भाईंदर विकास आघाडीचे २ सदस्य ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ०५ :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३० (१) मधील तरतुदीनुसार महिला व बालकल्याण समिती गठीत करणेबाबत.

**ठराव क्र. ०५ :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३० (१) अन्वये, महानगरपालिकेस, वेळोवेळी आपल्या पालिका सदस्यांमधून (महिला व बालकल्याण समितीसह) विशेष समित्यांची नेमणूक करता येईल.

महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीवर सदस्यांचे नामनिर्देशन करताना, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३१ (अ) अन्वये, महानगरपालिका मान्यताप्राप्त पक्षाचे अथवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे किंवा आघाडीचे किंवा फ्रंटचे तौलनिक संख्याबळ विचारात घेईल व महानगरपालिकेतील अशा पक्षांच्या किंवा गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात महिला व बालकल्याण समितीमध्ये सदस्यांचे नामनिर्देशन करील अशी तरतुद आहे.

महानगरपालिका प्रारुप सभा कामकाज नियम ४ (ब) अंतर्गत महिला व बालकल्याण समिती सदस्य संख्या नऊ इतकी निश्चीत आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ३० (१) अन्वये महानगरपालिकेस, वेळोवेळी आपल्या पालिका सदस्यांमधून (महिला व बालकल्याण समितीसह) विशेष समित्यांची नेमणूक करता येईल अशी तरतुद आहे. परंतु, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात विशेष समित्यांकरिता सदस्य संख्या नमुद नाही.

मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ मध्ये एकूण ९५ नवनिर्वाचित पालिका सदस्य निवडून आलेले असुन, उक्त पालिका सदस्यांनी मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालयात नोंदणी केलेल्या पक्ष/गट/फ्रंट/आघाडीचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| भारतीय जनता पार्टी | मिरा भाईंदर विकास आघाडी (भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस + शिवसेना) | अपक्ष |
|---|---|---|
| ७८ | १६ | १ |

प्रशासनाने महिला व बालकल्याण समितीची मुदत व सदस्य संख्या निश्चित करणेसाठी प्रस्तावित केलेले आहे. तद्अनुषंगाने महिला व बालकल्याण समितीची संदस्य संख्या नऊ इतकी निश्चित करण्यात येत असुन, समितीची मुदत १ वर्षाकरीता राहील.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३१(अ) अन्वये, तौलनिक संख्याबळाचे प्रमाणात महिला व बालकल्याण समितीवर सदस्यांचे नामनिर्देशन खालीलप्रमाणे होत आहे.

| **अ.क्र.** | **पक्ष/गट/आघाडी** | **समिती सदस्य ९ प्रमाणे** | **प्रस्तावीत सदस्य** |
|---|---|---|---|
| १ | भारतीय जनता पार्टी | ७८ ÷ ९५ X ९ = ७.३८ | ७ |
| २ | मिरा भाईंदर विकास आघाडी (भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस + शिवसेना) | १६ ÷ ९५ X ९ = १.५१ | २ |
| ३ | अपक्ष | ०१ ÷ ९५ X ९ = ०.०९ | ० |
| **एकुण** | | | **९** |

तौलनिक संख्याबळानुसार महिला व बालकल्याण समितीवर खालील नऊ सदस्यांची नियुक्ती करण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

| **अ.क्र** | **सदस्यांचे नाव** | **पक्ष / गट / आघाडी / फ्रंट** |
|---|---|---|
| १ | श्रीम. अनिता जयवंत पाटील | भारतीय जनता पार्टी |
| २ | श्रीम. रुपाली शिंदे मोदी | भारतीय जनता पार्टी |
| ३ | श्रीम. सुरेखा प्रकाश सोनार | भारतीय जनता पार्टी |
| ४ | श्रीम. जया रथीन दत्ता | भारतीय जनता पार्टी |
| ५ | श्रीम. स्नेहा शैलेश पांडे | भारतीय जनता पार्टी |
| ६ | श्रीम. हेमा राजेश बेलानी | भारतीय जनता पार्टी |
| ७ | श्रीम. दिप्ती शेखर भट | भारतीय जनता पार्टी |
| ८ | श्रीम. शेख रुबिना फिरोज | मिरा भाईंदर विकास आघाडी |
| ९ | श्रीम. रिझवाना अनवर खान | मिरा भाईंदर विकास आघाडी |

**सुचक :- श्री. हसमुख गेहलोत अनुमोदन :- श्रीम. अनिता पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**महापालिका सचिव :-**

प्रकरण क्र. ०६, परिवहन समितीवर सदस्यांची नेमणूक करणे.

**मदन सिंग :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २० कलम ३४२ (२) (अ) अन्वये, मिरा भाईंदर महानगरपालिकेने मा. महासभा दि. २०/०१/२००५, ठराव क्र. ५५ अन्वये, परिवहन उपक्रम स्थापन केलेला आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील प्रकरण क्र. २ चे कलम २५ (२) अन्वये परिवहन समितीवर सदस्यांची नेमणूक करण्यासंदर्भात तरतूद आहे.

तदअनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २५ (२) मधील परिवहन समिती सदस्य पदासाठी आवश्यक असलेली अर्हता धारण करणा-या व्यक्ती, ज्या पालिका सदस्य नाहीत अशा व्यक्तीमधून परिवहन समितीचे सदस्य म्हणून **बारा** व्यक्तींची नेमणूक करणेस ही सभा मान्यता देत आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. ०६ :-**

परिवहन समितीवर सदस्यांची नेमणूक करणे.

**ठराव क्र. ०६ :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २० कलम ३४२ (२) (अ) अन्वये, मिरा भाईंदर महानगरपालिकेने मा. महासभा दि. २०/०१/२००५, ठराव क्र. ५५ अन्वये, परिवहन उपक्रम स्थापन केलेला आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील प्रकरण क्र. २ चे कलम २५ (२) अन्वये परिवहन समितीवर सदस्यांची नेमणूक करण्यासंदर्भात तरतूद आहे.

तदअनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २५ (२) मधील परिवहन समिती सदस्य पदासाठी आवश्यक असलेली अर्हता धारण करणा-या व्यक्ती, ज्या पालिका सदस्य नाहीत अशा व्यक्तीमधून परिवहन समितीचे सदस्य म्हणून **बारा** व्यक्तींची नेमणूक करणेस ही सभा मान्यता देत आहे.

**सुचक :- श्री. मदन सिंह अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**महापालिका सचिव :-**

प्रकरण क्र. ०७, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २९ (अ) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीत सहा प्रभाग समित्यांची रचना करणेबाबत.

**रवि व्यास :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २९ (अ) मधील तरतुदीनुसार महापालिकेच्या हद्दीत प्रशासकीय अधिकारांचे विकेंद्रीकरण व्हावे व लोकप्रतिनिधीत्व करणारे पदाधिकारी व नगरसेवक यांच्या लोकाभिमुख ध्येय धोरणानुसार प्रभागांचा विकास व्हावा म्हणून महानगरपालिकेने उपरोक्त कायदेशीर तरतुदीनुसार प्रभाग समित्या स्थापन करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २९ (अ) अन्वये प्रभाग समित्यांची रचना करणेविषयी असलेल्या तरतुदीनुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेची सन २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ८,०९,३७८ इतकी असल्याने महानगरपालिका कार्यक्षेत्रात एकूण सहा प्रभाग समित्या स्थापन करणे आवश्यक आहे.

सदर प्रभाग समितीची रचना प्रस्तावित करताना प्रामुख्याने शहराची भौगोलिक रचना, नैसर्गिक हद्दी, मुख्य रस्ते ह्यांचा विचार करणे आवश्यक आहे. तसेच मिरा भाईंदर शहराचे पश्चिम रेल्वे उपनगरीय सेवेमुळे दोन भागात विभाजन झालेले आहे. करिता प्रशासनाने, भाईंदर (पश्चिम) भागात दोन प्रभाग समित्या व भाईंदर (पूर्व) व मिरारोड भागातील भौगोलिक क्षेत्र व नैसर्गिक हद्द यांचा विचार करुन चार प्रभाग समित्या अशा एकूण सहा प्रभाग समितीची रचना करणेसाठी प्रस्तावित केले आहे.

तसेच सन २०२५-२६ मध्ये घेण्यात आलेल्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता केलेली प्रभाग रचना २०१७ प्रमाणेच आहे, सन २०२५-२६ मधील निवडणूक प्रभागांची हद्द आणि क्षेत्र संलग्नता विचारात घेऊन खालील प्रमाणे सहा प्रभाग समित्या स्थापन करुन भौगोलिक रचनेस ही सभा मान्यता देत आहे.

| **अ.क्र.** | **प्रभाग समिती क्रमांक** | **प्रभाग समिती क्षेत्रात समाविष्ट निवडणूक प्रभाग** | **एकूण प्रभाग** |
|---|---|---|---|
| १ | भाईंदर पश्चिम, प्रभाग समिती क्र. १ | ८, २३, २४ | ०३ |
| २ | भाईंदर पश्चिम, प्रभाग समिती क्र. २ | १, ६, ७ | ०३ |
| ३ | भाईंदर पूर्व, प्रभाग समिती क्र. ३ | २, ३, ४, ५, ११ | ०५ |
| ४ | भाईंदर पूर्व, प्रभाग समिती क्र. ४ | ९, १०, १२, १३, १८ | ०५ |
| ५ | मिरारोड पूर्व, प्रभाग समिती क्र. ५ | २०, २१, २२ | ०३ |
| ६ | हायवे परिसर व मिरारोड पूर्व, प्रभाग समिती क्र. ६ | १४, १५, १६, १७, १९ | ०५ |
| **एकूण** | **६** | **२४** | **२४** |

**दिनेश जैन :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. उपमहापौर :-**

विषय असा आहे ह्या प्रभाग समितीमध्ये आपण काहीही बदल केलेला नाही. ज्या प्रमाणे २०१७ मध्ये प्रभाग रचना होती तिच इथे पण केलेली आहे.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम, आपल्या विनंती आहे सभा शास्त्र नियमा प्रमाणे मगाशी तुमचे सदस्य सांगत होते की महापौरांची परवानगी घेतल्या शिवाय बोलू नका आता काही सदस्य जागेवर बसून बोलत आहेत त्यांना जरा आवरा. आदरणीय महापौर मॅडम प्रशासनाने विषय दिलेला आहे की प्रभाग समित्यांची रचना करण्या बाबत समिती गठीत करणे बाबत नाही आणि त्या गोषवाऱ्यामध्ये त्यांनी लिहीलेले आहे २०२५-२६ मध्ये घेण्यात आलेल्या सार्वत्रिक निवडणूका करीता केलेली प्रभाग रचना २०१७ प्रमाणे आहे. सन-२०२५-२६ मधील निवडणूक प्रभागांची हद्द आणि क्षेत्र सल्लग्नता विचारात घेऊन ६ प्रभाग समित्या स्थापन करणे आवश्यक आहे. हद्द सल्लग्नता विचारात घेऊन सचिवाने गोषवारा दिलेला आहे रचना करणे आवश्यक आहे. आज आपण जो ठराव मांडलेला आहे त्याच्यामध्ये तुम्ही सांगितलं रेल्वेमुळे आपले दोन भाग झाले तसेच छत्रपती शिवाजी महाराज मार्ग जो शहरातला मोठा मार्ग आहे त्यामुळे सुध्दा ह्या शहराचे मिरा रोडचे दोन भाग झालेले आहेत. घोडबंदर, हटकेस, कनकिया त्या साईटचा भाग एक इकडे मिरा रोड शांती नगर वगैरे ह्या साईटचा भाग. आयुक्त साहेब प्रभाग समित्या कशा साठी असतात लोकांना जवळ तिथे जाता येईल आपली काम करता येईल तुमच्या ठरावा प्रमाणे तुम्ही काय केले आहे ९ नंबर प्रभाग ज्या प्रभागामध्ये प्रभाग समिती क्र.५ चे कार्यालय आहे पालिकेने बांधलेले हैदरी कम्युनिटी सेंटर त्यांना तुम्ही टाकले कनकिया मध्ये तीन किलो मीटर पाईपीट करावी लागणार आहे. १९ नंबर प्रभागामध्ये हैदरी कम्युनिटी सेंटर प्रभाग समिती क्र.५ अस्तित्वात आहे त्या लोकांना तुम्ही टाकले प्रभाग समिती क्र. ६ जो कुठे आहे काशिमीरा जवळ जवळ ५ किलो मीटर त्यांना जाव लागणार. तुमच्या ५ प्रभाग समित्या होत्या एक समिती केली असती काय फरक पडला असता लोकांचे त्रास तरी वाचले असते परत आयुक्तांना सुध्दा मी या बाबतीत वारंवार पत्रव्यवहार केलेला आहे मला एका गोष्टीचे आश्चर्य वाटते सभागृहामध्ये सत्ता पक्ष सत्तारुढ आहेत त्यांचा तो अधिकार आहे ते काहीही ठराव करु शकतात पण प्रशासनाने दिलेला गोषवारा अत्यंत चुकीचा आहे. २०१७ मध्ये जो प्रशासनाने गोषवारा दिला होता त्याच्या विरोधात जावून सत्ता पक्षाने तो ठराव केला आणि प्रशासनाने त्या गोषवाऱ्याचा विचार नकरता ठरावा प्रमाणे गोषवारा दिला प्रशासनाला तो अधिकार नाही. यामध्ये प्रशासनाची अक्षम्य चुक आहे आणि त्यांनी ती केली आहे. सत्तापक्ष आहे त्यांना अधिकार आहे कुठचा ठराव काय करायचा पण प्रशासनाने त्या भानगडीत पडू नये गोषवारा देते वेळी शंभरवेळा विचार करायचा. याबाबतीत मी जाणीव करुन देवून सुध्दा प्रशासनाने कोणतीही कार्यवाही केली नाही मी आता माझा ठराव मांडत आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २९ (अ) अन्वये मीरा-भाईंदर पालिकेच्या हद्दीत सहा प्रभाग समित्यांची रचना करणेबाबत चा प्रस्ताव मा. महासभेसमोर आलेला आहे अधिनियमात असलेली तरतूद व प्रशासनाने दिलेला गोषवारा ज्यात नमूद आहे सन २०२५-२६ मधील निवडणूक प्रभागांची हद्द लक्षात घेऊन आणि क्षेत्र संलरानता विचारात घेऊन सहा प्रभाग समित्या स्थापन करणे आवश्यक आहे. प्रभाग समितीची कामे पाणीपुरवठा घनकचरा व्यवस्थापन मलप्रवाह विल्हेवाट मलनिसारण वादळी पावसाच्या पाण्याचे व्यवस्थापन स्वच्छता विषयक बांधकामे विकास योजना यांच्या संबंधात शिफारशी करणे आणि त्यांचा नियतकाला व कालांतराने आढावा घेणे प्रभागातील उपवनांची देखभालीची सुनिश्चित आहे करणे प्रत्येक निवडणूक प्रभागाला यथायोग्य प्रमाणात अर्थसंकल्पीय तरतुदीचे वाटप करण्याकरिता शिफारस करणे. यावरून स्थानिक नागरिकांसाठी प्रभाग समिती कार्यालय जवळ असणे कितीगार्जेचे आहे, गोषवरामध्ये दिल्याप्रमाणे प्रभाग समिती स्थापन झाल्यास प्रभाग क्रमांक नऊ मधील रहिवासीयांना प्रभाग क्रमांक चार मध्ये कनकिया मध्ये जाण्यासाठी साधारणतः तीन किलोमीटर पायपीट करावी लागेल तसेच प्रभाग क्रमांक १९ मधील रहिवासीयांना प्रभाग क्रमांक सहा मध्ये जावयाचे असल्यास साधारणतः साडेपाच किलोमीटर पायपीट करावी लागेल. सहा समित्यांची रचनाकर्ते वेळी लोकसंख्येचा विचार करण्यात आलेला नाही हे खाली दिलेल्या प्रभाग समिती निहाय लोकसंख्येवरून दिसून येईल. प्रभाग समिती क्रमांक एक ९२ हजार २२० प्रभाग समिती क्रमांक दोन ९६ हजार एकोणीस प्रभाग समिती क्रमांक तीन एक लाख ७५ हजार ३३९ प्रभाग समिती क्रमांक चार एक लाख ७१ हजार १५३ प्रभाग समिती क्रमांक पाच एक लाख ५ हजार ५२९. प्रभाग समिती क्रमांक सहा एक लाख ६९ हजार एकशेअठरा ३ क्षेत्र निर्धारित करणे :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २९ ब अन्वये प्रत्येक क्षेत्राच्या प्रादेशिक सीमा निर्धारित करेल ज्यामध्ये अशा प्रदेशातील ज्या मतदार केंद्राच्या मतदार यादी मध्ये नमूद केलेल्या सर्व व्यक्ती या सर्वसाधारण रहिवासी असतील अशा कोणत्याही मतदान केंद्राच्या किंवा शासनाने ठरविल्यास त्या क्षेत्रातील अशा दोन किंवा अधिक सलग मतदान केंद्रांच्या संपूर्ण भौगोलिक प्रदेशाचा अनिवार्यपणे समावेश असेल. प्रशासनाने गोषवारा देतेवेळी हे कलम विचारात घेतलेले नाही. मीरा रोड मध्ये हैदरी चौक येथे महानगरपालिकेने कम्युनिटी सेंटर बांधलेले आहे तिथून प्रभाग क्रमांक

पाच चे कामकाज चालते हे कम्युनिटी सेंटर प्रभाग क्रमांक ९ व प्रभाग क्रमांक १९ मध्ये आहे त्यामुळे प्रभाग क्रमांक नऊ व प्रभाग क्रमांक १९ यांचा समावेश प्रभाग समिती क्रमांक पाच मध्येच करण्यात यावा. मनपा प्रशासनाने २०१७ मध्ये प्रभाग समिती स्थापन करतेवेळी दिलेल्या घोषवारामध्ये प्रभाग क्रमांक नऊ व १९ यांचा समावेश प्रभाग समिती क्रमांक पाच मध्येच केलेला होता परंतु त्यावेळी सत्ताधाऱ्यांनी चुकीचा ठराव करून नागरिकांना त्रास दिला. खालीलप्रमाणे प्रभागरचना करून नियमांचे पालन करावे व नागरिकांना न्याय द्यावा असा मी ठराव मांडत आहे.

| प्रभाग समिती क्रमांक | प्रभाग क्रमांक |
|---|---|
| १ | ८,२३,२४, |
| २ | १,६,७ |
| ३ | २,३,४,५,११ |
| ४ | १०,१२,१३,१८ |
| ५ | ९,१९,२०,२१,२२ |
| ६ | १४,१५,१६,१७ |

**आफरीन मुझफ्फर हुसेन सय्यद :-**

माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम, पहिली महासभा आहे मधून प्रशासनाने केलेल्या चुका त्यांचा उहापोह आम्ही करत नाही. याच्या पुढे जर दुसऱ्या महासभे पासून जर प्रशासनाने काही चुकीचे केले असेल तर प्रशासनाने त्याची तयारी ठेवावी आम्ही त्याची चिरफाळ ह्या ठिकाणी करणार.

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम, डायरेक्ट प्रशासनावर आरोप करत आहेत महापौर मॅडम सभागृह चालवत आहेत आणि जस मगाशी अनिल सावंत साहेबांनी सांगितलं की तुम्ही रस्त्याच्या पलिकडे जात आहेत इकडे जात आहेत आता ह्यांनी ते प्रभाग क्र.६ ची नियुक्ती त्याच्यामध्ये त्यांनी ठराव केला १५,१६,१६,१७ सावंत साहेब तो काशिमीरा हायवे क्रॉस होत नाही का १७ नंबर ? तुम्ही प्रशासनाला ताकीद देत आहेत तुम्ही महापौरां समोर प्रशासनाला ताकीद देत आहेत की पुढच्या वेळेला तुम्ही अस करु नका तस करु नका मग आता तुम्ही ठराव मांडलात त्यामध्ये पण तुम्ही तेच केले आहे. तुम्ही आमच्यावर अगोदर आरोप केले की ह्यांनी इकडचा वॉर्ड तिकडे टाकला तिकडचा एकडे घेतला.

**अनिल सावंत :-**

म्हणजे तुम्हाला असे म्हणायचे आहे का तुम्ही दिलेला गोषवारा आणि ठराव चुकीचा आहे ?

**प्रशांत दळवी :-**

आम्ही कुठे बोलतो.............

**अनिल सावंत :-**

तुम्ही प्रश्न करत आहेत तुमचा ठरावावर. तुम्हाला अस म्हणायचं आहे का तुम्ही केलेला ठराव चुकीचा आहे?

**प्रशांत दळवी :-**

मी कशाला म्हणू.

**अनिल सावंत :-**

मग दुरुस्त करा आम्ही समर्थन देतो. दळवी साहेब कामकाज व्यवस्थित चाललं आहे व्यवस्थित चालू देत तुम्ही सभागृहनेते राहीलेले आहेत.

**प्रशांत दळवी :-**

पत्रकार बंधु बसलेले आहेत जागरुत नागरीक पण इकडे आहेत.

**अनिल सावंत :-**

म्हणून त्यांच्या निदर्शनाला आम्ही एक प्रभाग समिती पाहिजे म्हणून लोकांना ३-३, ५-५ किलो मीटर तुम्ही जायला लावणार हे बरोबर आहे का ? प्रभाग समिती असतात काशा साठी. जावू द्या जास्त चर्चा नको.

**मा. महापौर :-**

आपण मतदानाची प्रक्रिया करा.

**भगवती शर्मा :-**

अनिल सावंतजी आपको भी मालूमात रहे इस के पहले भी प्रभाग समितीयो का जब ठराव हूवा था उसमे जब उस समय के सत्तापक्ष ने ठराव किया था आपको ध्यान मे होगा तो हम लोग उस समय के अंदर मे आगे कोर्ट

मेभी गये थे युडी मेभी गये थे लेकीन उस समय के अंदर मे वहासे एकही आदेश हूवा यह सब अधिकार महासभाका है और महासभा जो निर्णय लेती है उसमो अंती माना जायेगा और रही बात प्रशासन के उपर के अंदर मे दोष लगाया आरोप लगाया इस गोषवारा को अच्छी तरह से आप पढ लिजीए । सन-२०२५-२६ मध्ये घेण्यात आलेली सार्वत्रिक निवडणूक करीता केलेली प्रभाग रचना २०१७ प्रमाणे आहे. सन-२०२५-२६ मधील प्रभागाची हद्द आणि क्षेत्र सल्लग्नता विचारात घेऊन ६ प्रभाग समितीची स्थापना करणे आवश्यक आहे. अब निर्णय सभागृह लेगा प्रशासन ने बोल दिया आवश्यक है । रचना का उन्होने बताया २०१७ मे क्या थी २०२५ मे चुनाव किस आधार पे हूवा था, आप सिधेही उनके उपर मे आरोप लगाकर प्रेशर बनाना चाहते है वह अनुचित है ।

**अनिल सावंत :-**

याच्यावर बोलाव अस तुम्हाला वाटत का काय त्यांनी चुकी केली आहे ती दाखवतो. जावू द्या ठराव झाला आहे मतदान घ्या. विषय कशाला वाढवत आहोत.

**भगवती शर्मा :-**

अनिल सावंतजी जब आरोप लगायेंगे तो हम बोलेंगे । हम डेफीनेटली बोलेंगे जैसे आपको अधिकार है वैसा हम कोभी अधिकार है ।

**अनिल सावंत :-**

आपने जो ठराव किया उपके उपरही आप ऑब्जेक्शन ले रहे हो ।

**मा. उपमहापौर :-**

अनिलजी जुबेर इनामदार आपले सगळे नगरसेवक होते ते सुध्दा कोर्टात गेले होते गेल्यावर्षी त्यावेळी कोर्टाने फेटाळून लावले. हा संपुर्ण अधिकार महासभेचा आहे तर महासभेने निर्णय घेतलेला आहे.

**अनिल सावंत :-**

कशाला चर्चा करत आहेत मतदान घ्या तुमच्याच ठरावावर तुम्हीच ऑब्जेक्शन घेत आहेत हे बरोबर आहे का ?

**हसमुख गेहलोत :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो आमच्या ठरावावर आम्ही ऑब्जेक्शन घेत नाही तुम्ही प्रशासनावर आक्षेप घेतला त्या विषयावर भगवती शर्माने आपल्याला उत्तर दिले आहे. दोन ठराव आलेले आहेत महापौर मॅडम त्यांचे मतदार करावे ही आपल्याला विनंती आहे.

**महापालिका सचिव :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, प्रकरण क्र.७ साठी दोन ठराव आलेले आहेत पहिला ठराव आहे सुचक सदस्य रवि व्यास आणि अनुमोदक दिनेश जैन दुसरा ठराव सुचक अनिल सावंत आणि अनुमोदक आफरीन मुझफ्फर हूसेन सय्यद. प्रथम आपण दुसरा ठराव मतदानाला टाकणार आहोत सुचक श्री. अनिल सावंत यांच्या ठरावाच्या बाजूने असलेल्यांनी हाथ वर करावे. ठरावाच्या विरोधात कोणी असतील त्यांनी हाथ वर करावे. दुसरा ठराव सुचक श्री. रवि व्यास यांच्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हाथ वर करावे. ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करावे.

**मा. महापौर :-**

सुचक रवि व्यास यांनी मांडलेला ठरावाच्या बाजूने ७६ विरोधात १६ तटस्थ ० इतकी मते पडलेली आहेत श्री. रवि व्यास यांनी मांडलेला ठराव बहूमताने मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ०७ :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २९ (अ) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीत सहा प्रभाग समित्यांची रचना करणेबाबत.

**ठराव क्र. ०७ :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २९ (अ) मधील तरतुदीनुसार महापालिकेच्या हद्दीत प्रशासकीय अधिकारांचे विकेंद्रीकरण व्हावे व लोकप्रतिनिधीत्व करणारे पदाधिकारी व नगरसेवक यांच्या लोकाभिमुख ध्येय धोरणानुसार प्रभागांचा विकास व्हावा म्हणून महानगरपालिकेने उपरोक्त कायदेशीर तरतुदीनुसार प्रभाग समित्या स्थापन करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २९ (अ) अन्वये प्रभाग समित्यांची रचना करणेविषयी असलेल्या तरतुदीनुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेची सन २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ८,०९,३७८ इतकी असल्याने महानगरपालिका कार्यक्षेत्रात एकूण सहा प्रभाग समित्या स्थापन करणे आवश्यक आहे.

सदर प्रभाग समितीची रचना प्रस्तावित करताना प्रामुख्याने शहराची भौगोलिक रचना, नैसर्गिक हद्दी, मुख्य रस्ते ह्यांचा विचार करणे आवश्यक आहे. तसेच मिरा भाईंदर शहराचे पश्चिम रेल्वे उपनगरीय सेवेमुळे दोन भागात विभाजन झालेले आहे. करिता प्रशासनाने, भाईंदर (पश्चिम) भागात दोन प्रभाग समित्या व भाईंदर (पूर्व) व मिरारोड भागातील भौगोलिक क्षेत्र व नैसर्गिक हद्द यांचा विचार करुन चार प्रभाग समित्या अशा एकूण सहा प्रभाग समितीची रचना करणेसाठी प्रस्तावित केले आहे.

तसेच सन २०२५-२६ मध्ये घेण्यात आलेल्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता केलेली प्रभाग रचना २०१७ प्रमाणेच आहे, सन २०२५-२६ मधील निवडणूक प्रभागांची हद्द आणि क्षेत्र संलग्नता विचारात घेऊन खालील प्रमाणे सहा प्रभाग समित्या स्थापन करुन भौगोलिक रचनेस ही सभा मान्यता देत आहे.

| **अ.क्र.** | **प्रभाग समिती क्रमांक** | **प्रभाग समिती क्षेत्रात समाविष्ट निवडणूक प्रभाग** | **एकूण प्रभाग** |
|---|---|---|---|
| १ | भाईंदर पश्चिम, प्रभाग समिती क्र. १ | ८, २३, २४ | ०३ |
| २ | भाईंदर पश्चिम, प्रभाग समिती क्र. २ | १, ६, ७ | ०३ |
| ३ | भाईंदर पूर्व, प्रभाग समिती क्र. ३ | २, ३, ४, ५, ११ | ०५ |
| ४ | भाईंदर पूर्व, प्रभाग समिती क्र. ४ | ९, १०, १२, १३, १८ | ०५ |
| ५ | मिरारोड पूर्व, प्रभाग समिती क्र. ५ | २०, २१, २२ | ०३ |
| ६ | हायवे परिसर व मिरारोड पूर्व, प्रभाग समिती क्र. ६ | १४, १५, १६, १७, १९ | ०५ |
| **एकूण** | **६** | **२४** | **२४** |

**सुचक :- ॲड रवि व्यास        अनुमोदन :- श्री. दिनेश जैन**

| **अ.क्र.** | **ठरावाच्या बाजूने** | **अ.क्र.** | **ठरावाच्या विरोधात** | **तटस्थ** |
|---|---|---|---|---|
| १ | शर्मा मानशी रमेश | १ | सुनिल चंपालाल चौधरी | **निरंक** |
| २ | ॲड. श्रध्दा संदिप कदम | २ | रिजवाना अनवर खान | |
| ३ | तिवारी अशोक सुर्यदेव | ३ | सना खलील देशमुख | |
| ४ | पंकज पांडेय (दरोगा) | ४ | जय राजेंद्र ठाकूर | |
| ५ | मयेकर रजनीकांत पांडुरंग | ५ | तारेन वेंचर मेंडोन्सा | |
| ६ | गोहील शानू जोरावरसींग | ६ | शेख रुबिना फिरोज | |
| ७ | दत्ता जया रथीन | ७ | आयरिन पॉल कॉड्रस | |
| ८ | सिंह मदन उदितनारायण | ८ | अनिल दिवाकर सावंत | |
| ९ | दिव्या प्रसाद परब | ९ | रफिक गुलाब पठाण | |
| १० | योगिता सतीशचंद्र शर्मा | १० | आफरीन मुझफ्फर हुसेन सय्यद | |
| ११ | गणेश गोपाळ शेट्टी | ११ | सौ.रुबिना फैजूल्ला शेख | |
| १२ | तरुण सुभाष शर्मा | १२ | अशरफ अहमद मिस्त्री | |
| १३ | स्मिता विशाल पाटील | १३ | शॉन लिओ कोलासो | |
| १४ | प्रेमनाथ गजानन पाटील | १४ | पाटील वंदना विकास | |
| १५ | गुप्ता कुसुम संतोष | १५ | बगाजी शर्मिला विन्सन | |
| १६ | पुरोहीत मधुसूदन मनोहरलाल | १६ | डिमेलो फ्रिडा बर्नड | |
| १७ | वंदना मंगेश पाटील | | | |
| १८ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| १९ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | | | |
| २० | मेबल नोएल कोरीया | | | |
| २१ | जैन सुनिता रमेश | | | |
| २२ | परेश जयंतीलाल शाह | | | |
| २३ | कोठारी भरतकुमार नथमलजी | | | |
| २४ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | | | |
| २५ | डॉ. भव्या पिपलिया (शाह) | | | |
| २६ | आभा अमेय पाटील | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| २७ | ॲड. रवि व्यास | | |
| २८ | किमया सुहास रकवी | | |
| २९ | कोमल विठ्ठल नावन्धर | | |
| ३० | भगवती तुगनचंद शर्मा | | |
| ३१ | सुरेश खंडेलवाल | | |
| ३२ | महेश नरेश म्हात्रे | | |
| ३३ | विरकर आकांक्षा शंकर | | |
| ३४ | सावंत दिपक कल्याणराव | | |
| ३५ | करुणा किशोर पाटील | | |
| ३६ | डोंगरे सचिन सुरेश | | |
| ३७ | विशाल जगन्नाथ पाटील | | |
| ३८ | लक्ष्मण गणपत जंगम | | |
| ३९ | मेहता डिंपल विनोद | | |
| ४० | स्नेहा शैलेश पांडे | | |
| ४१ | गेहलोत हसमुख मोहनलाल | | |
| ४२ | रुपाली शिंदे मोदी | | |
| ४३ | वैती विजया हेमचंद्र | | |
| ४४ | जैन प्रिती चंद्रकांत | | |
| ४५ | थेराडे संजय अनंत | | |
| ४६ | ज्योत्सना जालींदर हसनाळे | | |
| ४७ | पारधी तुषार यशवंत | | |
| ४८ | यशोदा अनिल ताटे | | |
| ४९ | मोहन गोपाळ म्हात्रे | | |
| ५० | सुरेखा प्रकाश सोनार | | |
| ५१ | मनस्वी प्रमोद पाटील | | |
| ५२ | मनिष प्रितम पराशर | | |
| ५३ | अनिता जयवंत पाटील | | |
| ५४ | जाट प्रतिभा चंदु | | |
| ५५ | भावसार वंदना संजय | | |
| ५६ | नवीन गुप्तेश्वर सिंह | | |
| ५७ | आनंद दत्ताराम मांजरेकर | | |
| ५८ | अरोरा दिपीका पंकज | | |
| ५९ | बेलानी हेमा राजेश | | |
| ६० | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | |
| ६१ | निर्मला बाबुराव सावळे | | |
| ६२ | ॲड. मयुरी सचिन म्हात्रे | | |
| ६३ | विवेक महेंद्र उपाध्याय | | |
| ६४ | परमार हेतल रतीलाल | | |
| ६५ | भट दिप्ती शेखर | | |
| ६६ | संजय बाळाजी पवार | | |
| ६७ | जैन दिनेश तेजराज | | |
| ६८ | कांबळी श्रध्दा सुधीर | | |
| ६९ | सिमा कमलेश शाह | | |
| ७० | दुबे मनोज रामनारायण | | |
| ७१ | अनिल रवजीभाई विराणी | | |
| ७२ | नयना गजानन म्हात्रे | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ७३ | भानुशाली वर्षा गिरधर | | |
| ७४ | संजय वसंत थरथरे | | |
| ७५ | भोईर जयेश भानुदास | | |
| ७६ | भोसले अनिल बाबुराव | | |

**ठराव बहूमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**महापालिका सचिव :-**

प्रकरण क्र. ०८, मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभाग सन २०२६-२७ व २०२७-२८ या दोन शैक्षणिक वर्षाकरीता महानगरपालिका प्राथमिक/माध्यमिक शाळेतील विदयार्थ्यांना विविध कल्याणकारी योजने अंतर्गत डी.बी.टी या योजनेद्वारे शालेय दप्तर, बुट, मोजे या वस्तु स्वरुपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतरण रोख स्वरुपात थेट विदयार्थ्यांच्या बँक खात्यात (DBT) करणेकरीता बाजारभाव ऑनलाईन दर मागविणेबाबत.

**प्रशांत दळवी :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एकुण ३६ प्राथमिक व माध्यमिक शाळा कार्यरत आहेत. सदर शाळेमध्ये अंदाजित १० हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सन २०२६-२७ व सन २०२७-२८ या दोन शैक्षणिक वर्षाकरीता विविध कल्याणकारी योजने अंतर्गत DBT या योजनेद्वारे शालेय दफ्तर, बुट, मोजे या वस्तु स्वरुपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतरण रोख स्वरुपात थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात DBT व्दारे करण्यात येणार आहे. सन २०२५-२६ मध्ये कल्याणकारी योजने अंतर्गत DBT या योजनेद्वारे शालेय दफ्तर, बुट, मोजे या वस्तु स्वरुपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतरण रोख स्वरुपात थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात DBT करणेकामी रु.१,०५,४५,४६१/- इतकी रक्कम अदा करणेकामी मा. प्रशासकीय ठराव क्र.१७६ दि.२९/०७/२०२५ अन्वये मंजुरी प्राप्त करुन रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

सन २०२६-२७ व सन २०२७-२८ या दोन शैक्षणिक वर्षाकरीता विविध कल्याण योजने अंतर्गत DBT या योजनेद्वारे शालेय दफ्तर, बुट, मोजे या वस्तु स्वरुपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतरण रोख स्वरुपात थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात DBT करणेकरीता खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ. क्र. | विषय | सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात आलेला खर्च | सन २०२६-२७ मध्ये १०% वाढ पकडुन येणारा अंदाजित खर्च | सन २०२७-२८ मध्ये १०% वाढ पकडुन येणारा अंदाजीत खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांकरीता दफ्तर, बुट, मोजे | **रु.१,०५,४५,४६१/-** | **रु.१,१६,००,००७/-** | **रु.१,२७,६०,००७/-** |

वरील तक्यात नमुद प्रमाणे सन २०२६-२७ व सन २०२७-२८ या दोन शैक्षणिक वर्षाकरीता तरतुद करण्यात येणार आहे.सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात शासन निर्णय क्रं.डीसीटी २३१६/प्र.क्र.१३३/का-१४१७ दि.०५/१२/२०१६ रोजीच्या शासन निर्णया नुसार DBT स्वरुपात महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय दफ्तर व बुट मोजे करीता थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात रक्कम जमा करण्यात आली होती. परंतु सदर बँक खात्यात जमा होणाऱ्या रक्कमेमधुन मनपा शाळेतील विद्यार्थी नवीन शालेय दफ्तर व बुट मोजे यांची खरेदी करीत नसुन शाळेत येताना पायात जुने बुट मोजे, जुने दफ्तर घेऊन येत असल्याचे निर्दशनास येत आहे. त्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांचे दफ्तर, बुट मोजे यामध्ये समानता दिसुन येत नाही.

त्यामुळे सन २०२६-२७ व सन २०२७-२८ या दोन शैक्षणिक वर्षाकरीता DBT स्वरुपात महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय दफ्तर व बुट मोजे या वस्तुस्वरुपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतरण रोख स्वरुपात थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा न करता सदर वस्तुंचा पुरवठा करणेकामी ऑनलाईन निविदा मागविण्यांस ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**ज्योत्सना हसनाळे :-**

माझे अनुमोदन आहे.

**दिनेश जैन :-**

याच्यामध्ये माझी एक सुचना आहे महापौर मॅडम, आता महाराष्ट्र शाासनाने एक जी.आर. काढलेला आहे याच्यामध्ये दप्तर, बुट, मोजे सर्व शाळांना महाराष्ट्रामध्ये फ्री देणार आहेत. याच्यामध्ये माझी अशी सुचना आहे की ते जर फ्री भेटत असेल तर आपण शासनाकडून ते जर दप्तर देत असतील ते घ्या म्हणजे आपल्या महानगरपालिकेचे पैसे वाचतील अशी माझी सुचना आहे.

**मा. महापौर :-**

सुचना नमुद करावी.

**रुबिना फिरोज शेख :-**

सब से पहले मॅम आपको और उपमहापौर को बहूत बहूत दिल से हार्दिक शुभेच्छा और इस सदन मे आनेवाले तमाम लोगो को मेरी शुभेच्छा है। मॅम मे डायरेक्ट मुद्दे पर आवू तो ये जो डी.बी.टी. डायरेक्ट बेनिफीट ट्रास्फर का जो हम मुद्दा ले रहे है उसमे कई पॅरेंट् से बात होने के बाद पॅरेंट को कंफ्युझन रहता है की उनके बँक मे उनके अकाऊंट नही रहते है और काफी सारी दिक्कते उनको उठानी पडती है, तो मेरा एक एसा सजेशन रहेगा की जीस तऱ्हा हम बॅग और दुसरी चिजे देते है तो यह सारी चिजे हम उनको डीरेक्टली दे ताकी वो नाहो। दुसरी बात मॅडम, बहूत इमपॉर्टंट है मीरा रोड मे एक भी बालवाडी, अंगणवाडी नही है तो मै आप लोगो से रिक्वेस्ट करुंगी की उसको नोंटीस पे लिया जाये की मिरा रोड मे बालवाडी का अरेंजमेंट किया जाए क्यो की ऐ बहूत जरुरी है। तिसरा सब से इमपॉर्टंट सुचना यह है मॅम आपके साथ पहले भी काम करने का अनुभव हो चूका है जो बहूत ही अच्छा रहा है आपने ऐज्युकेशन के लिये और बच्चो के लिये बहोत अच्छा सोचा है। मिरा भाईंदर की जो स्कूल नं.३४ है जो उर्दु म्युनसिपल स्कूल है रसाज मे वहा पे मॅम निचे ग्राऊंड फ्लोर जो है वह TB का सेंटर है वहा पे TB पेशंट आते है और उसी गेट से बच्चे उपर जाते है तो यह एक बहूत सेन्सीटीव्ह मुद्दा हो गया है इस वक्त वहापे बच्चो की तादात बढ गई है इस वक्त ९ और १० मे ४६ बच्चे पढ रहे है छोटे बच्चे भी आते है और तीन बच्चे सस्पेक्टेड है की वह अफेक्ट हो चुके है तो यह मेरी रिक्वेस्ट है काम अभी शुरु है लेकीन एक साल हो चुका है काम पुरा नही हूवा है की TB सेंटर का दरवाजा और स्कूल का दरवाजा हम अलग करे, काम ऑलरेडी शुरु है बस आप अगर ऑर्डर दे आप इसमे इंट्रेस ले तो वो दरवाजे अलग अलग होने का काम बहूत जलदी शुरु हो सकता है यह बच्चो के स्वास्थ के लिये बहूत जरुरी है। चौथा मॅम, आपको यह बोलना चाहूँगी की स्कूल मे टिचर्स का अपॉईमेंट जिस मे मेने पहील बार भी हमारी बात हूई थी पिढले टर्म मेभी अब १० बढता जा रहा है ९ और १० मे सब्जेक्ट व्हाईज टिचर अपॉईंट किये जाये मॅडम हमारे म्युन्सीपल स्कूल चाहे ओ उर्दु मेडियम के हो चाहे वो मराठी मेडियम के हो बहूत जादा ब्रिलियंट और शानदार बच्चे है। अगर हमने उन्हे अच्छे टिचर्स दिये सबजेक्ट व्हाईज टिचर दिये तो वो हमारे बच्चो का जो मुस्तकबिल है जो फ्युचर है वह आगे बहूत शानदार होने के चांसेस है। और उसकी जिम्मेदारी हम लोकप्रतिनिधी पे आती है। इसके अलावा मॅम कुछ स्कूलो मे स्पोट्स की चिजे है बुक्स है लाईब्ररी जैसी बनी हूई है पर वहा पर बुक्स रखने के लिये अरेंजमेंट नही है तो वहापे बच्चो ने उनके पॅरेंट ने और टिचर्स ने मुझसे या आपसे निवेदन करने के लिये कहा है की वहा पे इंफ्रास्ट्रक्चर पे थोडा ध्यान दिया जाये जैसे कबड्स वगैरा और इस बार भी तमाम लोगो के लिये जो आपने सुविधाये दि है बच्चो के लिये वह बहूत शानदार है बस जरुरत इस बात की है की हम उनको अच्छे टिचर्स मोहिय्या करा सके अच्छे टिचर्स सबजेक्ट व्हाईज जेसे प्राईव्हेट स्कूल मे होते है तो हम देखेंगे की हमारा शहर सहीमे विकास करेगा, जय हिंद जय महाराष्ट्र।

**निर्मला सावळे :-**

महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते मॅडम आपण हा जो विषय आणलेला आहे सुरुवातीला तुमचे खरोखर अभिनंदन आणि प्रशासन आयुक्त साहेब उपमहापौर आपलेही अभिनंदन.मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आवारामध्ये ३६ शाळा आहेत आपण ९ वी १० वी चे पण वर्ग सुरु केलेले आहेत माझी सुचना आहे की मुलांना जुन ते जुलैच्या अगोदर हे साहित्य वाटप झाले पाहिजे. बराच कालावधी निघून जातो तर प्रशासनाने याची लवकरात लवकर अंमलबजावणी करुन मुलां पर्यंत हे साहित्य वाढप झाले पाहिजे.

**मा. महापौर :-**

हा विषय लवकर करायचा आहे म्हणून आपण आज हा विषय घेतलेला आहे. आणि रुबिना मॅडमने जे सांगितले आहे ते प्रशासनाने त्याची नोंद घ्यावी त्यांचे जे सर्व विषय आहेत ते करुन घ्यावेत लवकरात लवकर त्या सोयी सुविधा व्हायला पाहिजे.

**शर्मिला बगाजी:-**

महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलते पहिल्या प्रथम आपण ज्या सुचना घेतल्या त्या खरच वाखांडण्या जोग्या आहेत आणि त्या अतिशय अगरेच्या होत्या आताच निर्मला मॅडम बोलल्या तीच सुचना आहे की मॅडम आपण

दर वर्षी महासभा, स्थायी समिती तीन वर्ष सोडून आपण दर वेळेला आपण सगळे प्रशासनाला त्यांची परतुद आणि आपण त्यांना निधी उपलब्ध करुन देतो परंतु प्रशासना मार्फत हे वाटप असते युनिट टेस्ट संपते कधी कधी सहामाही होते तोपर्यंत देखील आपल्याला पुर्ण फ्लेज आपण ते मुलां पर्यंत पोहोचत नाही एक तर दप्त पोहोचते तर बुट पोहचत नाही बॉटल पोहचते तर पुस्तक पोहोचत नाही तर ह्या वर्षी आपण जुनच्या पहिल्या आठवड्यामध्ये शाळा सुरु व्हायच्या दोन दिवस आधी पासूनच ह्या सगळ्या स्कुलमध्ये वाटप केले पाहिजे. आपल्या प्रशासना बद्दल एक खंत आहे की जेव्हा प्रशासन वाटप करते त्यावेळेचे आपले फोटो टाकतात आणि सगळ्या लोकांना काय वाटते की पुर्ण पणे आपण प्रशासनाला सगळ्या शाळेमध्ये पुरवलेले असते परंतु ते तस दिसत नाही. फक्त तात्पुरत्या त्यांच्या कार्यक्रमा पुरते ते दिसतं आणि नंतर त्या लोकांना आपण विचारपूस केली माझ्या इथे पण तीन महापालिकेच्या शाळा आहेत उत्कृष्ठ अशा शाळा आहेत शिक्षक आहेत आपण तिथे चांगल्या सुविधा उपलब्ध केलेल्या आहेत पण पोरांपर्यंत हातात दप्तरच नसेल तर त्याचा काही फायदा नाही. आपण जशा सुचना दिलेल्या आहेत त्याचा तंतोतंत पालन व्हावे आणि जुनच्या पहिल्या आठवड्यात हे सगळ दप्तरा सहीत मुलांना गणवेशा सहीत पुर्ण मुलांपर्यंत पोहोचावे ही नंम्र विनंती.

**हेतल परमार :-**

मॅडम, मिरा रोड के पास गुजराथी स्कूल है वहापे हम आये दिन जाते आते है वहापे भी इमारत के अंदर बहूत सारी प्रॉब्लेम है जैसे वॉशरुम होगया बेंचेस की प्रॉब्लेम है तो वहापे बहूत सारी ऐसी चिजे है जो ध्यान मे रख के आप एकबार व्हीजीट किजीए देखीए वहापे कुछ चिजे है जो करने लायक है l

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम, रुबिना मॅडमने जी सुचना केलेली आहे ती खरोखरच अंमलात आणण्या सारखी आहे तिथे आपलं साफसफाई विभागाचे साहित्य पडलेलं असतं कामगार तिथेच असतात. मेडिकल डिपार्टमेंट आहे तिथे TB चे पेशंट येतात तर ह्या दोन गोष्टी जर आपण हैदरी कम्युनिटीला शिफ्ट केल्या आयुक्त साहेब तर ती पुर्ण शाळा आज ४०० विद्यार्थी आहेत ती पुर्ण शाळा विद्यार्थांसाठी राहू शकेल. आणि काही शाळा ज्या आपल्या ३४ शाळा आहेत विद्यार्थी संख्या वाटत आहे. काही शाळांमध्ये जो बांधकाम विभागाचा विषय आहे रंगरंगोटी आहे पिण्याचा पाण्याची व्यवस्था आहे वॉशरुमची व्यवस्था आहे त्याच्यावर सुध्दा लक्ष देणे फार गरजेचे आहे. मॅडम, काशीगांव इलेक्शन सेंटर होतं त्यावेळी तिथे जो इलेक्शन स्टाफ होता त्याने अस सांगितं की सकाळी मी ५ वाजता आले रात्री ९ वाजता गेले मधल्या काळामध्ये वॉशरुमला मी जावू शकली नाही एवढी घाणेरळी परिस्थिती होती. मग मुल कशी जात असतील ? आपलं वेगळ बजेट आहे लोक टॅक्स देतात त्यातुन जर ह्या संपुर्ण शाळांचा आढावा घ्या आणि ह्या सुविधा मुलांना उपलब्ध करुन द्या आणि हैदरी सेंटर बाबतची आमची जी सुचना आहे ती लवकरात लवकर अंमलात आणावी धंन्यवाद.

**मा. महापौर :-**

प्रशासनाने सर्व विषयावर नोंद घ्यावी आणि लवकरात लवकर जे विद्यार्थांचे साहित्य आहे ते वाटप करुन घ्यावे आणि ज्या पण सुचना मिरा रोड आणि सर्व मॅडमने सांगितलेल्या आहेत तुम्ही ठरावामध्ये त्याची नोंद करुन घ्या.

**प्रशांत दळवी :-**

मॅडम ठराव सर्वानुमते पास करण्या अगोदर माझी एक सुचना असेल मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शाळांमध्ये विद्यार्थांना आपण खाजगी शाळेत जस शिक्षण मिळते त्या धर्तीवरती आपण ह्या ठिकाणी शिक्षण देण्याचा प्रयत्न करतो. असे असताना महापौर मॅडम, आपल्या शाळेत येणाऱ्या विद्यार्थीचे गणवेश पण असे स्मार्ट असायला हवेत आपण प्रत्येक वेळेला तेच तेच गणवेशामध्ये रहावे माझी तुम्हाला सुचना असणार आहे. कारण येथे येणारे पालक वर्ग आणि नागरीकांमध्ये ती चर्चा आहे की तुम्ही आपल्या शाळा अत्याधुनिक शाळा बनवत असाल तर मग ह्या गणवेशचाही उपमहौर साहेब आपल्यालाही विनंती असेल आपणही त्या संदर्भामध्ये.......

**शॉन कोलासो :-**

मॅडम, DBT च्या बाबतीमध्ये एक सुचना आहे तुमची परवानगी असेल तर मी मांडू इच्छीतो. सर्व प्रथम आपले अभिनंदन. ध्रुवकिशोर पाटील साहेब आपले देखील अभिनंदन DBT चा विषय आहे आणि आपल्याला माहित आहे आजचा काळ वेगाने बदलत आहे. सन्मा. सदस्यांनी माहिती दिली की DBT च्या माध्यमातुन जी आपण वस्तु देणार आहोत ते राज्य शासन देणार आहे. मग DBT चा जो निधी आहे तो आपण स्वतंत्र घटक म्हणून डिजीटल लर्निग कंम्पोनंट समाविष्ठ करण्यासाठी विचार करुन शकतो का? म्हणजे महानगरपालिकेच्या शाळेमध्ये AI कोडींग रोबोटीक्स कौशल्य शिकविणाऱ्या शासन मान्य संस्थांना ह्या कक्षेत आणण्यासाठी आपण विचार करावा. खाजगी

शाळेमध्ये मुलांना आर्टीफिशल इंटेलिजेंटची ओळख दिली जाते पण आपल्या महानगरपालिकेच्या शाळेत तशी सुविधा उपलब्ध नाही म्हणून DBT चा निधी विनियोग त्या गोष्टीसाठी करावा अशी माझी सुचना आहे.

**मा. महापौर :-**

तुमचा विषय चेंज होत आहे आपला विषय वेगळा आहे तुमची जी पण सुचना असेल तुम्ही प्रशासनाला अवगत करावे ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ०८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभाग सन २०२६-२७ व २०२७-२८ या दोन शैक्षणिक वर्षाकरीता महानगरपालिका प्राथमिक/माध्यमिक शाळेतील विदयार्थ्यांना विविध कल्याणकारी योजने अंतर्गत डी.बी.टी या योजनेद्वारे शालेय दप्तर, बुट, मोजे या वस्तु स्वरुपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतरण रोख स्वरुपात थेट विदयार्थ्यांच्या बॅंक खात्यात (DBT) करणेकरीता बाजारभाव ऑनलाईन दर मागविणेबाबत.

**ठराव क्र. ०८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एकुण ३६ प्राथमिक व माध्यमिक शाळा कार्यरत आहेत. सदर शाळेमध्ये अंदाजित १० हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सन २०२६-२७ व सन २०२७-२८ या दोन शैक्षणिक वर्षाकरीता विविध कल्याणकारी योजने अंतर्गत DBT या योजनेद्वारे शालेय दफ्तर, बुट, मोजे या वस्तु स्वरुपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतरण रोख स्वरुपात थेट विद्यार्थ्यांच्या बॅंक खात्यात DBT व्दारे करण्यात येणार आहे. सन २०२५-२६ मध्ये कल्याणकारी योजने अंतर्गत DBT या योजनेद्वारे शालेय दफ्तर, बुट, मोजे या वस्तु स्वरुपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतरण रोख स्वरुपात थेट विद्यार्थ्यांच्या बॅंक खात्यात DBT करणेकामी रु.१,०५,४५,४६१/- इतकी रक्कम अदा करणेकामी मा. प्रशासकीय ठराव क्रं.१७६ दि.२९/०७/२०२५ अन्वये मंजुरी प्राप्त करुन रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

सन २०२६-२७ व सन २०२७-२८ या दोन शैक्षणिक वर्षाकरीता विविध कल्याण योजने अंतर्गत DBT या योजनेद्वारे शालेय दफ्तर, बुट, मोजे या वस्तु स्वरुपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतरण रोख स्वरुपात थेट विद्यार्थ्यांच्या बॅंक खात्यात DBT करणेकरीता खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ. क्र. | विषय | सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात आलेला खर्च | सन २०२६-२७ मध्ये १०% वाढ पकडुन येणारा अंदाजित खर्च | सन २०२७-२८ मध्ये १०% वाढ पकडुन येणारा अंदाजीत खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांकरीता दफ्तर, बुट, मोजे | **रु.१,०५,४५,४६१/-** | **रु.१,१६,००,००७/-** | **रु.१,२७,६०,००७/-** |

वरील तक्यात नमुद प्रमाणे सन २०२६-२७ व सन २०२७-२८ या दोन शैक्षणिक वर्षाकरीता तरतुद करण्यात येणार आहे.सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात शासन निर्णय क्रं.डीसीटी २३१६/प्र.क्र.१३३/का-१४१७ दि.०५/१२/२०१६ रोजीच्या शासन निर्णया नुसार DBT स्वरुपात महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय दफ्तर व बुट मोजे करीता थेट विद्यार्थ्यांच्या बॅंक खात्यात रक्कम जमा करण्यात आली होती. परंतु सदर बॅंक खात्यात जमा होणाऱ्या रक्कमेमधुन मनपा शाळेतील विद्यार्थी नवीन शालेय दफ्तर व बुट मोजे यांची खरेदी करीत नसुन शाळेत येताना पायात जुने बुट मोजे, जुने दफ्तर घेऊन येत असल्याचे निर्दशनास येत आहे. त्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांचे दफ्तर, बुट मोजे यामध्ये समानता दिसुन येत नाही.

त्यामुळे सन २०२६-२७ व सन २०२७-२८ या दोन शैक्षणिक वर्षाकरीता DBT स्वरुपात महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय दफ्तर व बुट मोजे या वस्तुस्वरुपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतरण रोख स्वरुपात थेट विद्यार्थ्यांच्या बॅंक खात्यात जमा न करता सदर वस्तुंचा पुरवठा करणेकामी ऑनलाईन निविदा मागविण्यांस ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी** **अनुमोदन :- श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. दिनेश जैन यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

शाळेय विद्यार्थ्यांना शासनामार्फत दफ्तर मोफत देण्याचे आदेश पारित केला आहे. आपण आपल्या स्तरावर तपासुन जर शासनामार्फत दफ्तर मोफत मिळत असेल तर शासनाकडून घेण्यात यावे.

**सुचनेसह ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**महापालिका सचिव :-**

प्रकरण क्र. ०९, मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभाग सन २०२६-२७ व २०२७-२८ या दोन शैक्षणिक वर्षाकरीता (बालवाडी ते दहावी) मनपा शाळेतील मुला व मुली करीता शालेय गणवेश, पि. टी युनिफॉर्म, वह्या, वॉटर बॉटल खरेदी करणेकामी निविदा मागविणेबाबत.

**ज्योत्सना हस्नाळे :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील एकुण ३६ प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांकरिता सन २०२६-२७ व सन २०२७-२८ या दोन शैक्षणिक वर्षाकरीता मनपा शालेय विदयार्थ्यांना शालेय गणवेश, पि.टी. युनिफॉर्म, वह्या, वॉटर बॉटल यांचा पुरवठा करावयाचा आहे.

सन २०२६-२७ व सन २०२७-२८ या दोन शैक्षणिक वर्षाकरीता मनपा शाळेतील विद्यार्थी यांना शालेय गणवेश, पि.टी. युनिफॉर्म, वह्या, वॉटर बॉटल यांचा पुरवठा करणेकामी खालीलप्रमाणे अंदाजित खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र | इयत्ता | लेखाशिर्ष | सन २०२६-२७ करीता अंदाजे खर्च | सन २०२७-२८ करीता अंदाजे खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | बालवाडी ते इयत्ता १० अंदाजे पटसंख्या १०२७५ | विदयार्थ्यांना गणवेश / बॅच/ टाय/पी. टी. युनिफॉर्म | रु.२,६६,७१,२७०/- | रु.२,९३,३८,३९७/ |
| २ | इयत्ता १ ली ते १० वी अंदाजे पटसंख्या १०२७५ | शालेय विद्यार्थी वह्या व इतर साहित्य | रु.१,११,११,९५५/- | रु. १,२२,३१,५०५/- |
| ३ | इयत्ता १ ली ते १० वी अंदाजे पटसंख्या १०२७५ | शालेय विद्यार्थी करिता वॉटर बॉटल | रु.१९,५२,२५०/- | रु.२१,४७,४७५/- |

सन २०२६-२७ व सन २०२७-२८ या दोन शैक्षणिक वर्षाकरीता बालवाडी ते इयत्ता १० वी पर्यंतच्या मनपा शाळेतील विद्यार्थ्यांकरीता शालेय गणवेश, बॅच, पि.टी. युनिफॉर्म, वह्या वॉटर बॉटल व इतर साहित्य खरेदी करण्याकरीता सन २०२६-२७ करीता ४ कोटी व सन २०२७-२८ करीता ४.५० कोटी इतक्या अपेक्षित खर्चास व साहित्य खरेदी करणेकरीता ऑनलाईन निविदा मागविणेसाठी ही सभा मान्यता देत आहे.

**हेतल परमार :-**

माझे अनुमोदन आहे.

**संजय थेराडे :-**

महापौर मॅडम, मला ह्याबदल एक सुचना करायची आहे महापौर मॅडम, माझी एक सुचना आहे महानगरपालिकेच्या शाळा आणि ह्या प्रायव्हेट शाळा त्यामध्ये युनिफार्मचा फरक आपल्याला कळतो यावेळी आपल्या महानगरपालिकेच्या शाळांना जे युनिफार्म देणार आहोत ते स्वच्छ स्मार्ट आणि आधूनिक तऱ्हेचा असावा जेणे करुन ते कळणार नाही की महानगरपालिकेचा गणवेश आहे की प्रायव्हेय शाळेचा गणवेश आहे. ह्या वर्षी गणवेशात सुधारणा करुन प्रायव्हेट शाळेचा लेव्हलचा आणि आधुनिक पध्दतीचा स्मार्ट गणवेश देण्यात यावा ही सुचना आहे.

**मा. महापौर :-**

सुचने सहित ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**दिनेश जैन :-**

महापौर मॅडम, गोषवाऱ्यामध्ये १ ली ते १० वी चे क्लास लिहून दिलेले आहेत. पहिलीमध्ये किती विद्यार्थी आहेत दुसरीमध्ये किती आहेत अशी पटसंख्या लिहून दिली तर बर होईल कारण की ह्याच्यामध्ये आपल्याला माहित पडेल की पहिलीचे गणवेश कितीचे आहेत आणि १० वीचे कितीचे आहेत.

**वर्षा भानुशाली :-**

महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलतो ३६ प्राथमिक शाळा आहे आणि मुले १० हजार आहेत ते १० हजारच मुले प्रत्येक वर्षी राहतात पण मुलं काही वाटत नाहीत. बुट, गणवेश यावर एवढा खर्च आपण करतो एवढी सुविधा देतो पण विद्यार्थीची संख्या ती का वाढत नाही त्याच्यासाठी पण आपल्याला विचार करायला पाहिजे अशी माझी सुचना आहे.

**मा. महापौर :-**

याची नोंद घ्यावी पूढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ०९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभाग सन २०२६-२७ व २०२७-२८ या दोन शैक्षणिक वर्षाकरीता (बालवाडी ते दहावी) मनपा शाळेतील मुला व मुली करीता शालेय गणवेश, पि. टी युनिफॉर्म, वह्या, वॉटर बॉटल खरेदी करणेकामी निविदा मागविणेबाबत.

**ठराव क्र. ०९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील एकुण ३६ प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांकरिता सन २०२६-२७ व सन २०२७-२८ या दोन शैक्षणिक वर्षाकरीता मनपा शालेय विदयार्थ्यांना शालेय गणवेश, पि.टी. युनिफॉर्म, वह्या, वॉटर बॉटल यांचा पुरवठा करावयाचा आहे.

सन २०२६-२७ व सन २०२७-२८ या दोन शैक्षणिक वर्षाकरीता मनपा शाळेतील विद्यार्थी यांना शालेय गणवेश, पि.टी. युनिफॉर्म, वह्या, वॉटर बॉटल यांचा पुरवठा करणेकामी खालीलप्रमाणे अंदाजित खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र | इयत्ता | लेखाशिर्ष | सन २०२६-२७ करीता अंदाजे खर्च | सन २०२७-२८ करीता अंदाजे खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | बालवाडी ते इयत्ता १० अंदाजे पटसंख्या १०२७५ | विदयार्थ्यांना गणवेश / बॅच/ टाय/पी. टी. युनिफॉर्म | रु.२,६६,७१,२७०/- | रु.२,९३,३८,३९७/ |
| २ | इयत्ता १ ली ते १० वी अंदाजे पटसंख्या १०२७५ | शालेय विद्यार्थी वह्या व इतर साहित्य | रु.१,११,११,९५५/- | रु. १,२२,३१,५०५/- |
| ३ | इयत्ता १ ली ते १० वी अंदाजे पटसंख्या १०२७५ | शालेय विद्यार्थी करिता वॉटर बॉटल | रु.१९,५२,२५०/- | रु.२१,४७,४७५/- |

सन २०२६-२७ व सन २०२७-२८ या दोन शैक्षणिक वर्षाकरीता बालवाडी ते इयत्ता १० वी पर्यंतच्या मनपा शाळेतील विद्यार्थ्यांकरीता शालेय गणवेश, बॅच, पि.टी. युनिफॉर्म, वह्या वॉटर बॉटल व इतर साहित्य खरेदी करण्याकरीता सन २०२६-२७ करीता ४ कोटी व सन २०२७-२८ करीता ४.५० कोटी इतक्या अपेक्षित खर्चास व साहित्य खरेदी करणेकरीता ऑनलाईन निविदा मागविणेसाठी ही सभा मान्यता देत आहे.

**सुचक :- श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे** **अनुमोदन :- श्रीम. हेतल परमार**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. संजय अनंत थेराडे यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

आपल्या पालिका शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये कोणतेही न्युनगंडाची भावना राहू नये म्हणून गणवेश हा आधुनिक, स्वच्छ, स्मार्ट आणि चांगल्या शाळांच्या तोडीचा असणे गरजेचे आहे.

**सुचनेसह ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**महापालिका सचिव :-**

प्रकरण क्र. १०, मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाडेतत्त्वावर आधारीत मालमत्ता कर दरांचे फेरबदल करुन सुधारीत दर मंजूर करण्याबाबत.

**मधुसूदन पुरोहीत:-**

सन २०१८ पूर्वी मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भाडेकरारनामा करुन व्यवसाय करणाऱ्या आस्थापनांना उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार करारनामातील मालमत्तेचे वार्षिक भाडे रक्कमेतुन १०% वजावट करुन उर्वरीत रक्कमेस मालमत्तेस करयोग्य मूल्य निश्चित करुन करयोग्य मूल्यावरुन विविध करांची टक्केवारी नुसार कर आकारणी करण्यात येत होती.

तथापि, सदर कर आकारणी धोरणामुळे भाडे करारनामाव्दारे व्यवसाय करणाऱ्या आस्थापनांना प्रत्यक्ष भाडे रक्कमेच्या ९०% रक्कमेवर कराची आकारणी होत असल्याने कर आकारणीत सवलत देणे तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत विविध आस्थापने येऊन उद्योगास चालना मिळणे हेतु मा. महासभा ठराव क्र. ६२ दि. २०/०२/२०१८ अन्वये झालेल्या ठरावात कोणताही फेरबदल न करता भाडे करारनामाव्दारे व्यवसाय करणारे अनिवासी आस्थापनांना मालमत्ता कराची आकारणी करताना करारनामातील वार्षिक भाडे रक्कम ऐवजी सदर

वार्षिक भाडे रक्कमेच्या २०% रक्कम वार्षिक भाडे रक्कम अथवा रु. १०/- प्र.चौ. फु. यापैकी जे जादा असेल त्यादराने मालमत्ता कराची आकारणी करावी.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सातत्याने लोकसंख्या वाढत आहे. तसेच मिरा भाईंदर शहर रेल्वे व बसेसद्वारे मुंबई शहराशी जोडले असल्याने शहरातून मोठ्या प्रमाणामध्ये लोक सदनिका/ घरे खरेदी करुन स्थलांतरीत होत असतात. शहराचा मोठ्या प्रमाणावर विकास होत असल्याने शहरातील जागा, फ्लॅट, दुकाने यांचे बाजार भावात त्याप्रमाणे वाढ होत आहे.

तसेच शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता महानगरपालिकेने विविध विकासकामे हाती घेतले आहेत. महानगरपालिकेने यापुर्वी घेतलेले कर्ज व भविष्य काळातील विकास कामाकरीता घ्यावी लागणारी कर्जे याची परतफेड महानगरपालिकेच्या नविन उत्पन्नाच्या स्त्रोतातुनच करावी लागणार आहे. कर्जाची परतफेड, शहराच्या विकास कामासाठी उत्पन्न वाढविणे तितकेच आवश्यक होऊन बसले आहे.

सद्यस्थितीत मिरा भाईंदर महानगरपालिकेचा झपाटयाने विकास होत असून काजूपाडा, वर्सोवा गाव, चेणा वगळता शहरातील इतर गावठणांचे देखील शहरीकरण झालेले असून सदर गावे वगळता इतर गावांमध्ये मोठया प्रमाणावर इमारतींचे विकासकामे सुरु आहेत.

महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांना कर आकारणी करणेसाठी मा. महासभा ठराव क्र. ६० दि. २०/०२/२०१८ चे ठरावा नुसार दर निश्चित करण्यांत आले व त्याअनुषंगाने मालमत्ता कराच्या आकारणीकरीता दर ग्राहय धरुन मालमत्ता कराची आकारणी करण्यांत येते. परंतू आजमितीस ८ वर्षाचा कालावधी उलटुन देखील सदर दरामध्ये कोणतेही बदल करण्यात आलेली नाही. तसेच मुंबई महानगर क्षेत्रातील इतर महानगरपालिकांचे दरांच्या तुलनेत मिरा भाईंदर महानगरपालिकेतील दर हे कमी आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ९९ अन्वये कर व दर ठरविण्याचे अधिकार महासभेस आहेत. त्यामुळे मा. महासभा ठराव क्र. ६० दि. २०/०२/२०१८ चे ठरावा नुसार निश्चित केलेल्या वाजवी वार्षिक भाडे मूल्य दरात बदल करुन यापुढे नविन विकसीत होणाऱ्या मालमत्तांना नविन कर आकारणी खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे वाजवी वार्षिक भाडे मूल्य दर ग्राह धरुन कर आकारणी करणेस उचित वाटते.

| अ. क्र. | विभागाचे नाव | इमारतीचा प्रकार | प्रती चौरस फुट प्रती महिना | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | जुने दर | | प्रस्तावित केलेले दर | |
| | | | निवासी | बिगर निवासी | निवासी | बिगर निवासी |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | मिरा रोड (पुर्व) भाईंदर पुर्व व पश्चिम | अ- आर. सी. सी. | रु.२.४० | रु.४.५० | रु. ४.०० | रु. ६.०० |
| | | ब- लोड बेअरींग सिमेंट शिट्स व कौलारु | रु.२.१० | रु.३.७५ | रु. ४.०० | रु. ६.०० |
| | | क- माती विटा कौलारु लाकडी पाटयाच्या भिंती | रु.१.०५ | रु.२.२५ | रु. ३.७५ | रु. ६.०० |
| | | ड- भिंती, झोपडी, कुडाच्या भिंती | रु.०.६० | - | रु. ३.०० | रु. ६.०० |
| २ | घोडबंदर काशिमिरा, मिरा, पेणकरपाडा, महाजनवाडी चेणे, वर्सोवा सर्व महामार्गालगत | अ- आर. सी. सी. | रु.२.४० | रु.४.५० | रु. ४.०० | रु. ६.०० |
| | | ब- लोड बेअरींग सिमेंट शिट्स व कौलारु | रु.१.८० | रु.३.०० | रु. ४.०० | रु. ६.०० |
| | | क- माती विटा कौलारु लाकडी पाटयाच्या भिंती | रु.०.८३ | रु.१.५० | रु. ३.७५ | रु. ६.०० |
| | | ड- भिंती, झोपडी, कुडाच्या भिंती | रु.०.५३ | - | रु. ३.०० | रु. ६.०० |
| ३ | चेणे, वर्सोवा, काजुपाडा सर्व गावठाण | अ- आर. सी. सी. | रु.२.१० | रु.४.२० | रु. ३.५० | रु. ६.०० |
| | | ब- लोड बेअरींग सिमेंट शिट्स व कौलारु | रु.१.८० | रु.३.६० | रु. ३.५० | रु. ६.०० |
| | | क- माती विटा कौलारु लाकडी पाटयाच्या भिंती | रु.०.८३ | रु.१.५० | रु. ३.२५ | रु. ६.०० |
| | | ड- भिंती, झोपडी, कुडाच्या भिंती | रु.०.५३ | - | रु. ३.०० | रु. ६.०० |
| ४ | उत्तन | अ- आर. सी. सी. | रु.१.२८ | रु.२.२५ | रु. ४.०० | रु. ६.०० |
| | | ब- लोड बेअरींग सिमेंट शिट्स व कौलारु | रु.०.९८ | रु.१.८० | रु. ४.०० | रु. ६.०० |
| | | क- माती विटा कौलारु लाकडी पाटयाच्या भिंती | रु.०.८३ | रु.१.२० | रु. ३.७५ | रु. ६.०० |
| | | ड- भिंती, झोपडी, कुडाच्या भिंती | रु.०.४८ | - | रु. ३.०० | रु. ६.०० |
| ५ | राई, मुर्धे, डोंगरी चौक, पाली, मोर्वा | अ- आर. सी. सी. | रु.१.२८ | रु.२.२५ | रु. ४.०० | रु. ६.०० |
| | | ब- लोड बेअरींग सिमेंट शिट्स व कौलारु | रु.०.९८ | रु.१.८० | रु. ४.०० | रु. ६.०० |
| | | क- माती विटा कौलारु लाकडी पाटयाच्या भिंती | रु.०.८३ | रु.१.२० | रु. ३.७५ | रु. ६.०० |
| | | ड- भिंती, झोपडी, कुडाच्या भिंती | रु.०.४८ | रु. - | रु. ३.०० | रु. ६.०० |
| ६ | काजूपाडा चेणे, वर्सोवा, माश्याचा पाडा, काशी, मिरा-गावठण, महाजनवाडी, घोडबंदर, आदिवासी पाड्यामधील | अ - आर. सी. सी. | रु. १.२८ | - | रु. ३.५० | - |
| | | क- माती विटा कौलारु लाकडी पाटयाच्या भिंती | रु.०.०८ | - | रु. ०.७५ | - |
| | | ड- भिंती, झोपडी, कुडाच्या भिंती | रु.०.०८ | - | रु. ०.७५ | - |

| अ. क्र. | विभागाचे नाव | इमारतीचा प्रकार | प्रती चौरस फुट प्रती महिना | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | जुने दर | | प्रस्तावित केलेले दर | |
| | | | निवासी | बिगर निवासी | निवासी | बिगर निवासी |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | आदिवासी निवासी कुटुंबे. | | | | | |
| ७ | मोठमोठी हॉटेल्स, रिसॉर्ट, सिनेमागृह मॉल्स, शॉपींग सेंटर इ. (फक्त वाणिज्य वापराकरीता असलेले) | अ- आर. सी. सी. | - | रु.७.५० | - | रु.७.५० |
| ८ | हॉटेल सह लॉजींग बोर्डींग,सार्व. हॉल, मंगल कार्यालये, लॉन्स, | अ- आर. सी. सी.<br>ब- लोड बेअरींग सिमेंट शिट्स व कौलारु | -<br>- | रु.७.५०<br>रु.६.०० | -<br>- | रु.७.५०<br>रु.७.५० |
| ९ | व्यावसायीक वापर असलेल्या मोकळया जागा | व्यावसायीक वापर असलेल्या मोकळ्या जागा | - | - | - | रु. १.५० |
| १० | महानगरपालिका क्षेत्रातील शाळा/ कॉलेज/ शैक्षणिक संस्था | अ- आर. सी. सी.<br>ब- लोड बेअरींग सिमेंट शिट्स व कौलारु | रु.२.४०<br>रु.२.१० | रु.४.५०<br>रु.३.७५ | रु. ४.००<br>रु. ४.०० | रु. ६.००<br>रु. ६.०० |

वरिल प्रमाणे दि.०१/०४/२०२६ पासून नवीन मालमत्तेस कर आकारणी करताना सुधारीत दरानुसार कर आकारणी करण्यांत यावी तसेच दि.३१/०३/२०२६ पर्यंत कर आकारणी करणेकरीता ज्या मालमत्ताधारकांनी अर्ज केला असल्यास त्या मालमत्ताधारकांना सन २०२५-२६ च्या जुन्या दराप्रमाणे कर आकारणी करण्यात यावी याबाबत प्रचार,प्रसार वृत्तपत्र व सोशलमिडीयाचे माध्यमातून करावी असा मी ठराव मांडत आहे.

**रुपाली मोदी :-**

माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम, आमचा ठराव आहे पण त्याच्या अगोदर माझा जरा प्रशासनाला प्रश्न आहे. ज्या लिज वर ह्या प्रॉपर्टी आहेत मिरा भाईंदर शहरामध्ये त्याचा आपला रिकव्हरी रेट काय ? म्हणजे समजा १०० प्रॉपर्टीज असतील ज्यांनी लिज वर दिलेल्या आहेत आपण किती आस्थापनां जवळून हे एक्सस्ट्रा जो टॅक्स आहे मालमत्ता कर वसूल करतो ? ही जर प्रशासनाने माहिती दिली तर बर पडेल.

**मा. महापौर :-**

विभागाचे अधिकारी असतील त्यांना बोलवा.

**अनिल सावंत :-**

मॅडम, काय होते झपाट्याने शहर वाढतं मोठ मोठे ब्रँड, बँका, मॉल्स, सर्व येत आहे. मॉलचा जर आपण विचार केला एखाद्या मॉलमध्ये १०० ते १५० जे ब्रँड असतात त्यांना ते लिज वर दिलेलं असतं महापालिका त्यांच्या पर्यंत पोहचू शकत नाही. होत काय जो ओनर आहे तो पार्टनरशीपचे ॲग्रीमेंट करुन टाकतो. लिज मध्ये खरा उद्देश आपला हा होता निवासी आस्थापनां जवळून रेट वाढवणं हा त्यांच्यावर तो अन्याय ठरेल.

**मा. महापौर :-**

ह्या ठरावामध्ये हे पण मेंशन आहे की आजमिती ८ वर्षाच्या कालावधी उलटून देखील सदर दरामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

**अनिल सावंत :-**

८ वर्षामध्ये नाही केलं माझ फक्त एवढच आहे आपला जो २०१८ मध्ये ठराव झाला त्याअनुषंगाने आजचा रिकव्हरी रेट काय आहे, समजा आपल्या शहरामध्ये २ हजार कमर्शियल आस्थापना असतील तर आपण किती लोकांपर्यंत पोहचू कशतो?

**प्रणाली घोंगे, उपायुक्त :-**

मा. सभागृह मा. महापौर मॅडमच्या मान्यतेने इथे बोलू इच्छीते, आपली टोटल जी प्रॉपर्टी टॅक्सची जी ह्या वर्षाची टोटल जी आपली डिमांड आहे ती आपली ३३४ कोटी आहे.

**अनिल सावंत :-**

आय एम टॉकिंग अबाऊट लिज.

**प्रणाली घोंगे, उपायुक्त :-**

रेंटलचे आपण २०१८ मध्ये जो आपला ठराव झाला त्याच्या नंतर २०२३-२४ पासुन त्याची आकारणी सुरु केली होती आणि आता पर्यंत ४२ मालमत्ता आपल्या टॅक्स नेटमध्ये आल्या त्याची आपली डिमांड ४.६३ कोटी आहे. आणि त्या अगेंस आपण २.२५ कोटी वसूल केलेले आहेत.

**अनिल सावंत :-**

मॅडम, २०१८ मध्ये ठराव झाला २०२४ मध्ये आपण रिकव्हरी करायला सुरुवात केली मध्ये एक पुर्ण सर्व्हे करण्यासाठी आपण एजन्सी नेमली होती मालमत्ता टॅक्ससाठी त्याची जवळ जवळ २९ करोड रुपये महापालिकेने दिले. उपायुक्त मॅडमने सांगितल्या प्रमाणे फक्त ४२ मालमत्ता ह्या कमर्शियल लीज ह्या शहरामध्ये आहेत. फक्त मी मिरा भाईंदर रोडवरुन जरी गेलो तरी कमित कमी १०० मालमत्ता मिळतील ज्या लीज वर आहेत त्यानंतर इंडस्ट्रीज वेगळी मॉल्स वेगळे हे आपण करत नसून लोकांपर्यंत पोहचत नसू फक्त रेट वाढवून काय उत्पन्न वाढणार आहे? जे प्रामाणिक पणे देत आहेत त्यांच्यावरच आर्थिक बोझा आपण जास्त टाकणार आहोत माझी आपणाला विनंती आहे की तुम्ही पुर्ण शहरामध्ये एक सर्व्हे घ्या किती मालमत्ता कमर्शियलच घ्या किती मालमत्ता लिज वर दिलेल्या आहेत. आणि त्यांच्या जवळून आपण हा जर टॅक्स जे ४ करोड सांगत आहेत कमित कमी ४० करोड यायला पाहिजे. दुसरी गोष्ट निवासी आस्थापनांवर तुम्ही रेट वाढवलात किती आस्थापना निवासी रेंटलवर दिलेले आहेत मला सांगा ?

**प्रणाली घोंगे, उपायुक्त :-**

नाही सर आपल्या ठरावामध्ये बिगर निवासी आस्थापनांना आपण टॅक्सेशन करत आहोत.

**अनिल सावंत :-**

आता जो ठराव त्यांनी केलेला आहे तो निवासी आस्थापनांमध्ये समाविष्ठ आहे.

**प्रणाली घोंगे, उपायुक्त :-**

२०१८ चा जो ठराव होता.

**अनिल सावंत :-**

नाही तुम्ही बघून घ्या २०१८ मध्ये जो ६० नंबर ठराव झाला ज्याचा सदस्यांनी उल्लेख केला आणि आता ह्या ठरावामध्ये आपण काही निवासी जे संकूल आहेत त्यांची कॅटॅगरी करुन त्यांच्यावरती टॅक्स वाढवणार म्हणजे अस्तित्वात होता आणि आपली रिकव्हरी शुन्य आहे. निवासी संकूलांवर लावलेला टॅक्सशी रिकव्हरी शुन्य आहे. तर माझी आपणाला विनंती आहे २०१८ च्या ठरावा प्रमाणेच तो रेट ठेवावा निवासी संकूलांना जास्त भूर्दंड टाकू नका कारण निवासी संकूल जेव्हा भाड्यावर देतात सोसायटी त्यांना प्रॉपर्टी टॅक्स भरावा लागतो नॉन ऑकोपन्सी टॅक्स भरावा लागतो आणि एखादी प्रॉपर्टी दिली तर किती ११ महिने, इथे वर्षानुवर्ष आहेत त्यांच्या पर्यंत आपण पोहचू शकत नाही मग ११ महिन्याच्या ज्या निवासी आस्थापना आहेत त्यांच्या पर्यंत कसे पोहोचणार ? मग ब्लॅक मेलिंग सुरु होईल तर महापौर मॅडम आमचा प्रस्ताव सारखाच आहे निवासी मालमत्ता दरात २०१८ मध्ये ठराव क्र.६० च्या अनुषंगाने जे दर निश्चित करण्यात आले आहेत त्यात कोणताही बदल करण्यात येवू नये बाकी करा तुम्ही जर सुचना तुम्ही घेत असाल तर आपल्याला ठरावाची काही गरज नाही.

**निला सोंस :-**

महापौर महोदय, आपकी आज्ञा से मे इस विषय पे कुछ बोलना चाहूँगी डेफीनेटली यह सबजेक्ट इम्पॉर्टंट है क्योंकी रेव्हेन्यू जनरेट करना इमपॉर्टंट है क्योकी मिरा भाईंदर महानगरपालिका सिर्फ डी कॅटेगरी मे नही बल्की कर्जे के बोझ से दबी हूई है। लेकीन विषय यह बनता है की महानगरपालिका का हमारा टोटल रेव्हेन्यू क्या है और हम जिस विषय पे बात कर रहे है की रेव्हेन्यू जनरेट करेंगे वो क्या हेल्प कर सकता है, तो अॅस पर माय नॉलेज और अॅस पर दी इन्फॉर्मेशन टोटल रेव्हेन्यू हमारा २६०० है और जो टॅक्स प्रॉजेक्शन है दॅट इज अराऊंड मतलब १०% रेव्हेन्यू उस १०% मे रेंटल रेव्हेन्यू पे हम बात कर रहे है और इफ आय एम नॉट रॉंग जो ठराव था ठराव अभी पढा गया उसमे रेसिडेन्शल प्रॉपर्टी का २४० का ४ रुपीज और कमर्शियल प्रॉपर्टी जो आज की तारीख मे ४ रुपीज पर स्केअर फीट है उसका ६ रुपया लगाया गया तो वो रेंटल के लिये है की वास्तविकता मतलब जिनकी प्रॉपर्टी है उनके लिये है ? हमारे सदस्य द्वारा जो ठराव पढा गया उसमे उन्होने रेसिडेन्शीयल प्रॉपर्टी जिस का आज की तारीख मे रेट है २४० उसे ४ रुपये बोला और जो कमर्शियल रेट है आज की तारीख मे अप्रॉक्सीमेटली ४ उसको ६ बोला गया तो वो हम रेंटल प्रॉपर्टी की बात तो कर नही रहे है क्योकी रेंटल हमारे रेसिडेन्शीयल प्रॉपर्टी पे नही है तो मेने शायद नही सूना होंगा लेकीन मे चाहती हूँ की वह ठराव आप जरा क्लियर करीये। प्लस उस ठराव मे एक विषय और बोला गया की २०१८ के बाद आज तक मतलब प्रॉपर्टी टॅक्स मे रेव्हेन्यू बढाने के लिये कोई प्रयत्न नही किया गया तो आप हिकी अध्यक्षता मे सबसे

महापौर मॅडम काय चालले आहे गोषवारा वाचला ठराव वाचत नाही त्यामूळे आम्हाला तुमची भुमिका समजत नाही. तुमचा भवनाला विरोध आहे की भवनाला नाव दिली आहेत त्याला विरोध आहे.

(सभागृहात गोधळ)

**मुन्ना सिंह :-**

आपने सुपारी लिया है क्या?

**अनिल सावंत :-**

ठराव करो.

(सभागृहात गोंधळ)

**भगवती शर्मा:-**

महापौर मॅडम ३१ आरक्षण है विषय आहे तो एक एक आरक्षण पे चर्चा होनी चाहिए अभी कूछ समय पहले फेरीवालेपे चर्चा हो रही थी तब यह लोग मार्केट की डिमांड कर रहे थे की मार्केट क्यू नही बना तब इन्होने कूछ नही बोला हम यह बोलना चाहते है की कौनसे आरक्षण पे क्या गलत हूवा है वो जनता के सामने लाने का उद्देश है इसके लिए चर्चा होनी चाहिए और जो गलती है उसको स्विकार करना चाहिए

**अनिल सावंत:-**

महापौर मॅडम माझे हेच म्हणणे आह की तुमची भुमिका स्पष्ट करण्यासाठी ठराव मांडा ठरावावर चर्चा होईल.

**हसमुख गेहलोत :-**

हम प्रशासन से सवाल पूछ रहे है वो जवाब दे दे।

**मा.महापौर :-**

सर्वानी जागेवर बसा आणि मग विषय मांडा.

**अनिल भोसले :-**

सब समाज को केरला वालो को युपी वालो को मराठा वालो के सब समाज के भावना से क्यू खेला ?

**मा. महापौर :-**

प्रशासनाकडून आपल्याला उत्तर पाहिजे तर प्रशासन उत्तर देईल. सर्वानी बसा एका विषयाचा खुलासा होवू द्या.

**दिनेश जैन :-**

महापौर मॅडम अभी शुरू भी नही किया उसके पहले इतना माहौल गरम हो गया है महापौर मॅडम पहले जो पुछा है उसका खुलासा करो।

(सभागृहात गोंधळ)

**सुरेश खंडेलवाल :-**

हे जे टेंडर काढले ते प्लान पास झाल्यावर काढले की अगोदर काढले हे जे आरक्षण आहेत आरक्षणमध्ये बदल केला, आरक्षणमध्ये भवन चालू आहेत, जिम्नॅस्टिक चालू आहेत हया सर्वाचा प्लान पास झाला आहे का? प्लान पास ज्यांनी केला आहे आणि त्या प्लानमध्ये काय त्रूटी आहेत.

**दिनेश जैन :-**

नामकरण किया है उसका खुलासा खांबित साहेब ने दिया है की यह भवन खाली समाज के लिए नही है यह पूरे मिरा भाईंदर और पूरे समाज के लिए खुला है उसका आप नोटीफिकेशन निकालो पालिका का प्रेसनोट जाहिर करो और जि तने भी पेपर है उसमे दे दो तो जो भी लोग यह भवन देखना चाहते है उनको यह मेसेज मिलेगा की यह जो भवन है वो सबको मिलने वाला है

**सुरेश खंडेलवाल:-**

पत्र लेखी मध्ये दया भाईंदर पश्चिममध्ये महावीर भवन आहे त्याचे उद्‌घाटन केले होते त्याचे खांबित साहेबांनी लेखी मध्ये पत्र दिले आहे. हे जे भवनाचे उद्‌घाटन होते ते कोणत्या धर्मासाठी नाही त्यामध्ये सर्व जाती धर्माचा माणूस येवू शकतो.

**दिनेश जैन:-**

महापौर मॅडम एक प्रेसनोट काढायला सांगा. आयुक्त साहेब प्रेसनोट काढतील आम्ही जेवढे भवनाचे नामकरण केले आहे ते नामकरण आहे ते कोणत्या एका समाजाला भेटणार नाही कोणी पण व्यक्ती त्यामध्ये जावू शकतो.

**अनिल भोसले:-**

महापौर मॅडम मराठा समाज विचारतो की मराठा भवन कूठे आहे. मराठयाची फसवणूक केली का आम्ही उदघाटनाला गेलो नारळ फोडला मराठा भवन कूठे आहे.

**मा. महापौर:-**

सर्वानी बसून घ्या.दिनेश जैन तुम्ही ठराव मांडा.

**दिनेश जैन:-**

महापौर मॅडम प्रशासनाच्या वतीने खांबित साहेबांना स्पष्टपणे सांगितले आहे की हे जे भवनचे नामकरण केले आहे ते एका समाजासाठी नसून ते मिरा भाईंदरच्या सर्व सन्मा. नागरिकांसाठी आहे. असे प्रशासनाचे खांबित साहेब म्हणतात ही प्रेसनोट काढा म्हणजे मिरा भाईंदरच्या जनतेला समजेल की आपली फसवणूक झालेली आहे. मला शिंदे साहेबांना विचारायचे आहे की मिरा भाईंदरमध्ये किती आरक्षण आहेत.

**पुरुषोत्तम शिंदे:-**

मा. महापौराच्या परवानगीने आरक्षण किती आहेत ते मी बघून सांगतो.

**दिनेश जैन :-**

तुम्ही टाऊन प्लानिंगचे अधिकारी आहेत तुम्हाला माहिती पाहिजे तुम्हाला माहिती नाही म्हणून लफडे होते वो १५% भवन बना रहे है फिर टॉयलेट व्यायाम शाळा बना रहे है प्लान पास करके दिया है उसमे टॉयलेट बनाना है तो कैसे बनाऐगे गार्डन में जाएगा तो घरपे टॉयलेट करके आएगा आप कहॉ बनाओगे बाकी जो जगह बचा था उसमे आप बना सकते है क्या आपको अधिकार है १५% अपना आरक्षण रहेगा उसमे हम बांधकाम कर सकते है आपने दिमाग लगाके उसका प्लान पास कर दिया लेकीन गार्डन में जाएगा तो शौचालय जाऐगा योगा करेगा योगा हॉल बनाना पडेगा आपने भवन बनाके दे दिया अब भवनके अंदर टॉयलेट जाऐगा उसके लिए क्या प्रोव्हिजन है मै आपको बताता हूँ मिरा भाईंदर में ३८१ आरक्षण है गुजरातमधील साबरमती रिव्हर फ्रंट वॉटर फ्रंट डेव्हलपमेंट धर्तीवर चेना नदीवर रिव्हर फ्रंट डेव्हलपमेंट उभारणेसाठी......

**ज्योत्सना हसनाळे :-**

माझ्या प्रभागाचा विषय आहे मी बोलणार आहे मा. महापौराच्या परवानगीने प्रकरण क्र. १३ मध्ये विषय आलेला आहे चेना येथील रस्ता व नदीवरील पूल बांधणे हयाकरिता २६ करोड ठेवलेले आहेत मला प्रशासनाला विचारायचे आहे की हा पूल कूठे बांधणार आणि कोणासाठी बांधणार? ह्या नदीवर पूल आहे तो काय करणार आहे? नदीवर भराव करून नदी बंद केली आहे डोंगराच्या पावसाचे पाणी कूठे जाणार आहे. नदीवर जो पूल बांधला आहे त्याची मागणी नागरिकांनी केली आहे की कूठल्या नगरसेवकांनी केली आहे. हयाचा खुलासा करा. त्या पूलाचे पूर्ण व्हिडियो माझ्या मोबाईलमध्ये आहेत तुम्ही प्रोजेक्टर आणला तर आपण दाखवू शकतो. की प्रशासनाने कूठे कसे काम करायला घेतलेला आहे त्याचा खुलासा करण्यात यावा. तसेच शासनाकडून चार करोड रू. आले होते ते मनपानी प्रायव्हेट बिल्डरसाठी रस्ता बनवायला खर्च केले. ते का खर्च केले त्याचादेखील खुलासा देण्यात यावा. हयाठिकाण

क्र. २ आणि ३ जो फंड ३० करोड दाखवला आहे त्यातील २६ करोड रू. चेन्याच्या रस्त्यासाठी आणि ३ नंबरला दाखवले आहे प्रभाग क्र. १४ काशिमिरा येथील उदयानासाठी आरक्षण ३६८ ह्या जागेवरती अलौकिक स्थायी तरण तलाव आवश्यक सुविधा हया दोन्ही मुद्द्याचा मला खुलासा पाहिजे १० करोड दाखवले आहेत. हे तुम्ही कोणासाठी करता हया पुलासाठी कोणत्याही नागरिकांची मागणी नाही हे सर्व प्रायव्हेट बिल्डरसाठी चालू आहे प्रशसनानी किती झाड कापली किती माती भराव केला प्रायव्हेट बिल्डरवर एक तरी गुन्हा दाखल केला का? गुन्हा असेल तर दाखवा दुसऱ्यांनी काही केले तर गुन्हे नोंद होतात प्रशासन इतक का हतबल झाले तुमची मजबूरी काय आहे तुम्ही बिल्डरला कशाला पाठीशी घालता कोण बिल्डर आहे त्याचे नाव सांगायचे आहे. मला सांगायला शरम वाटते चेना गावामध्ये महिलांसाठी शौचालय नाही आणि तुम्ही २६ करोड रू. पूलाच्या कामासाठी घालता हे तेच प्रशासन आहे की मी ज्या प्रशासनाबरोबर महापौर म्हणून काम केले आहे. डिंपल मेहताजीने काम केले आहे आज प्रशासनाला काय झाले एवढी लाचारी पत्करायला लागली. हे आकडे लाखात नाही तर करोडोत आहे. हे वाचायला आमचे हातपाय थरथरतात आम्ही एवढे करोडो रू. बघीतले नाहीत जे तुम्ही बूडवता. टॅक्समधून आलेला पैसा तुम्ही प्रायव्हेट लोकासाठी खर्च करता. महापौर मॅडम ही शरमेची बाब आहे. ह्या कामाला माझा स्पष्ट विरोध आहे. त्यामूळे ही काम स्थगित करावी आणि आतापर्यत जो मनपानी खर्च केला तो आवश्यक आहे की ना आवश्यक आहे हे बघून त्याची चौकशी लावावी त्यानंतरच त्या ठेकेदारांचे बिल काढण्यात यावे. प्रशासनाचा मनमानी कारभार आम्ही खपवून घेणार नाही हे २६ करोड जर तुम्हाला वापरायचे असतील तर जनता नगरच्या बी.एस.यू.पी. च्या लोकांना बेघर केले त्या ठिकाणी वापरा म्हणजे ती लोक त्यांच्या हक्काच्या घरात जातील. हया कामाचा खुलासा देण्यात यावा.

**हसमुख गेहलोत :-**

महापौर मॅडम जिस तरहसे ज्योत्सना मॅडमने जो बात बताई इसमे सुखकी बात है की दुख की बात है की वो बिल्डर पुलिस स्टेशन जाके खुद लेटर देता है की मेरे यहॉ पे झाड कटाई की गई और १-२ झाड नही तो हजारो झाड काटे गऐ पर बिल्डरको पता नही

**ज्योत्सना हसनाळे :-**

प्रशासनानी त्याच्यावर गुन्हा का दाखल केला नाही संबधीत ठिकाणाची चौकशी करावी आणि जो दोषी असेल जर बिल्डर दोषी असेल तर गुन्हे दाख्ल करण्यात यावे. ह्या सभागृहाचे नेतृत्व आम्ही करतो आणि नागरिकांना आम्हाला उत्त्र दयावे लागते हा जो पूल आपण करणार आहोत लोक आम्हाला विचारतात की चेना नदीवर जो जुना पूल आहे तो नादुरुस्त अवस्थेत आहे त्या पुलाला कोण बघत नाही. आणि हा नविन पूल दुसरीकडे तयार होत आहे ह्या पूलाची आपल्याला काही आवश्यकता नाही गरज असेल तर प्रशासनानी सांगावे आहे तर कोणासाठी आहे, वापरणार कोण, मागणी कोणाची आहे.

**अनिल भोसले :-**

मा. महापौराच्या परवानगीने आदिवासीचा रस्ता चोरी केला त्या चोरावर गुन्हा दाखल करा. पाटली पाडा, बेलकरीपाडा हया गावासाठी बनला होता. मी खांबित साहेबांना विचारतो गुन्हा दाखल करणार की नाही. तसेच जो जुना ब्रिज आहे त्याला पालिकेची लोक तोडायला गेले होते त्याचा स्ट्रक्चर रिपोर्ट आला आहे का त्याचा खुलासा करण्यात यावा. वाडयाचा पाडया साठी महाराष्ट्र शासनाकडून निधी आणला आणि स्वताच्या शेतावर रस्ता नेला तो रस्ता शेतावर जी प्रोव्हिजन चालली आहे तिथे नेला त्या रस्ता चोरावर गुन्हा दाखल करा. त्या प्रोपर्टी मध्ये भरपूर झाडे कापली आहेत अनोळखी व्यवक्तीवर गुन्हा दाखल केला एखादया व्यक्तिला वाचवण्यासाठी एक छोटेसे झाड कापले असेल तरी मनपा त्याच्यावर गुन्हे दाखल करते. त्या परिसरामध्ये अनेक झाड कापली गेली उत्खनन केले गेले आहे आदिवासीसाठी पैसे मंजूर करून घेतले आणि रस्ता आपल्या प्रोजेक्टवर नेला. त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा. हा ब्रिज कोणासाठी आहे आजही बेलकरी पाडयला जायला रस्ता नाही. त्या पाडयावर ३ पिढया गेल्या आहेत परंतू अजून रस्ता नाही. खांबित साहेब तुम्ही शहर अभियंता आहेत असे अनेक पाडे आहेत जे रस्तयापासून वंचित आहेत हे पैसे कोणासाठी खर्च करतो का खर्च करतो. एखादयाला वाचवायचे तर किती पर्यत वाचवायचे मक्तेदारी लागली आहे का? प्रशासन डोळे बंद करून बसले आहेत. आदिवासीना काही किंमत नाही. हया शहरामध्ये पिढयानु पिढी जे आदिवासी राहतात त्यांची काही किंमत नाही. वाडयाच्या पाडयाचे आपल्याकडे आले होते का अनेक लेखी अर्ज आपल्याकडे आहेत. त्याठिकाणी आपण झाडाचा काही पुरावा केला नाही आपण त्याच्यावर पांघरून घातले. नदीच्या किनारी जागा कूठे आहे. गुजरातचे सौदर्यीकरण पॅर्टन आपण काजूपाडयामध्ये घेवून आला बेलकरी पाडयाला रस्ता नाही, वाडयाच्या पाडयला रस्ता नाही, माशाच्या पाडयाला देखील जायला रस्ता नाही तसेच गावठनामध्ये जायला रस्ता नाही पिढयानू पिढया जे आदिवासी राहतात त्यांनी अनेक वर्षापासून मागणी करतात धरणे, आंदोजने केली त्यांच्यासाठी आपण काही करत नाही. एखाद्या बिल्डरसाठी प्रशासन काम करते. एखाद्या व्यक्तिच्या दबावाला बळी पडून प्रशासन काम करते. ते पाप करता त्या पापाचे भागीदारतुम्ही आहात असे तुम्हाला वाटत नाही

का? त्या आदिवांसीनी धरणे केले उपोषण केले महापौर मॅडम कोणाचेच ऐकत नसेल आणि सर्व दादागीरी चालू असेल तर मनपाला टाळ मारा हे उदयोग बंद करा. महापौर मॅडम पाडयावर जावून त्या महिलांची परिस्थिती बघा लहान मुल शाळेत जातानापाण्यातून जातात त्याच्यासाठी काम करत नाही आणि प्रायव्हेट वाल्यासाठी काम करता मॅडम त्या लोकांची व्यथा आहे. हा अन्याय नाही का हे चुकीचे आहे त्यांच्यावर गुन्हे दाखल व्हायला पाहिजे अशी माझी मागणी आहे.

**ज्योत्सना हसनाळे :-**

गुजरातमधील साबरमती रिव्हर फ्रंट डेव्हलपमेंटच्या धर्तीवर मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील चेना नदीवर रिव्हर वॉटर फ्रंट उभारण्यासाठी पून्हा त्याच नदीवर हयांना वॉटर फ्रंट डेव्हलपमेंट उभारयचा आहे आणि त्यासाठी २०० करोड खर्च आहे २०० करोडचा प्रोजेक्ट तिथे करता तो कोणासाठी करता तिथल्या लोकांना जी सुविधा द्यायला पाहिजे ती बाजूलाच राहीली तिथे शौचालयाची व्यवस्था नाही गावामध्ये रस्त्याची व्यवस्था नाही, लाईट नाही, पाणी नाही तिथे आदिवासी समाज आहे त्यांना मुलभूत सुविधा देण्यात यावी. २०० करोडचे प्रोजेक्ट आणून काय दाखवायचे आहे. नदीवर जो पूल बांधणार तिकडे दोन्ही साईडला कोणीही नाही तिकडे बाहेरचे माणसे आणणार आहेत का? प्रशासनाला नेमके काय करायचे आहे २०० करोड कोणखर्च करणार आहे. शासनाकडून येणार की मनपा हिस्सा ठेवणार आहे.

**दिपक खांबित :-**

शासन देणार आहे.

**ज्योत्सना हसनाळे :-**

२०० करोड शासन देणार तर शासनाला प्रस्ताव पाठवा मुलभूत सुविधासाठी जिथे गरज आहे तिथे खर्च करा. अगोदर चार करोड रस्त्यासाठी गेले. शासनाचे पैसे पण असेच आहेत का कूठे ही कसेही वापरायचे आपण शासनाला सांगायला नको का महासभेपूढे ठराव करून शासनाला सांगायला पाहिजे की तुमच्या पैशाचा उपयोग चांगल्या ठिकाणी होत नाही प्रायव्हेट बिल्डरला हा खर्च जातो त्यामूळे इथे आपल्याला थांबायला लागेल. सदर कामाची चौकशी करावी प्रशासनाने अजूनही खुलासा दिलेला नाही.

**दिनेश जैन :-**

साबरमती रिव्हर फ्रंट के लिए शासनसे २०० करोड रू. मंजूर किया है उसका एक पॉईन्ट भेजा है मंजूर विकास योजनेत  वॉटर फ्रंट आरक्षण दर्शवले आहे ऐसा डी पी के अंदर कोई भी आरक्षण नही है चेना नदी के अंदर कोई भी जगह रिक्वायर नही किया है चेना के अंदर जो आरक्षण है ३७३-४८०० चौ. मिटर ३७४-६००० चौ. मिटर ३७६-२५०० चौ. मिटर ३७९- ४००० चौ. मिटर और शॉपिंग सेंटर ३६००, दफन हाऊस ४००० चौ. मिटर, रिव्हंर फ्रंट का जो आरक्षण है  साबरमती का जो कर रहे है उसको  १००% ताबे मे  लिया है

**दिपक खांबित :-**

आपली जी मुळ विकास योजना आहे त्यामध्ये फेरबदल करून

**दिनेश जैन :-**

फेरबदल कसा केला ३७ चा प्रस्ताव केला आहे. मुळ डि पी मध्ये आरक्षण होते का

**दिपक खांबित :-**

आरक्षण नव्हते.

**दिनेश जैन :-**

मी तेच सांगतो डि पी मध्ये आरक्षण नव्हते  मग आपण फेरबदल कसा केला.

**दिपक खांबित:-**

फेरबदल कूठेही करता येतो.

**दिनेश जैन :-**

एखादे आरक्षण नसते तेव्हा ३७ करतो.

**हसमुख गेहलोत :-**

महापौर मॅडम इथे आरक्षणची गरज नव्हती अचानक आरक्षण आले आणि २०० कोटी लोकवस्ती नाही तिथे रिव्हर फ्रंट आले ताईच्या इकडे माशाचा पाडा आहे आदिवासी पाडा आहे तिथे मुलभूत सुविधा ज्या पाहिजे त्या नाहीत त्या जागेवर २०० कोटी खर्च करतात एवढी घाई ते पैसे इथून नाही म्ग ते शासनाकडून आणले.

**दिनेश जैन :-**

ती जागा कोणाची आहे ती कोणाकडून ताब्यात घेतली.

**हसमुख गेहलोत :-**

आरक्षण लागले म्हणजे जागा आपल्याला ॲक्वायर करायला लागते. कोणतीही जागा विकसीत करण्यासाठी जागा आपल्या हातात १००% घेतली पाहिजे. जागा आपण घेतली की बाकी आहे.

**पुरूषोत्तम शिंदे :-**

घेतलेली नाही.

**हसमुख गेहलोत :-**

आयुक्त महोदय २०० करोड लाया गया खर्चा भी करे और जगह अभी तक लिया नही आरक्षण जबरदस्ती टाकले लोकवस्ती नाही २०० कोटी आणले आणि सर्वात मोठी गोष्ट आरक्षण ताब्यातच नाही.

**दिनेश जैन :-**

साडेतीन साल घरपे बिठाया तो यह सब जानना हमारे लिए जरूरी है आज हम सत्ता मे रहके हम आपको बता रहे है की हमारी लूट कैसी हूई है

**निर्मला सावळे :-**

केसरीपाडा, पाटीलपाडा, काजूपाडा, चेना हया साठी रस्त्याची मागणी केली तिथे शौचालयपण नाही. नळकनेक्शन

**मा. महापौर :-**

एकच विषय रिपिट नको.

**निर्मला सावळे :-**

आम्हाला सांगितले तो सेन्सेटिव्ह झोन आहे. त्यामूळे विकास होत नाही आता जो रस्ता आहे तो सुध्दा सेन्सेटिव्ह झोन आहे तो मग कसा मंजूर केला ज्यावेळेस शासनाकडून ५०० करेड येत होते त्यावेळी तुमचे काम होते की तो फंड विकास कामासाठी वापरला गेला पाहिजे घोडबंदरच्या रोडसाठी आम्ही सपर करतो तो आजही पूर्ण झालेला नाही आम्ही जनतेला काय उत्तर देणार २०२२-२३-२४ हया कालावधीमध्ये भरपूर फास्ट काम झाली आम्ही एका रस्त्यासाठी २५ वर्षापासून भांडतो आणि ३ वर्षात एवढी फास्ट काम झाली जादूची कांडी फिरवली का? आमची काम का झाली नाही. केसरीपाडी पाटीलपाडयाला २५ वर्षापासून लाईट नाही नळकनेक्शनची मागणी केल्यावर आता अर्धवट पाईप टाकले पूढे फॉरेस्टचा एरिया लागतो त्यामूळे अडवली गेली. नगरविकासाचे जेवढ कौतूक करावे तेवढे कमी आहे खर म्हणजे सत्कार करायला पाहिजे होता जी आरक्षण २५ वर्षापासून ताब्यात घेण्यासाठी भांडतो ती आरक्षण ३ वर्षात ताब्यात आणली. हया पाच वर्षात कामाच रिझल्ट पाहिजे.

**मा. महापौर :-**

दिनेशजी ठराव मांडा.

**दिनेश जैन :-**

यह विषय मिरा भाईंदर के लिए बहोत गंभीर विषय है जनता को और पत्रकार को जानने दो चेना का विषय आ गया है २३ नंबर में ट्रॅफिक पार्क उभारणे उसका १००% काम पूर्ण कर दिया उसके अंदर क्या लिखा है मंजूर विकास योजने अंतर्गत प्राथमिक शाळा व खेळाचे मैदानाचे आरक्षण दाखवले आहे. खेल के मैदान में आरक्षण दिखा या हूवा है उसके अंदर इन्होने ट्राफिक पार्क उभारा है यह कौनसा आरक्षण है

**दिपक खांबित :-**

आरक्षण क्र २५५

**दिनेश जैन :-**

४.२३ अन्वये शासनाकडे प्रस्ताव सादर आहे मंजूरी नाही. शासनको मंजूरी के लिए यूडीसीपीआर ४.२७) ३ के अंदर शासनको प्रस्ताव भेजा हूवा है इसलिए गोषवारा मे विषय दिया हूवा है वो अभी तक मान्यता मिली नही है और १००% काम पूर्ण हूवा है ट्रॅफिक पार्क् उभारा है और शाळा का आरक्षण कॅन्सल करने के लिए २.७३ वो मंजूर होके आयेगा तब यह काम कर सकते है लेकीन वो काम मंजूर हूवा नही है शासन के पास प्रस्ताव पेंडीग है और वहॉ काम १००% हो गया हम नगरसेवक जनता को क्या जवाब देंगे यह पालिका ऐसे ही चलेगी जनता को कूछ विश्वास मिलेगा २०० करोड के रिव्हर फ्रंट आ गए उसका कोई परमिशन नही है किसीने बोला हॉल बना दो बना दिया यह खर्चा कर दो कर दिया क्या लूट मची है बाळासाहेब कलादालन का जो विषय है उसमे १४० करोड का खर्चा हूवा शासनसे कितना पैसा आया

**दिपक खांबित :-**

जो काम हूवा है वह मंजूर हूवा है शासन नगरविकास विभाग उनके पास लोकप्रतिनिधी मुलभूत सेवा के लिए लेटर देते है वो जी आर निकालके कार्यन्वित यंत्रणा बोलेगे तो इम्पलीमेंटकी एजन्सी करके अपने को अपोईन्ट करते

है और मनपा या कोई भी यंत्रणा रहे जिनको काम दिया वो आगे का काम करती है यह सब काम शासन निर्णय करके फंड अलॉट किया है और बादमे मनपा इम्पलीमेंट एजन्सीने यह सब काम प्रोसेस किया है

**दिनेश जैन :-**

प्रोसिजर हूवा वो अच्छा हूवा २२५०० का कलादालन बना है कला दालन बना है उसके लिए खूश है लेकीन १४० करोड का भ्रष्टाचार हूवा उसके लिए दुखी है हसमुखजी जो बोल रहे है ५-५ भवन दिए है यह ११९ मे ५००० स्केवअर फिटमे और उसकी लागत कितनी है १० करोड का प्रस्ताव है और वो २२५० चौरस मिटर का १४० करोड का प्रस्ताव हूवा इसका आधा है उसके लिए १४० करोड खर्चा हूवा जैसा पैसा आता है वैसा काम होना चाहिए

**मा. महापौर :-**

खांबित साहेब ज्या ठिकाणी शासनाची परवानगी आली नाही त्या आरक्षणात काम कसे केले.

**दिपक खांबित :-**

शासनाकडून जसे पैसे येतील तसे दिले जातात

**दिनेश जैन :-**

महापौर मॅडम मेरे गल्ली मे गटर का ढक्कन बदलना है तो बोलते है बजेट नही है आदमी मरेगा तो चलेगा पर उनके पास फंड नही है

**दिपक खांबित :-**

मनपाचा एक रूपयाही खर्च केला नाही.

**ज्योत्सना हसनाळे :-**

ही सर्व काम मनपापूढे कशाला आली आहेत

**दिपक खांबित :-**

विषय घेतला आम्ही सर्व विषयाचा गोषवारा दिला.

**ज्योत्सना हसनाळे :-**

आता काय करायचे आम्ही चर्चा केली आता तुम्ही ठराव करून शासनाकडे पाठवणार का

**दिपक खांबित :-**

विषय माहितीसाठी ठेवला आहे.

**ज्योत्सना हसनाळे :-**

आम्ही ठराव केला तर तुम्ही शासनाकडे पाठवणार की तुम्ही ठराव करणार

**मा. महापौर :-**

ठराव करू दे.

**ज्योत्सना हसनाळे :-**

मला तेच म्हणायचे आहे हे आपल्याकडे का आले तुम्ही उत्तर दिले की सर्व खर्च शासनाने केला मग हा विषय महासभेपूढे कशाला आणला

**मा. महापौर :-**

महासभेनेच विषय घेतला आहे.

**हसमूख गेहलोत :-**

महापौर मॅडम विषय असा आहे आपण मनपातर्फे काम सुचवली आणि आपल्याकडे पैसे नव्हते म्हणून आपण शासनाकडे मागणी केली आणि शासनाने मदत केली.

**दिपक खांबित :-**

कार्पोरेशनने अजीबात मागणी केली नाही. लोकप्रतिनिधी हे थेट नगरविकास मंत्र्याकडे मागणी करतात त्यानंतर नगरविकास जी आर काढते तोपर्यत आपला काही संबध नसतो.

**ज्योत्सना हसनाळे :-**

लोकप्रतिनिधी म्हणजे कोण आमदार की नगरसेवक ते क्लियर करा.

**मा. उपमहापौर :-**

खांबित साहेब तुम्ही सभागृहाची दिशाभुल करता लोकप्रतिनिधीनी शासनाला काम सुचवले आणि शासनाने तुम्हाला पत्र दिले की तुमचे काम आहे तुमची भुमिका स्पष्ट करणे आरक्षणची जी ॲक्चूअल पोझिशन आहे ती शासनाच्या निर्देशनास आणून द्यायला पाहिजे. ह्याच्यामध्ये असे म्हटले आहे की ट्राफिक पार्क मंजूर विकास योजनेमध्ये काय म्हटले आहे शाळा आणि खेळाचे मैदान तुमचे काम आहे ट्राफिक पार्क तिकडे उभारला आहे. तुमच्याकडे सुधारीत प्रारूप विकास योजना आली त्या प्रारूप विकास योजनेमध्ये फायर स्टेशन आणि ओल्ड एज होम

आहे तर तुमचे काम आहे की तुम्ही शासनाच्या निर्दशनास आणून दयायलापाहिजे की इथे एकमेव रिझर्व्हेशन मिरा भाईदरमध्ये आहे आपण हे ट्राफिक पार्क दूसऱ्या गार्डनमध्ये उभे करू शकत होतो हे तुम्ही शासनाच्या निर्दशनास आणून दिले नाही. सभागृहाची दिशाभुल करू नका. तुम्ही स्पष्ट पणे बोलले नाही तुम्ही स्पष्टपणे काम केले नाही त्यामूळे आज मिरा भाईंदर शहराच्या आरक्षणाची वाट लागली आहे. मी आणि भगवती शर्मा आरक्षणामध्ये फिरलो आणि त्याची पाहणी केली तर असे निर्दशनास आले की त्या आरक्षणाचा मुळ उद्देश आहे तो साध्य झाला नाही. ट्राफिक पार्क अशा प्रकारे डेव्हलप केलेला आहे की तिथे गार्डन होवू शकत नाही. आज हया शहरामध्ये ओल्ड एज होमची गरज आहे ती गरज साध्य होत नाही. तुम्ही चूकीचा बदल करून मंजूर केलेले आहे. काही ठिकाणी नकाशे मंजूर केले नाही आणि काम सूरू केले आहे कधी कधी नकाशा मंजूर करताना नगररचना विभागाने असा हा प्लॉट रिझर्व्हेशनचा असताना हे ताब्यात आले नसताना मध्ये आरक्षणाची वास्तू उभी केली आहे. त्यामूळे पूर्ण आरक्षण डिर्स्टब झाले आहे आणि पूर्ण मिरा भाईंदर शहराचे नुकसान झालेले आहे जिथे निधी मंजूर झाला आहे आणि जिथे निधी खर्च केला पाहिजे तिथे तुम्ही निधी खर्च केला नाही. पैसे दुसरीकडे आणि वर्सोवा गाव घोडबंदर खाडी किनारी विकसीत करण्यासाठी निधी आलेला आहे. तो पैसा तुम्ही १० नंबरमध्ये वापरला आहे मिरा भाईंदर क्षेत्रातील आरक्षण क्र. २४६ दिनानाथ मंगेशकर इकडे पाच कोटी रू. वापरले.

**ज्योत्सना हसनाळे :-**

हे काय चालले आहे.

**मा. उपमहापौर :-**

त्याच्यानंतर ११ नंबरमध्ये आरक्षण क्र. ३७० मध्ये २५ लाख वापरले आहेत १२ नंबरमध्ये आरक्षण क्र. २४८ बगीचा आरक्षणामध्ये २५ कोटी वापरले आहेत असे अनेक ठिकाणी तुम्ही निधी वापरला आहे. निधी आला कूठे आणि वापरला कूठे तुम्ही म्हणता शासन निर्णय आहे तर तुम्ही चुकीच्या ठिकाणी पैसे का ट्रान्सफर केले मॅडम ह्याच्यामध्ये खूप सारा घोळ झाला आहे.

सभागृहात गोंधळ

**दिनेश जैन :-**

खूप सारा घोळ नाही पूर्ण घोळ आहे.

**ज्योत्सना हसनाळे :-**

महापौर मॅडम इतका सारा घोटाळा आपल्याला बघायला मिळतो आणि एवढे सारे लोकप्रतिनिधी सांगताता म्हणजे कूठेन कूठे प्रशासनाकडून चूकीचे झालेले आहे. माझे असे म्हणणे आहे की संबधीत अधिकाऱ्यावर का कारवाई करू नये. त्यांना नोटिस का बजावू नये. ह्याच्यामध्ये त्यांनी जनतेचा विश्वास गमावलेला आहे. हया अधिकाऱ्याचे मनोबल वाढेल आणि पुन्हा अशा चुका घडणार नाहीत हयासाठी अधिकाऱ्यांना नोटिस बजावल्या पाहिजेत. माझे असे मत आहे की ज्या ठिकाणी शासनाला सुध्दा चुकीची माहिती दिली जाते त्याठिकाणी आपण स्वत: पत्रव्यव्हार करून कळवावे जेणेकरून शासनाच्या पैशाचा दुरूपयोग होणार नाही. आवश्यक ठिकाणी हा फंड वापरला जाईल गोरगरिब लोकांसाठी हा फंड वापरला जाईल आपल्या मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये नाविण्यापूर्ण गोष्टी व्हायला पाहिजेत आणि झाल्या पाहिजेत हे शहर महत्वपूर्ण शहर दिसले पाहिजे परंतू शासनाची दिशाभुल करून आणि शासनाचा फंड नको त्या ठिकाणी वापरून १००करोड रू. ची काम काढता आणि शासनाचे २ कोठी रू. येतात तुम्ही बांधकाम विभागाकडून यादी घ्या. तेव्हा माहिती पडेल की हया लोकांनी कूठे कूठे फंड वापरला आहे. तो निधी शासनाकडून आलेला नाही. अशा ठिकाणी नगरसेवकांनी नगरसेवक निधीच काम थांबवावे का? शासनाच्या फंडाची वाट बघावी. हे प्रश्न पूढे उपस्थित राहणार आहेत. म्हणून हयाच्यावर योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

**अनिल भोसले :-**

महाराष्ट्र शासनाला रितसर चौकशीची मागणी करण्यात यावी. अशी माझी विनंती आहे.

**दिनेश जैन :-**

आरक्षण क्र. २४८ उसमे १५% गार्डन रिर्झव्हेशन रहता है उसके अंदर ऑलरेडी प्लान मंजूर किया है उसके अंदर सर्व आर्जी व आरक्षणे अभ्यासिका व सुलभ शौचालय इतर कामासाठी २५ कोटी रू. आले आहेत. १५% जो युज करना था वो यूज करके कहॉपे बनाओगे जगह कहॉसे लायेंगे

**दिपक खांबित :-**

अभ्यासिका सुलभ शौचालय रिर्झव्हेशन ११९.....

**दिनेश जैन :-**

ते मला माहित आहे मी २४८ आरक्षणासाठी सांगतो. त्याच्यामध्ये १५% वापरून घेतलेले आहे त्याच्यामध्ये भवन बांधलेले आहे . भवन बांधल्यानंतर २४८ मध्ये हे टेंडर काढलेले आहे अभ्यासिका व सुलभ शौचालय १५%

ऑलरेडी वापरल आहे. हयाच्यामध्ये आपण युडीसीआर प्रमाणे नाही तर ३७ प्रमाणे केले आहे. हयाची १५% एफ.एस.आय. वापरली आहे. आरक्षण क्र २४८ मध्ये बांधकामची जी परमिशन होती त्याच्यात प्लान पास झालेला आहे. नविन काम कूठल्या जागेमध्ये करणार आहोत .

**दिपक खांबित :-**

कॉर्नरला आपण स्ट्रक्चर बांधले आहे बघा..

**दिनेश जैन :-**

साहेब हयाच्यामध्ये खूप घोळ आहे. रिव्हर फ्रंटची जागा किती मोठी आहे यह विषय खास करके क्यू बोल रहा हूॅ क्यूकी मिरा भाईंदरमे जितने भी आरक्षण है भविष्य मे बच्चो के लिए नऐ आरक्षण मिलने वाले नही है नए डी पी में आरक्षण बढा नही सकते है जो आरक्षण है उसको हमे सोच समझके यूज करना था सोच समझके खर्चा करना था लेकीन तीन साल तक कोई जनप्रतिनिधी नही था इसके लिए पूरे आरक्षण की वाट लगा दी है महापौर मॅडम प्रशासन से बोले की यह जो भवन बनाए है वो मिरा भाईदरके सब जनता के लिए है कोई समाज के लिए नही है

**भगवती शर्मा :-**

दिनेशजी जो २४८ का बोल रहे है उसमे आपने १५% कन्स्ट्रक्शन किया है मेन रिर्झव्हेशन तो उदयान कहा है उदयान बादमें बनाऐगें प्रत्येक रिर्झव्हेशन मे जो मुळ आरक्षण है वहॉ का विकास आपने किया नही है कोई भी ३१ आरक्षण के अंदर मूळ आरक्षणका विकास किया नही है कोई भी चीज वास्तू बनने के पहले इन्होने फर्निचर का काम किया है कितने पैसो की बरबादी है यह प्लान २०२२ में पास किए थे २०२२ में शहर में जो हूवा वो आज तक हम लोग यादकर रहे है जो प्लान पास हूवा उसकी डिटेल आपने भेजी है यह सब कागदपत्र आपने भेजके दिशाभूल किया है माजी महापौरने बोला जो विकास काम थे उसका आपने नही भेजा लेकीन इसका आपने भेजा आपके उपर किसी का दबाव होगा

सभागृहात गोंधळ

**विजया वैती :-**

वर्सोवा ब्रिज ते घोडबंदर गावाशेजारील खाडी किनारा विकसीत करणे बाबत विषयपटलावर विषय आलेला आहे घोडबंदर रेती बंदर समूद्र किनारा हयावर मेरी टाईम बोर्डच्या जागेतील इमारती बाबत आक्षेप घेतला आहे मिरा भाईंदर परिसरातील मौजे घोडबंदर गांव समृद्ध ऐतिहासीक वारसा आहे रेती बंदर परिसरातील समूद्र किनाऱ्यावर महाराष्ट्र शासनाचा मेरी टाईम बोर्डच्या अखत्यारित मनपा हसतरेखीत केली आहे हया जागेच्या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या नावाने समूद्र किनाऱ्यावर चौपाटी विकसीत करण्याचे काम सूरू झालेले आहे हया जागेत १०० वर्षापासून रेती व्यवसाय, जहाज बांधणी, कारखाने, कार्यालये, राहती घरे आहेत सदर जागेत मेरी टाईम बोर्ड भाडयाने प्लान देत होती तसेच काही जागा मालकीच्याआहेत सदर जागेत चौपाटी विकसीत करणे हयाची आपल्या विकास आराखडयात नोंद नाही. जमीन मालकाची परवानगी नाही. सदर जागेतील व्यवसायिक नागरिक, स्थानिक गावकरी बांधीत होते. त्यांचा विचार न करता किंवा त्यांना न कळवता जबरदस्तीने चौपाटी लादलेली आहे. हा प्रोजेक्ट अतिमहत्वकांक्षी नेत्याच्या संकल्पनेतून राबवला जात आहे. चौपाटी विकासामूळे मालकी जागा, ताब्यातील जागा, व्यवसाय, मोल मजुरी स्थानिकांची घरे कारखाने १८६० साली नाना शंकर शेठ ह्यांनी बांधलेले अमृतेश्वर महादेव मंदिर परिसर मनपाची स्मशान भुमी, मनपाचे दशक्रिया, बारावे, श्राद्ध विधी शेड हया विस्थापित होत्या. शेकडो परिवार, मजूर, व्यावसायिक, बेघर व बेरोजगार होतील १५ व्या शतकापासून गाव उध्वस्त होईल जर चौपाटी असली तर विकास कामे व्हायला पाहिजेत त्यासाठी वर्सावे किनाऱ्यापासून घोडबंदर गाव किनाऱ्यापर्यतचा एखादा ५०० मिटरचा रिकामा असलेला किनारा चौपाटीसाठी ठेवावा अशी मागणी आहे. हया कामासाठी महाराष्ट सरकारचा १५० कोटीचा निधी मंजूर असल्याची माहिती आहे. त्याचा अर्थ हया निधीतून स्थानिकांना हिसकावून लावण्याचे कारस्थान स्पष्ट दिसत आहे. हाच निधी विविध रस्ते विकास कामाला, आरोग्य सेवेला किंवा दवाखान्याला वापरा म्हणजे आपल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या संविधानामध्ये सुधारणा होईल सदर चौपाटीस आम्ही घोडबंदर वासिय तिव्र आक्षेप असून हयासाठी प्रखर विरोध होवून कायदा सुव्यवस्थेचा मोठा प्रश्न उपस्थित होईल त्यामूळे तातडीने हयावर लक्ष देवून दखल घेण्यात यावी. तसेच हया चौपाटीची मागणी कोणीही गावकऱ्यांनी केलेली नाही ही चौपाटी मोठया सागर किनाऱ्यावर किंव वाळू असलेल्या किनाऱ्यावर नाही घोडबंदर इथे वसई खाडी असून पाण्याची खोली १५० फूट आहे खाडी किनारा संपूर्ण कांदळवन आणि चिखलने भरलेला आहे हायकोर्टाने कांदळवनाची कत्तल करण्यास मनाई केलेली आहे. हायकोर्टाचा आदेश भंग करून तूम्ही हा कांदळवन तोडणार आहात का ? कांदळवन तोडून भराव केला तर पावसाळयात किनारपट्टी घरे व रहिवासी पुरामूळे धोक्यात येतील.

**मा. महापौर :-**

हया ठिकाणी काम चालू आहे का?

**विजया वैती :-**

काम चालू आहे. आम्ही तर चौपाटी मागीतली नाही मग हा चौपाटीचा प्रस्ताव कूठून आला. हयाला स्थानिक लोकांची परवानगी नाही.

**अनिता पाटील :-**

महापौराच्या परवानगीने आरक्षणा संदर्भात मला खांबित साहेबांना विचारायचे आहे. आरक्षण क्र.३५३ पेनकरपाडा गार्डनचे आहे. मागच्या ५-६ वर्षापूर्वी तिथे चांगले गार्डन विकसीत केलेले होते त्या गार्डनच्या मध्यभागी टाकी बांधण्यात आली त्यामूळे त्या गार्डनची पूर्ण वाताहात झालेली आहे. त्यामध्ये अजून कंपोस्ट खताचा प्रकल्प तिथे आणलेला आहे. पेनकरपाडयाच्या १५०-२०० फूटाच्या अंतरावर कंपोस्ट खताचा प्रकल्प आणलेला आहे हे कितपत योग्य आहे पेनकरपाडयाच्या नागरिकांना आरोग्य नाही का त्याच्या आरोग्याशी खेळण्याचा जो प्रकार चालू आहे तो कितपत योग्य आहे.

**दिपक खांबित :-**

उत्तन येथील घनकचऱ्याचा जो प्रकल्प आहे त्याबाबत महासभेमध्ये ज्या तक्रारी झाल्या त्यावेळी महासभेनी २०२४-१५ मध्ये असे निर्णय घेतले की आपण प्रत्येक भागामध्ये प्रकल्प उभारायचे त्या अंतर्गत शहरामध्ये सगळीकडेच काम करतो. महासभा असतातना पेणकरपाडयाला पकल्प उभा केला होता आणि त्याचे ३७ होवून तिथे झालेले आहे.

**अनिता पाटील :-**

साहेब तुमचे म्हणणे बरोबर आहे परंतू तुम्ही गावातून हरकती सुचना मागवल्याहोत्या का?

**दिपक खांबित :-**

मागवल्या होत्या.

**अनिता पाटील :-**

अजिबात मागवल्या नाही. मागच्या २५ वर्षापासून मी लोकप्रतिनिधी आहे. मला तुम्ही कधी कल्पना दिली. त्या प्रकल्पाला माझा पूर्ण विरोध आहे. गावकऱ्याचा देखील विरोध आहे जसे तुम्ही उत्तनच्या नगरिकांच्या जिवनाशी खेळलेले आहेत तसे पेणकरपाडयाच्या नागरिकांच्या आरोग्याशी खेळणार का? ह्या प्रकल्पाला माझा विरोध आहे माझा विरोध नोंदवून घ्या.

**विजया वैती :-**

माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळत नाही. चौपाटीचा प्रस्ताव कोणी आणला कोणाच्या मंजूरीने आणला.

**दिपक खांबित :-**

नगरविकास विभागामार्फत तो जीआर निघाला.

**विजया वैती :-**

तुम्ही स्थानिक लोकांना विचारले का की त्यांना हवा आहे. एखादया माणसाला चार दिवस उपाशी ठेवले आणि त्याला चौपाटी बघायला नेले तर तो चौपाटी बघेल का त्यांची जर घरदार तोडाल त्यांचे व्यवसाय तोडाल तर ते कूठे जातील.

**रूपाली मोदी :-**

मा. महापौराच्या परवानगीने घोडबंदर गाव हे चौपाटी बंदर आहे. लोकांचा विचार न करता घर तोडायचा हयाचे आम्हाला उत्तर दया हा प्रस्ताव कोणी आणला.

**दिपक खांबित :-**

पात्र असतील त्यांना घर देण्याची प्रोसीजर सूरू आहे.

**रूपाली मोदी :-**

गाववाली तयार नाहीत. मग तुम्ही कसे करू शकता. ३२० क्र. आरक्षीत असताना तिथे दोन भवन बांधले आहेत एक बंगाली भवन एक मैथीली भवन आणि त्याच्यत पाण्याची टाकी देखील आलेली आहे. तिकडे गार्डनसाठी रहिवाशांची मागणी आहे.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम गोषवारा आला ठराव आला नाही चर्चा झाली आरक्षण डेव्हलपमेंटसाठी राज्य शासनानी निधी मंजूर केलेला आहे म्हणजे आपले लाडके मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस हयांनी दिलेल्या प्रस्तावाला आपण विरोध करतो.

**मा. महापौर :-**

प्रशासनानी चुकीची माहिती दिलेली आहे.

**भगवती शर्मा :-**

२०२२ ची मंजूरी आहे.

**मा. महापौर :-**

प्रशासनाकडून चूकीची माहिती गेली आहे आपण आता नविन माहिती शासनाला पाठवणार आहोत.

**हसमूख गेहलोत :-**

सावंत साहेब चुकीची माहिती देतात हे सर्व प्रश्न आरक्षण विकसीत करण्यासाठीचे विषय आहेत माझा प्रश्न आहे जे पण आरक्षण आहेत ते २०२२ ला पास झाले आहेत खांबित साहेबांनी सांगावे हे आरक्षण कधी पास झाले आहेत.

**दिपक खांबित :-**

२०२० ते २०२४ मध्ये झाले आहेत.

**हसमुख गेहलोत :-**

हे सर्व आरक्षण स्कूल के गार्डन के जो शहर में बच्चो के लिए खेलने के लिए जहॉ हम ग्राऊड की बात करते जनसेवा बढ रही है तो हमे मार्केट चाहिए है बडे बूढे हो उनके लिए गार्डन होने चाहिए और बूजूर्ग हो तो उनके लिऐ विरंगूळा केंद्र होना चाहिए लोकसंख्या बढ रही है तो मार्केट होने चाहिए प्रशासन से मेरा प्रश्न है जितने भी आरक्षण थे वो स्कूल और ग्राऊड के थे जहॉ पर बच्चे खेलने जाते है जहॉ बच्चे शिक्षा लेने जाते है किसके कहने पर यह सब आरक्षण बदले गए उसका वापर बांधकाम या समाज भवन तरण तलाव कोई भी ग्राऊंड डेव्हलप भी नही किया और उसके उपर बांधकाम किया इतना किसका प्रेशर था किसके सुझाव थे वो हम जानना चाहते है

**भगवती शर्मा :-**

मेरे प्रश्न का उत्तर देने दो खांबित साहब यह किसकी मागणी थी

**दिपक खांबित :-**

मुलभूत सेवा सुविधा ही योजना ही राज्य शासनाच्या .....

**भगवती शर्मा :-**

यह सबको मालूम है मुलभूत सेवा सुविधा शासन की है लेकिन बिना मांगे कोई नही देता है

**दिपक खांबित :-**

ह्या कामासाठी सरनाईक साहेबांनी मागणी केली होती.

(सभागृहात गोंधळ)

**दिप्ती भट :-**

महापौर मॅडम परिवहन मंत्र्यानी जर ही मागणी केली असेल २००-२०० कोटीचे प्रोजेक्ट आणले तेव्हा त्यांना असे वाटले नाही का की मिरा भाईंदरमध्ये बस डेपोची गरज आहे तसेच मच्छी मार्केटची गरज आहे ते एवढे वर्ष फेटाळून आणले तर एवढे वर्ष का नाही बोलले शितल नगर, शांती नगरमध्ये पाणी भरते तिकडे नाला बनवण्यासाठी मी ११ कोटी मागते तुम्ही २०० कोटीमध्ये भवन बांधता.....

**दिपक खांबित :-**

शासनाने दिले आहेत

**दिप्ती भट :-**

हा विषय शासनानी फेटाळला आहे.

**मुन्ना सिंग :-**

यह पैसा भाजी मार्केट के लिए लाना चाहिए था

**अनिता पाटील :-**

महापौराच्या परवानगीने १४५ च्या प्रभाग १६ मध्ये घनकचरा प्रकल्पासाठी निधी प्रताप सरनाईक मंत्री साहेबानी आणलेला आहे का? पेनकरपाडयाला ३५३ मध्ये जो प्रकल्प बनतो त्याचा निधी मंत्री साहेबांनीच आणलेला आहे ना ? त्यांना महत्वाची काम दिसत नाही प्रशासन त्यांना सपोट करता.

**स्नेहा पांडे :-**

महापौराच्या परवानगीने पान क्र. २४ आरक्षण और मैदान को बदल के फुटबॉल टर्फ बनाया गया है आरक्षण क्र. २४०,१२२,११९ तीनो मैदान मे टर्फ का काम बनाया गया है जगह मिरा भाईंदर मनपा की थी और निधी शासनसे आ रही है टर्फ बनाके प्रायव्हेट व्यक्तिको दिया जाता है वो प्रायव्हेट तरीकेसे चला रहा है वहॉ पे आनेवाले खिलाडीयोस प्रायव्हेट रेटसे पैसे वसूल किए जा रहे है यह जगह उनको देके क्या मतलब है प्रशासनकी दिशाभूल हो

रही है की शासन हमको निधी दे रही है अच्छे काम के लिए समाज के लिए सार्वजनिक उपयोग के लिए लेकीन यह टर्फ प्रायव्हेट व्यक्ति चला रहा है जैसे उसकी मालकी जगह है नगरपालिकाकी जगह प्रायव्हेट को क्यू दे रहे है

**दिपक खांबित :-**

आपण असे टर्फ कोणाला दिले नाहीत आणि असे असेल तर कारवाई करण्यात येईल.

**स्नेहा पांडे :-**

आरक्षण क्र.११९ स्वर्गीय गोपीनाथ मुंडे साहेब संकूलच्या मागे टर्फ बनला आहे आणि तो चालवतो.

**दिपक खांबित :-**

कारवाई करण्यात येईल.

**शर्मिला बगाजी :-**

आता जो विषय झाला त्याच्यावर चांगली चर्चा झाली परंतू मोठया आवाजात बोलले पत्रकार आहेत म्हणून तोच विषय खरा अस होत नाही. हा निधी शासनाकडून आलेला आहे. त्याचा वापर वेगवेगळया समाज भवनासाठी केलेला आहे. समाज भवनाची काम झालेली आहेत काही अर्धवट आहेत आम्हाला अभिमान आहे मागील अडीज वर्षापासून आमचे नेते परिवहन मंत्री सरनाईक साहेबांनी हा निधी प्रशासनाला आणून दिलेला आहे. एका ठिकाणी बोलता समाज भवन सगळयासाठी खूले करणार का तो विषय प्रशासनाचा आहे त्याबाबत वाद नाही.

(सभागृहात गोंधळ)

**शर्मिला बगाजी :-**

परंतू ती जी भवन आहेत ती जी भवन आहेत ती मनपाला उपलब्ध झाली आहेत त्याला नाकारून चालणार नाही. हा जो निधी आला तो आपल्या लोकांसाठी आलेला आहे काही वाद असेल तर त्याची माहिती प्रशासनाकडून घेता तर त्याच्याबद्दल आम्ही काही बोलणार नाही. एवढा मोठा निधी आणून त्याचा वापर झालेला आहे.

**हसमुख गेहलोत :-**

महापौर मॅडम बार बार पैसा पैसा लाया हे पैसे समाजासाठी नव्हते छाती ठोकून मान्य करा.

**दिनेश जैन :-**

महापौर मॅडम जो पैस आणला आहे तो जनतेचा पैसा आहे.

(सभागृहात गोधळ)

**हसमुख गेहलोत :-**

हयाची शहानिशा झाली पाहिजे.

**दिनेश जैन :-**

पैसा आणला हे चुकीचे नाही परंतु भ्रष्टाचार झाला हे चुकीचे आहे.

**अनिल भोसले :-**

बी.एस.यु.पी. मध्ये अनेक लोक मेली

(सभागृहात गोधळ)

**दिनेश जैन :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेमध्ये विविध आरक्षणे निर्धारित करण्यात आलेली आहेत. सदर आरक्षणे त्याच उद्देशाने विकसित होणे बंधनकारक आहे. तथापि, काही ठिकाणी सुरू असलेली कामे ही मूळ आरक्षणानुसार नसून त्यामध्ये बदल करण्यात आलेले दिसून येत आहेत. आरक्षणात फेरबदलाची कार्यवाही कलम ३७ (१) अन्वये प्रस्तावित असली तरी ती अद्याप मंजूर झालेली नाही. तरीसुद्धा संबंधित आरक्षणांमध्ये नियमबाह्य व बेकायदेशीर कामे सुरू असल्याचे निदर्शनास येत आहे.

प्रत्येक आरक्षणामध्ये यु.डी.सी.पी.आर. ४.२७ (३) नुसार कार्यवाही प्रस्तावित करण्यात आलेली आहे. काही ठिकाणी सुधारित प्रारूप विकास योजनेत आरक्षणामध्ये बदल सुचविण्यात आले असले तरी अंतिम मंजुरीपूर्वीच कामे सुरू करण्यात आलेली आहेत. अशा परिस्थितीत संबंधित कामांबाबत महानगरपालिकेतर्फे कोणतीही प्रभावी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

तसेच काही आरक्षणांची संपूर्ण जागा महानगरपालिकेच्या ताब्यात आलेली नसताना संपूर्ण क्षेत्राच्या अनुषंगाने चुकीचे व नियमबाह्य नकाशे मंजूर करून आरक्षण विकसित करण्याचे काम सुरू असल्याचे दिसून येते. अनेक ठिकाणी मूळ आरक्षणाच्या व्यतिरिक्त कामे सुरू असल्यामुळे मूळ आरक्षणाचा उद्देश साध्य होऊ शकणार नाही.

आरक्षणाच्या केवळ १५ टक्के क्षेत्रात आवश्यक वापरासाठी इमारतींचे नकाशे मंजूर करण्याची तरतूद असताना प्रत्यक्षात सुरू असलेले बांधकाम १५ टक्क्यांपेक्षा अधिक असून त्यामध्ये भवन, तरणतलाव व इतर

वापरासाठी बांधकाम करण्यात आलेले आहे. यावरून मंजूर नकाशे नियमबाह्य पद्धतीने मंजूर झालेले असून प्रत्यक्ष काम देखील बेकायदेशीर असल्याचे स्पष्ट होते.

आरक्षणातील विविध कामे १०० टक्के शासन निधीतून मंजूर करण्यात आल्याचे नमूद आहे. त्यामुळे शासनाकडून प्रत्यक्षात प्राप्त होणाऱ्या निधीच्या मर्यादेतच कामे करणे बंधनकारक आहे. निधी प्राप्त न झालेल्या अवस्थेत कोणतीही कामे करू नयेत. निधी उपलब्ध नसताना कामे केल्यास त्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही. तसेच मंजूर निधीव्यतिरिक्त कोणतेही वाढीव काम करू नये, असे स्पष्ट लेखी आदेश संबंधितांना मा. आयुक्त यांनी द्यावेत.

महानगरपालिकेच्या आरक्षणांमध्ये सुरू असलेल्या कामांची वस्तुस्थिती तपासण्यासाठी व पुढील आवश्यक कार्यवाहीकरीता मा.महापौर यांच्या अध्यक्षतेखाली मा. आयुक्त, मा. उपमहापौर, मा. स्थायी समिती सभापती व मा. गटनेते यांची समिती गठीत करण्यात यावी. सदर समितीने पुढील महासभेत अहवाल सादर करावा असा ठराव या सभेत मांडण्यात येत आहे.

**मदन सिंह :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौर हया ठरावावर अंमलबजावणी होत असतांना हया भवनाबद्दल काही सदस्यांनी मत मांडले प्रशासनानी भुमिका मांडली त्याची प्रेसनोट काढण्यात यावी.

**मा. महापौर :-**

हे सुचनामध्ये नमूद करण्यात यावे.

**निला सोंस :-**

पहले मैं अभिनंदन करना चाहूँगी की आरक्षण के मुद्दे पे इतनी गंभीरतासे विषय हूए पाच साल पहले कार्यकाल रहा है लेकीन आज आरक्षण के विषय को इतना गंभीरतासे लिया पब्लिक के आरक्षणका विषय क्या होता है और आज पहले दिन आरक्षण के विषय को गंभीरतासे लिया गया प्रशासनसे में पूछना चाहूँगी जीतने भी रिझंव्हेशन है ५०% उदयान रिझंव्हेशन मे डेव्हलपमेंट होता है वह कायदे के अंतर्गत होता है यहा जो लिस्ट दि गई है ॲज पर दी १५% प्रोव्हिजन. हमारा यह विषय है ना की १५% रिझंव्हेशन में हम जनसुविधाए देते है और पहलेभी कार्यकालमें निधीसे वो सुविधाए लोगो का प्रोव्हईड कि है तो एक आरक्षण में सुविधा देना अच्छी बात है मेरे प्रभाग आरक्षण क्र.२५९ में जहॉ पे स्विमिंग पूल जिम, फूटबॉल टर्फ की ओपनिंग हूई है और सभी ने उसको अच्छा प्रतिसाद दिया आरक्षण का दुरूपयोग होता है जब वहॉ पे रेस्टॉरंट बार पास हो यहॉ कहा गया गार्डन डेव्हलप नही हूवा लेकीन १५% डेव्हलपमेंट के लिए निधी आ गई की में चाहूगी इस चीज का निरिक्षण किया जाए ऐसे कही उदयान है जिनका डेव्हलपमेंट नही हूवा है लेकीन ७०-३० के रेशीयो पे विकासक वहा बिल्डींग बना रहे है उन विकासक पे ध्यान नही दे रहे है लेकीन जो १५% जनसुविधाए है हमारे लिए जरूरी है वह जनता के लिए जरूरी है और वो विदईन द प्रोव्हिजन ऑफ लॉ है और सभीने अपने निधीसे यह बनाया होगा तो हम किसी चिज को जनरलाईज करके ना देखे विषय पे १-१ आरक्षण पे जाए जहॉ पर त्रूटी है तो उस विषय पे हम बात करे यहा बाते हो रही है लेकीन नॉट टू द पॉईट जब उन्होने ठराव लिया है।

**मा. महापौर :-**

सब सदस्यने पॉईंट पे ही बात किया है लेकीन आपका ध्यान नही है

**निला सोंस :-**

१५% आरक्षण के उपर हम यह बोले की लेकीन यह जनता के सुविधा के लिए लाए है तो उसपे आरोप क्यू हो रहे है १५% में किसी औरको प्रायव्हेट हॉटेल दे रहे है तो यह जनता के लिए हो रहा है हमारे खुद के वॉर्ड पे हो रहा है सदस्यने बोला की स्पोर्टस के लिए प्रायव्हेट को दिया यह पहले भी दिया गया हमने ऑब्जेक्शन लिया ऐसे कूछ नही हूवा

**मा. महापौर :-**

इसलिए यह सब रोकने के लिए इस विषय पे चर्चा कर रहे है यह हमे पहलेसे रोकना चाहिए था आज से शुरूवात कर रहे है प्रशासन को रोकने के लिए यह प्रस्ताव लिया गया है

**निला सोंस :-**

आपके आध्यक्षता में आरक्षण क्र ३०२ मे आपकी अध्यक्षता में प्ले ग्राऊंड में क्रिकेट के लिए टर्फ दिया गया था खांबितजी को जानकारी है इस तरह की चीजे हम करते आ रहे है इस लिए मुझे खुशी हो रही है तो आरक्षण को

इतना गंभीरता से लिया जा रहा है जो विकासक जो आरक्षण उदयान के लिए ले चूके है जिनको आरक्षण में ७०% दिया गया है वो आरक्षण पे हम बात करे उस आरक्षण को हम इग्नोर ना करे वो तो प्रायव्हेट दिया है

**भगवती शर्मा :-**

महापौर मॅडम एक सुचना है जिथपर्यत हया समितीचा अहवाल महासभेपूढे येत नाही तोपर्यत हया कामांना स्थगिती देण्यात यावी अशी माझी सुचना आहे.

**अनिल विराणी :-**

आरक्षण क्र. २०३ मध्ये नमुद करावे की ४ वर्षापासून कोणाच्या ताब्यात आहे त्याच्यामध्ये पूर्ण व्यवसाय चालू आहे मी वेळोवेळी पत्र दिलेले आहे अजून पर्यत ते गार्डन आरक्षण आहे ते झालेले नाही कोणीतरी तिथे काम घेतलेले आहे ते आरक्षण रिकामे करावे अशी विनंती आहे.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम मला वाटले ठरावामध्ये काहीतरी भ्रष्टाचार विषयी असेल किंवा आरक्षण विकसीत होतात ते बंद करायचे असेल तसे काही नाही आहे.

**मा. उपमहापौर :-**

ठराव मांडण्यापूर्वी आमचा ठराव समजून घ्या. महापौराच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात येईल त्या कमिटीमध्ये तुमचे गटनेते आहेत त्यामध्ये आपल्याला निर्णय घ्यायचा आहे जर आमचे म्हणणे तुम्हाला मान्य नसेल तर त्या कमिटीमध्ये तुम्हाला वगळतो. आम्हाला ट्रान्सफरन्सी करायची आहे त्यामूळे तुमचा पण सहभाग महत्वाचा आहे.

**अनिल सावंत :-**

आमचा सहभाग असणार.

**मा. उपमहापौर :-**

आता जो उहापोह झाला आहे. कुठे दूरूस्ती करायची असेल तुम्ही म्हणता तसा काय घोटाळा झाला असेल. मुख्यमंत्र्याच्या आरक्षणाला का स्थगिती देतो तया कमिटीमध्ये तुमचे पण गटनेते आहेत. ते पण सजेशन देतील त्याचा रिपोर्ट तुम्हाला सादर होईल. तुम्हाला ठराव करायची गरज नाही. आमचे मत की जे करतो त्याच्यामध्ये तुमचे पण गटनेते आहेत सगळयांनी मिळून निर्णय घ्यायचा आहे.

**अनिल सावंत :-**

आम्हाला काही गोष्टीचे बंधन आहे प्रकरण क्र. १३, गोषवाऱ्यामध्ये नमुन आरक्षणे विकसीत करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सरकारने निधी दिलेला आहे व राज्य सरकारने मान्यता दिलेली आहे. मुख्यमंत्र्यांचे शहरावर विशेष प्रेम आहे ते या शहराच्या बाबतीत काही चुकीचे करतील हे संभवत नाही. या शहरामध्ये चांगल्या वास्तू उभ्या राहिल्या आहेत. विशेषत: लता मंगेशकर नाट्यगृह. तरी हे सर्व कामांचा आढावा घेऊन सविस्तर रिपोर्ट महासभेसमोर आणावा. स्थानिकांची मते विचारात घेऊन विकास करावा असा मी ठराव मांडत आहे.

**जय ठाकूर :-**

माझे अनुमोदान आहे.

**महापालिका सचिव :-**

प्रकरण क्र. १३ करिता दोन ठराव आले आहेत. पहिला ठराव सुचक दिनेश जैन अनुमोदन उदितनारायण सिंह दुसरा ठराव सुचक अनिल सावंत अनुमोदन जय ठाकूर सर्वप्रथम दुसरा ठराव मतदानास टाकण्यात येत आहे सुचक अनिल सावंत ह्यांच्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहे. ठराव्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्री. दिनेश जैन हयांच्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहे. ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

सुचक दिनेश जैन हयांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ७२ विरोधात १६ तटस्थ ० इतकी मते पडलेली आहेत. दिनेश जैन हयांनी मांडलेला ठराव बहूमताने मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १३ :-**

मिरा भाईंदर शहराच्या मंजुर विकास योजनेतील आरक्षणात सुरु असलेल्या विविध कामांबाबत.

**ठराव क्र. १३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेमध्ये विविध आरक्षणे निर्धारित करण्यात आलेली आहेत. सदर आरक्षणे त्याच उद्देशाने विकसित होणे बंधनकारक आहे. तथापि, काही ठिकाणी सुरू असलेली कामे ही मूळ आरक्षणानुसार नसून त्यामध्ये बदल करण्यात आलेले दिसून येत आहेत. आरक्षणात फेरबदलाची कार्यवाही

कलम ३७ (१) अन्वये प्रस्तावित असली तरी ती अद्याप मंजूर झालेली नाही. तरीसुद्धा संबंधित आरक्षणांमध्ये नियमबाह्य व बेकायदेशीर कामे सुरू असल्याचे निदर्शनास येत आहे.

प्रत्येक आरक्षणामध्ये यु.डी.सी.पी.आर. ४.२७ (३) नुसार कार्यवाही प्रस्तावित करण्यात आलेली आहे. काही ठिकाणी सुधारित प्रारूप विकास योजनेत आरक्षणामध्ये बदल सुचविण्यात आले असले तरी अंतिम मंजुरीपूर्वीच कामे सुरू करण्यात आलेली आहेत. अशा परिस्थितीत संबंधित कामांबाबत महानगरपालिकेतर्फे कोणतीही प्रभावी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

तसेच काही आरक्षणांची संपूर्ण जागा महानगरपालिकेच्या ताब्यात आलेली नसताना संपूर्ण क्षेत्राच्या अनुषंगाने चुकीचे व नियमबाह्य नकाशे मंजूर करून आरक्षण विकसित करण्याचे काम सुरू असल्याचे दिसून येते. अनेक ठिकाणी मूळ आरक्षणाच्या व्यतिरिक्त कामे सुरू असल्यामुळे मूळ आरक्षणाचा उद्देश साध्य होऊ शकणार नाही.

आरक्षणाच्या केवळ १५ टक्के क्षेत्रात आवश्यक वापरासाठी इमारतींचे नकाशे मंजूर करण्याची तरतूद असताना प्रत्यक्षात सुरू असलेले बांधकाम १५ टक्क्यांपेक्षा अधिक असून त्यामध्ये भवन, तरणतलाव व इतर वापरासाठी बांधकाम करण्यात आलेले आहे. यावरून मंजूर नकाशे नियमबाह्य पद्धतीने मंजूर झालेले असून प्रत्यक्ष काम देखील बेकायदेशीर असल्याचे स्पष्ट होते.

आरक्षणातील विविध कामे १०० टक्के शासन निधीतून मंजूर करण्यात आल्याचे नमूद आहे. त्यामुळे शासनाकडून प्रत्यक्षात प्राप्त होणाऱ्या निधीच्या मर्यादेतच कामे करणे बंधनकारक आहे. निधी प्राप्त न झालेल्या अवस्थेत कोणतीही कामे करू नयेत. निधी उपलब्ध नसताना कामे केल्यास त्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही. तसेच मंजूर निधीव्यतिरिक्त कोणतेही वाढीव काम करू नये, असे स्पष्ट लेखी आदेश संबंधितांना मा. आयुक्त यांनी द्यावेत.

महानगरपालिकेच्या आरक्षणांमध्ये सुरू असलेल्या कामांची वस्तुस्थिती तपासण्यासाठी व पुढील आवश्यक कार्यवाहीकरीता मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली मा. आयुक्त, मा. उपमहापौर, मा. स्थायी समिती सभापती व मा. गटनेते यांची समिती गठीत करण्यात यावी. सदर समितीने पुढील महासभेत अहवाल सादर करावा असा ठराव या सभेत मांडण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. दिनेश जैन अनुमोदन :- श्री. मदन सिंह**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. भगवती शर्मा यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

समितीचा अहवाल महासभेपुढे येत नाही तोपर्यंत ह्या सर्व कामांना स्थगीती देण्यात यावी अशी मी सुचना मांडत आहे.

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | शर्मा मानशी रमेश | १ | सुनिल चंपालाल चौधरी | **निरंक** |
| २ | ॲड. श्रध्दा संदिप कदम | २ | रिजवाना अनवर खान | |
| ३ | पंकज पांडेय (दरोगा) | ३ | सना खलील देशमुख | |
| ४ | मयेकर रजनीकांत पांडुरंग | ४ | जय राजेंद्र ठाकूर | |
| ५ | गोहील शानू जोरावरसींग | ५ | तारेन वेंचर मेंडोन्सा | |
| ६ | दत्ता जया रथीन | ६ | शेख रुबिना फिरोज | |
| ७ | सिंह मदन उदितनारायण | ७ | आयरिन पॉल कॉड्रस | |
| ८ | दिव्या प्रसाद परब | ८ | अनिल दिवाकर सावंत | |
| ९ | योगिता सतीशचंद्र शर्मा | ९ | रफिक गुलाब पठाण | |
| १० | गणेश गोपाळ शेट्टी | १० | आफरीन मुझफ्फर हुसेन सय्यद | |
| ११ | तरुण सुभाष शर्मा | ११ | सौ.रुबिना फैजूल्ला शेख | |
| १२ | स्मिता विशाल पाटील | १२ | अशरफ अहमद मिस्त्री | |
| १३ | प्रेमनाथ गजानन पाटील | १३ | शॉन लिओ कोलासो | |
| १४ | गुप्ता कुसुम संतोष | १४ | पाटील वंदना विकास | |
| १५ | शाह राकेश रतिशचंद्र | १५ | बगाजी शर्मिला विन्सन | |
| १६ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | १६ | डिमेलो फ्रिडा बर्नड | |
| १७ | मेबल नोएल कोरीया | | | |
| १८ | जैन सुनिता रमेश | | | |
| १९ | परेश जयंतीलाल शाह | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| २० | कोठारी भरतकुमार नथमलजी | | |
| २१ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | | |
| २२ | डॉ. भव्या पिपलिया (शाह) | | |
| २३ | आभा अमेय पाटील | | |
| २४ | ॲड. रवि व्यास | | |
| २५ | किमया सुहास रकवी | | |
| २६ | कोमल विठ्ठल नावन्धर | | |
| २७ | भगवती तुगनचंद शर्मा | | |
| २८ | सुरेश खंडेलवाल | | |
| २९ | महेश नरेश म्हात्रे | | |
| ३० | विरकर आकांक्षा शंकर | | |
| ३१ | सावंत दिपक कल्याणराव | | |
| ३२ | करुणा किशोर पाटील | | |
| ३३ | डोंगरे सचिन सुरेश | | |
| ३४ | विशाल जगन्नाथ पाटील | | |
| ३५ | लक्ष्मण गणपत जंगम | | |
| ३६ | मेहता डिंपल विनोद | | |
| ३७ | स्नेहा शैलेश पांडे | | |
| ३८ | गेहलोत हसमुख मोहनलाल | | |
| ३९ | रुपाली शिंदे मोदी | | |
| ४० | वैती विजया हेमचंद्र | | |
| ४१ | जैन प्रिती चंद्रकांत | | |
| ४२ | थेराडे संजय अनंत | | |
| ४३ | ज्योत्सना जालींदर हसनाळे | | |
| ४४ | पारधी तुषार यशवंत | | |
| ४५ | यशोदा अनिल ताटे | | |
| ४६ | मोहन गोपाळ म्हात्रे | | |
| ४७ | सुरेखा प्रकाश सोनार | | |
| ४८ | मनस्वी प्रमोद पाटील | | |
| ४९ | मनिष प्रितम पराशर | | |
| ५० | अनिता जयवंत पाटील | | |
| ५१ | जाट प्रतिभा चंदु | | |
| ५२ | भावसार वंदना संजय | | |
| ५३ | नवीन गुप्तेश्वर सिंह | | |
| ५४ | आनंद दत्ताराम मांजरेकर | | |
| ५५ | अरोरा दिपीका पंकज | | |
| ५६ | बेलानी हेमा राजेश | | |
| ५७ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | |
| ५८ | निर्मला बाबुराव सावळे | | |
| ५९ | ॲड. मयुरी सचिन म्हात्रे | | |
| ६० | विवेक महेंद्र उपाध्याय | | |
| ६१ | परमार हेतल रतीलाल | | |
| ६२ | भट दिप्ती शेखर | | |
| ६३ | संजय बाळाजी पवार | | |
| ६४ | जैन दिनेश तेजराज | | |
| ६५ | कांबळी श्रध्दा सुधीर | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ६६ | सिमा कमलेश शाह | | |
| ६७ | दुबे मनोज रामनारायण | | |
| ६८ | अनिल रवजीभाई विराणी | | |
| ६९ | भानुशाली वर्षा गिरधर | | |
| ७० | संजय वसंत थरथरे | | |
| ७१ | भोईर जयेश भानुदास | | |
| ७२ | भोसले अनिल बाबुराव | | |

**ठराव बहूमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**महापालिका सचिव :-**

प्रकरण क्र. १४, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ठाणे घोडबंदर रस्त्यामधील फाऊंटन हॉटेल ते गायमुख पर्यंत रस्त्याबाबत.

**तुषार पारधी :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ठाणे - घोडबंदर रस्त्यामधील फाऊंटन हॉटेल ते गायमुख या राज्य मार्ग क्र. ८४ हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभाग ठाणे,महाराष्ट्र शासन यांच्या ताब्यात होता. प्रशासकीय राजवटीत प्रशासकीय ठराव क्र.१००, दि.०८/०८/२०२४ रोजीच्या मान्यतेने फाऊंटन हॉटेल ते गायमुख हा ४.४०० कि.मी लांबीचा रस्ता मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करुन घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

सदर रस्त्याच्या उजवीकडे CRZ, मँग्रोज व डावीकडे नॅशनल फॉरेस्ट (नॅशनल पार्क) आहे त्यामुळे येथे शहराचा विकास होणे संभव नाही. या रस्त्यावरुन मिरा भाईंदर शहरातील नागरिकांचा सुमारे ५ टक्केच वापर होत आहे व ९५ टक्के वापर इतर शहरांकरीता होत आहे.

पहिल्या वर्षीच सदर रस्ता दुरुस्तीवर सुमारे ८ कोटी खर्च झाला आहे व महानगरपालिकेची आर्थिक स्थिती पाहता  महामार्गावर दुरुस्ती करीता प्रत्येक वर्षी करोडो रुपये खर्च करणे शक्य नाही. सदरचा रस्त्याचे ६० मीटर रुंदीकरणाचे काम प्रस्तावित आहे. सदर रस्त्या रुंदीकरणाकरीता जागा ताब्यात घेणेकरीता भूसंपादन करणेची प्रक्रिया गेल्या दोन वर्षापासून मनपाव्दारे चालू आहे परंतू त्यामध्ये यश आले नाही. तसेच रुंदीकरणाकरीता पर्यावरण, वन विभाग व इतर आवश्यक परवानग्या महानगरपालिकेस घ्यावयाच्या आहेत परंतू तेही अद्याप शक्य झालेले नाही.

उपरोक्त परिस्थिती व महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती पाहता सदर रस्त्याचे काम महापालिकेस शक्य होणार नसल्याने फाऊंटन हॉटेल ते गायमुख हा ४.४०० कि.मी लांबीचा रस्ता हा एम.एम.आर.डी.ए तयार करणार असल्याने सदर रस्ता मिरा भाईंदर महानगरपालिकेकडून राज्य शासनास परत हंस्तातरीत करण्यात यावा या कामासाठी आवश्यक परवानग्या व भुसंपादनाची सुरु असलेली प्रक्रीया तात्काळ थांबवावी तसेच प्रशासकीय कार्यकाळात झालेला ठराव क्र १००, दि.०८/०८/२०२४ रद्द करण्यात यावा असा ठराव मांडत आहे.

**राकेश शहा :-**

माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम सदर रस्ता शासनाचा आहे हे नमुद झाले आहे फेब्रुवारी २०२५ मध्ये तो रस्ता आपल्याला हॅन्डओव्हर झाला आपण  करू शकत नाही हे आपल्याला माहित आहे मग वर्षभर प्रशासनाने काय केले.इकडून ठाण्याला जायचे असेल भाईदर ते चेना जायला किती वेळ लागतो. राज्यशासनाने मुख्यमंत्री उप मुख्यमंत्री ह्या ठाणे जिल्हयाचे उपमुख्यमंत्री पुर्वी ते मुख्यमंत्री होते हया शहराला ४-४ आमदार मिळाले आहेत खासदार आहेत मग हा एवढासा रस्ता राज्यशासनाने आपल्याला का हॅन्डओव्हर करावा मागच्या विषयामध्ये ५०० करोड दिले हा रस्ता फेब्रुवारीमध्ये हॅन्डओव्हर झाला त्यावेळी प्रशासनाने आपली बाजू का मांडली नाही. लोकप्रतिनिधी नव्हते. ८-९ करोड का खर्च केले. आता आपण एम.एम.आर.डी.ए. ला सांगणार आहोत लोकांना रस्ता पाहिजे ही वस्तूस्थिती आहे. ७-८ किलो मिटरचा रस्ता करून दयायची राज्यसरकारची कॅपेसिटी तर आहे. त्यासाठी वर्षभराची दिरंगाई का ?

**मा. उपमहापौर :-**

लोकशाही आघाडीमे उनके भी तीन सदस्य है उनको पूछोगे तो परफेक्ट जवाब मिल जाएगा।

**मा. महापौर :-**

खांबित साहेब घोडबंदर रस्त्याचा विषय आहे.

**दिपक खांबित :-**

मा. महापौराच्या परवानगीने गोषवाऱ्यामध्ये स्पष्ट दिले आहे की मा. मुख्यमंत्री ह्यांनी २२ एप्रिल २०२३ सार्व. बांधकाम विभागाला निर्देश दिले त्यानंतर ९ जुलै २०२४ ला विधानभवनमध्ये झालेल्या बैठकीत त्यांनी हा रस्ता आपल्याला हॅन्डओव्हर करायला सांगितला हा रस्ता एम.एम.आर.डी.ए. करेल कारण गायमुख ते काशिमिरा मेट्रो त्याच्यावर आहे. त्याच्यासोबत ६० मिटरचा रस्ता करायचा हे काम एम.एम.आर.डी.ए.ला काम सांगितले परंतू आपल्या हद्दीत असल्यामूळे त्या रस्त्याचे भु संपादन आणि आवश्यक ते वनविभाग असेल किंवा कांदळवन ह्या परमिशन घ्यायची जबाबदारी लोकल बॉडीची असते त्यामुळे आपल्याकडे तो हॅन्डओव्हर केला नाही हॅन्ड ओव्हर करतांना ८/८/२४ ला प्रशासकीय ठराव केला आहे. त्यानंतर ३/१/२५ ला मनपाकडे हॅन्डओव्हर झाला आपल्याकडे हस्तांतर झाल्यावर जी काही दूरूस्ती होती ती मागील वर्षी आपल्याला करावी लागली. ठाणे हद्दीतील जी दुरूस्ती होती ती त्यांनी केली आपली होती ती आपण केली आपल्याकडे हॅन्डओव्हर झाल्यामूळे तो आपण केला.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम २०२४ ला रस्ता हस्तांतर केला २०२३ ला त्यांनी निर्देश दिले की एम.एम.आर.डी.ए. करणार आहे. मग आपण हॅन्डओव्हर का करून घेतला आपली बाजू का मांडली नाही.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर मॅडम जर महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यानी निर्देश दिले आणि स्थानिक प्रशासन म्हणते त्यांना पेपरवर्कच्या जबाबदाऱ्या दिल्या तर त्याच्याकडे काय खुलासा मागाल. एखाद्या विषयावर बोलत असतांना हे अधिकाऱ्यांनी योग्य काम केले आहे ते समजून घेतले पाहिजे त्यावेळच्या मुख्यमंत्र्यानी किवा आताच्या मुख्यमंत्र्यांनी सांगितले की ते हॅन्डओव्हर करून ते काम तुम्ही करा पण जी गोष्ट मनपाच्या कूवतीच्या पूढची आहे ती पून्हा घेवून काय करणार म्हणून सभागृहाने तो ठराव करून नाकारलेला आहे. हे आपण समजून घ्या.

**अनिल सावंत :-**

तो ठराव आम्ही स्विकारत नाही गेल्या वर्षभर......

**लक्ष्मण जंगम :-**

तुमही जी शंका उपस्थित केली त्यावर मी सांगतो तुम्ही अधिकाऱ्याकडून खूलासा मागवला त्यांनी खुलासा स्पष्ट केला आहे.

**अनिल सावंत :-**

साहेब अधिकाऱ्यांना खुलासा करू दया. तुम्ही कशाला बोलता.

**लक्ष्मण जंगम :-**

मी तुम्हाला सांगत नाही मी महापौराच्या परवानगीने बोलतो आपण अधिकाऱ्यांकडे खुलासा मागितल्यावर त्यांनी तो स्पष्ट केल्यावर त्या विषयावर परत काय बोलणार जी गोष्ट आपल्याला परवडत नाही ती आपण नाकारतो.

**अनिल सावंत :-**

साहेब विषय असा राज्य सरकारने जेव्हा आपल्याला रस्ता हॅन्डओव्हर केला त्यावेळी आपली परिस्थिती नव्हती मग आपण वर्षभर आपण काय केले आता वर्षभरानंतर तो ठराव मान्य करत नाही हा माझा प्रश्न आहे. त्याच्या अगोदर का केला नाही.

**दिपक खांबित :-**

हा विषय प्रशासनानी आणलेला नाही. महापौरानी विषय घेतला आणि प्रशासनानी वस्तूस्थिती माहितीसाठी दिलेला आहे.

**अनिल सावंत :-**

समजा महापौर मॅडमनी विषय घेतला नसता तर अजून दिरंगाई केली असती. तीन वर्ष लोकप्रतिनिधी नव्हते नागरिकांची लोकप्रतिनिधी आपणच होता हा रस्ता आपण करू शकत नाही.

**दिपक खांबित :-**

तत्कालिन प्रशासक ह्यांनी त्यांच्या अधिकारात हा निर्णय घेतला होता. हॅन्डओव्हर करून घ्यायचा. महासभेपूढे निर्णय ठेवला महासभा निर्णय घेईल.

**अनिल सावंत :-**

तो रस्ता होणे गरजेचे आहे.मनपा करू शकत नाही परंतू एम.एम.आर.डी.ए. च्या माध्यमातून मागे लागून मुख्यमंत्र्याकडून तो पास करून घ्या. तो रस्ता कसा लवकरात लवकर होईल ते बघा.

**प्रकरण क्र. १४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ठाणे घोडबंदर रस्त्यामधील फाऊंटन हॉटेल ते गायमुख पर्यंत रस्त्याबाबत.

**ठराव क्र. १४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ठाणे - घोडबंदर रस्त्यामधील फाऊंटन हॉटेल ते गायमुख या राज्य मार्ग क्र. ८४ हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभाग ठाणे,महाराष्ट्र शासन यांच्या ताब्यात होता. प्रशासकीय राजवटीत प्रशासकीय ठराव क्र.१००, दि.०८/०८/२०२४ रोजीच्या मान्यतेने फाऊंटन हॉटेल ते गायमुख हा ४.४०० कि.मी लांबीचा रस्ता मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करुन घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

सदर रस्त्याच्या उजवीकडे CRZ, मँग्रोज व डावीकडे नॅशनल फॉरेस्ट (नॅशनल पार्क) आहे त्यामुळे येथे शहराचा विकास होणे संभव नाही. या रस्त्यावरुन मिरा भाईंदर शहरातील नागरिकांचा सुमारे ५ टक्केच वापर होत आहे व ९५ टक्के वापर इतर शहरांकरीता होत आहे.

पहिल्या वर्षीच सदर रस्ता दुरुस्तीवर सुमारे ८ कोटी खर्च झाला आहे व महानगरपालिकेची आर्थिक स्थिती पाहता  महामार्गावर दुरुस्ती करीता प्रत्येक वर्षी करोडो रुपये खर्च करणे शक्य नाही. सदरचा रस्त्याचे ६० मीटर रुंदीकरणाचे काम प्रस्तावित आहे. सदर रस्त्या रुंदीकरणाकरीता जागा ताब्यात घेणेकरीता भूसंपादन करणेची प्रक्रिया गेल्या दोन वर्षापासून मनपाव्दारे चालू आहे परंतू त्यामध्ये यश आले नाही. तसेच रुंदीकरणाकरीता पर्यावरण, वन विभाग व इतर आवश्यक परवानग्या महानगरपालिकेस घ्यावयाच्या आहेत परंतू तेही अद्याप शक्य झालेले नाही.

उपरोक्त परिस्थिती व महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती पाहता सदर रस्त्याचे काम महापालिकेस शक्य होणार नसल्याने फाऊंटन हॉटेल ते गायमुख हा ४.४०० कि.मी लांबीचा रस्ता हा एम.एम.आर.डी.ए तयार करणार असल्याने सदर रस्ता मिरा भाईंदर महानगरपालिकेकडून राज्य शासनास परत हंस्तातरीत करण्यात यावा या कामासाठी आवश्यक परवानग्या व भुसंपादनाची सुरु असलेली प्रक्रीया तात्काळ थांबवावी तसेच प्रशासकीय कार्यकाळात झालेला ठराव क्र १००, दि.०८/०८/२०२४ रद्द करण्यात यावा असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. तुषार पारधी　　　　　　अनुमोदन :- श्री. राकेश शाह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**महापालिका सचिव :-**

प्रकरण क्र. १५, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्र पुरमुक्त शहर (FLOOD FREE CITY) करणेबाबत.

**प्रेमनाथ पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राच्या तीन बाजूस खाडी, समुद्र असून पुर्वेकडील बाजूस संजय गांधी राष्ट्रीय उद्यान आहे. शहराच्या तीन बाजूस खाड्या व समुद्र असल्याने भरतीवेळी शहरात लहान खाड्यातून पाणी शहरात येते. तसेच संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील डोंगर रस्त्यातून पावसाचे पाणी हे राष्ट्रीय महामार्ग ओलांडून दहिसर ते घोडबंदर मधील विविध नाल्यातून पेणकरपाडा, मिरागांव, काशीगांव, घोडबंदर भागातून घोडबंदर खाडीस वाहते.

पावसाळ्यातील पावसाचे पाणी व भरतीचे पाणी यामुळे पाण्याचा निचरा न झाल्याने शहरातील सखल भागात पावसाचे पाणी साचते व पुर परिस्थिती निर्माण होऊन नागरिकांचे लाखो रुपयांचे नुकसान होते व नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होतो, वाहतुक व रहदारी बंद होते, तसेच नागरिकांचे जनजीवन विस्कळीत होते.

मिरा भाईंदर शहर पुरमुक्त होण्यासाठी खाड्यांच्या प्रवेशा ठिकाणी फ्लॅप गेट महापालिकेमार्फत ACOTECH CONSULTANT PVT LTD या कंपनीद्वारे सर्वेक्षण करण्यात येऊन डी.पी.आर व उपाययोजना सादर केलेले आहे. त्यानुसार महानगरपालिकेने पालिकेतील अनुभवी निवृत्त झालेले अधिकारी, सध्या कार्यरत असलेले अधिकारी, शहरातील पावसाच्या पाण्याचा निचरा कसा होईल याची माहिती असलेले आजी माजी नगरसेवक / नागरिक यांच्याशी विचार विनीमय करुन उपाययोजना राबविण्यात याव्यात.

मिरा भाईंदर शहराचे मोठ्या प्रमाणावर नागरिकरण झाले असून लोकसंख्या मोठ्या स्वरुपात वाढलेली आहे, सद्यस्थितीत असलेले नाले हे त्यावेळच्या परिस्थितीनुसार बांधण्यात आलेले आहेत. मिरा भाईंदर शहर पुरमुक्त होण्यासाठी शहरातील सर्व नाल्यांचे सर्वेक्षण होणे आवश्यक आहे. त्यासाठी नव्याने सर्वेक्षण करणे व आवश्यक

उपाययोजनासह सविस्तर प्रकल्प अहवाल आय.आय.टी, मुंबई / व्ही.जे.टी.आय / निरी या संस्थेकडून करुन घेण्यास व येणा-या खर्चासाठी ही सभा प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

नाल्यातील कांदळवन / तिवरांची झाडे काढणे, नाल्याचे खोलीकरण, रुंदीकरण करणेसाठी कांदळवन कक्ष,वन विभाग व मा.उच्च न्यायालय यांची परवानगी घेण्याच्या प्रक्रियेस मा.आयुक्तांनी पाठपुरावा करावा.

**वर्षा भानुशाली :-**

माझे अनुमोदन आहे.

**जयेश भोईर :-**

महापौर मॅडम सुभाषचंद्र बोस मैदानापासून मुर्धा गाव, राई गाव, मोरवा गाव हया खाडया होत्या त्याच्यात मॅग्रोजचे प्रमाण जास्त झाले आमच्या संपूर्ण भाईंदर पश्चिमेचे पाणी आमच्या गावाठिकाणी जातो. मॅग्रोजचे वाढल्यामूळे ते खाडीमध्ये जाते त्याचा निचरा झाला पाहिजे. राई, मुर्धा, मोरवा हया गावामध्ये शेती असल्यामूळे शेतीचे नुकसान होईल गांव पाण्याखाली जातील त्यामूळे सर्व्हेमध्ये तीनही गावाचा समावेश असावा अशी माझी सुचना आहे.

**हसमुख गेहलोत :-**

पूर्ण मिरा भाईंदर आहे.

**मा. महापौर :-**

पूर्ण शहराचा विषय आहे त्याप्रमाणे आपण ठराव घेत आहोत.

**जयेश भोईर :-**

मी सुचना दिलेली आहे. तीन गावाची नोंद नाही.

**शॅान कोलासो :-**

आमची नवि खाडी पाली अशी एक खाडी आहे आणि मोठा गाव खाडी आहे. सध्याची परिस्थिती बघता आपण जो पुरमूक्त शहराचा जो कन्सेप्ट आणला आहे त्यामध्ये हया दोन खाडयाचा समावेश झाला पाहिजे विशेषता आपला जो घनकचरा प्रकल्प आहे त्यामधून जो लिचेड निघते ते लिचेड कांदळवन क्षेत्रात पूर्ण अडकून पडते त्यामूळे पूर परिस्थिती निर्माण होवू शकते त्यामूळे नागरिकांना राहण्यास होत नाही त्यामूळे नवि खाडी आणि मोठागाव खाडी हयाचा देखील हयामध्ये समावेश करण्यात यावा. अशी माझी सूचना आहे.

**मा. महापौर :-**

पूर्ण मिरा भाईंदर शहराचा प्लानिंग करून विषय आणलेला आहे.

**हसमूख गेहलोत :-**

सर्वांना विनंती आहे ठराव ऐकून घ्यावा विषयामध्ये सर्व मिरा भाईंदरचा विषय आहे.

**पंकज पांडे :-**

मेरी भी इस विषय पे सुचना है प्रभाग क्र.१ खाडी के परिसर से लगे हूए है बजरंग नगर क जो नाला है

**मा. महापौर :-**

आपके प्रभाग का तो बडा विषय है हम लोग पूरे शहर का विषय ले रहे है

**सुरेश खंडेलवाल :-**

मा. महापौर मॅडम जो गेटचा विषय घेतला आहे हयाच्यामध्ये माझा असा अनुभव आहे की कांदळवनच्या परमिशनसाठी खुप दिवसापासून प्रयत्न करत आहोत त्याच्यामध्ये प्रशासनानी सांगावे की कांदळवनची परवानगी आतापर्यत का मिळाली नाही. फ्लॅप गेटचा विष्य चांगला आहे त्याच्यासाठी आर्थिक मान्यता देवू....

**मा. महापौर :-**

सर्व सदस्यांनी बसून घ्या खांबितसाहेब हयाचा खुलासा करावा.

**दिपक खांबित :-**

मा. महापौराच्या परवानगीने आपल्या शहरामध्ये जे पाणी आहे ते २२ नाल्यामधून आणि २२ खाड्यामधून समुद्रात आणि वसई खाडीमध्ये जाते ह्याच्यामध्ये काही ज्या खाडी आहेत राई, मुर्धा, मोरवा, उत्तन, हटकेश घोडबंदरची उघाडी आहे तिथपासून ह्याच्यामध्ये मोठया प्रमाणात कांदळवन वाढले आहे नाले खोदण्यासाठी सी.आर.झेडची परमिशन मिळाली आहे परंतू त्याच्यावर जे मॅग्रोज आहे त्याची परमिशन मिळाली नाही त्याचा सर्व्हे झालेला आहे. नाल्यामधील मॅग्रोज काढण्यासाठी आपल्याला दुप्पट जागा द्यायला लागते त्या जागेची आपण मागणी केली होती आताच आपल्याकडे उत्तनला कांदळवन कक्ष पर्यायी जागा म्हणून रिझर्व्हेशन मंजूर झाले आहे. त्याच्या व्यतिरिक्त आपण धारावी आणि १-२ ठिकाणी जिल्ह्यामध्ये कांदळवनसाठी पर्यायी जागा मागितली आहे. आपल्याला ही जर परमिशन मिळाली आहे हायकोर्टात तीच परमिशन बाकी आहे. हया जर परमिशन मिळाल्या तर आपले जे शहरात नाले आहेत त्याच्यामध्ये डीपपण करता येतील आणि मॅग्रोजची झाडे पण काढता येतील पूर्वी तिथे बोटी वैगेरे

येत असत हे काम बाकी आहे त्यासाठी आपण सल्लागार नेमला आहे आणि आपले युध्दपातळीवर काम चालू आहे. आपण सहकार्य करून शासन पातळीवर लवकर हे काम करू शकतो.

**सुरेश खंडेलवाल :-**

महापौर मॅडम माझी एक विनंती आहे. वन मंत्रयाकडून एक मिटींग लावून कांदळवनसाठी ज्या जागेची आपण मागणी करतो ती जागा लवकरात लवकर घेवून पावसाळयापूर्वी निष्कर्ष निघत असेल तर जनतेला मोठा दिलासा मिळेल.

**मा. महापौर :-**

प्रशासनाच्या वतीने आपली एक सभा घेण्यात यावी. त्या मिरा भाईंदरचे जो कांदळवनचा विषय घेवून तो मार्गी लावायचा आहे.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर मॅडम यह विषय अलग है इसके आय टी का सर्व्हे हूवा है इसके अलाव प्रशासनने जो २२ नाले है उसके गेट लगाने के लिए १२९ करोड की योजना राज्य सरकारसे अनुदान लेकर की है वो काम कन्टीन्यू चलेगा उसमे शहर के २२ नाले है

**दिपक खांबित :-**

इसके लिए २-३ डिपार्टमेंटसे पैसे मांगे है पूरे सिटीका सर्व्हे करके टप्पे टप्पेसे कौनसा करने का है वो हिसाब से महासभा फायनल करेगी

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्र पुरमुक्त शहर (FLOOD FREE CITY) करणेबाबत.

**ठराव क्र. १५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राच्या तीन बाजूस खाडी, समुद्र असून पुर्वेकडील बाजूस संजय गांधी राष्ट्रीय उद्यान आहे. शहराच्या तीन बाजूस खाड्या व समुद्र असल्याने भरतीवेळी शहरात लहान खाड्यातून पाणी शहरात येते. तसेच संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील डोंगर रस्त्यातून पावसाचे पाणी हे राष्ट्रीय महामार्ग ओलांडून दहिसर ते घोडबंदर मधील विविध नाल्यातून पेणकरपाडा, मिरागांव, काशीगांव, घोडबंदर भागातून घोडबंदर खाडीस वाहते.

पावसाळ्यातील पावसाचे पाणी व भरतीचे पाणी यामुळे पाण्याचा निचरा न झाल्याने शहरातील सखल भागात पावसाचे पाणी साचते व पुर परिस्थिती निर्माण होऊन नागरिकांचे लाखो रुपयांचे नुकसान होते व नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होतो, वाहतुक व रहदारी बंद होते, तसेच नागरिकांचे जनजीवन विस्कळीत होते.

मिरा भाईंदर शहर पुरमुक्त होण्यासाठी खाड्यांच्या प्रवेशा ठिकाणी फ्लॅप गेट महापालिकेमार्फत ACOTECH CONSULTANT PVT LTD या कंपनीव्दारे सर्वेक्षण करण्यात येऊन डी.पी.आर व उपाययोजना सादर केलेले आहे. त्यानुसार महानगरपालिकेने पालिकेतील अनुभवी निवृत्त झालेले अधिकारी, सध्या कार्यरत असलेले अधिकारी, शहरातील पावसाच्या पाण्याचा निचरा कसा होईल याची माहिती असलेले आजी माजी नगरसेवक / नागरिक यांच्याशी विचार विनीमय करुन उपाययोजना राबविण्यात याव्यात.

मिरा भाईंदर शहराचे मोठ्या प्रमाणावर नागरिकरण झाले असून लोकसंख्या मोठ्या स्वरुपात वाढलेली आहे, सद्यस्थितीत असलेले नाले हे त्यावेळच्या परिस्थितीनुसार बांधण्यात आलेले आहेत. मिरा भाईंदर शहर पुरमुक्त होण्यासाठी शहरातील सर्व नाल्यांचे सर्वेक्षण होणे आवश्यक आहे. त्यासाठी नव्याने सर्वेक्षण करणे व आवश्यक उपाययोजनासह सविस्तर प्रकल्प अहवाल आय.आय.टी, मुंबई / व्ही.जे.टी.आय / निरी या संस्थेकडून करुन घेण्यास व येणा-या खर्चासाठी ही सभा प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

नाल्यातील कांदळवन / तिवरांची झाडे काढणे, नाल्याचे खोलीकरण, रुंदीकरण करणेसाठी कांदळवन कक्ष,वन विभाग व मा.उच्च न्यायालय यांची परवानगी घेण्याच्या प्रक्रियेस मा.आयुक्तांनी पाठपुरावा करावा.

**सुचक :- श्री. प्रेमनाथ पाटील** **अनुमोदन :- श्रीम. वर्षा भानुशाली**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**महापालिका सचिव :-**

प्रकरण क्र. १६, मिरारोड (पुर्व) वॉर्ड क्र. ०९ येथील हजरत टिपु सुलतान चौक नाव बदलणेबाबत.

**संजय पवार :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध रस्ते, चौक व वास्तू यांचे नामकरण करण्याचे अंतिम अधिकार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची 'ड' मधील प्रकरण क्र. ११ (२) नुसार महानगरपालिकेस / मा. महासभेस प्रदान करण्यात आलेले आहेत.

मिरारोड (पूर्व) वॉर्ड क्र. ०९ येथील उड्डाणपुल ते लोढा पार्क रस्त्यावरील चौकास सध्या टिपु सुलतान यांचे नाव देण्यात आलेले आहे. सदर चौकाचे नाव बदलण्याबाबत विविध सामाजिक संघटना, संस्था व स्थानिक नागरिकांकडून लेखी विनंत्या प्राप्त झालेल्या आहेत.

त्या अनुषंगाने, देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात महत्त्वपूर्ण योगदान देणारे क्रांतिकारक अशफाक उल्ला खान यांच्या स्मरणार्थ सदर चौकास "स्वातंत्र्यसेनानी अशफाक उल्ला खान चौक" असे नामकरण करण्यात यावे, असा ठराव मा. महासभेसमोर मांडण्यात येत आहे.

**दिपीका अरोरा :-**

माझे अनुमोदन आहे.

**जय ठाकूर:-**

हमारे देश के पूर्व राष्ट्रपती मिसाईल मॅन जानेवाले अब्दुल कलामजी जीसके एन डी ऐ, भजपाने चुनके दिया था उन्होने टिपू सूलतानजी के लिए कहॉ था की इन्होने रॉकेट विज्ञान बनाया है उस रॉकेट विज्ञान की नकल अंग्रेजीने की थी दूसरे हमारे पूर्व राष्ट्रपती रामनाथ गोविंदजी उन्होने कहॉ था की टिपू सूलतान भारतीय एकता के प्रतिक है यह भाजपा के राष्ट्रपती रामनाथ गोविंदजी कह रहे है यही बात टिपू सूलतानजी के तारीफ में राष्ट्रपीता महात्मा गांधीजीने, सुभाषचंद्र बोसजीने काहॅ और हमारा संविधान में जहा महाराणी लक्ष्मीबाई की तसवीर है वही टिपू सूलतानजीकी तसवीर है और उनके विरता की गाथा है कर्नाटक के मुख्यमंत्री यदू रप्पाजी वो उनके जयंतीपे उसके तारीफ मे टोपी लगाके उसके जयंतीपे तारीफ के फूल बांधते थे जब १७९९ में अग्रेजो के विरूध्द यूध्द हूवा तब उनके पास दो विकल्प थे मृत्यू या आत्म समर्पण उन्होने मृत्यू को स्विकार किया इस देश मे माफी मांगणे वाले को वि कहॉ जाता हैऔर शहीद होने वाले को गद्दार कहॉ जाता है आज अगर नाम बदलने की बात कर रहे है तो उस वक्त हमारे देश के महापुरूष ने कहॉ क्या वो गलती थी जो हमारे संविधान में दर्ज हूवा वो गलती थी जो हमारे देश के पूर्व राट्रपतीने कहॉ क्या वो गलती थी अब मै मिरा भाईंदर के ठराव पे बात करूगा ३/१२/२०१६ प्रकरण क्र ९६ ठराव क्र.९७ इस ठराव में सुचक नरेंद्र मेहता है और अनुमोदक वर्षा भानुशाली उसके बाद २३/२/२०२१ प्रकरण क्र. २४ ठराव क्र. २३ त्यामध्ये महानगरपालिकेच्या नामकरणाबाबत पूर्वी घेतलेल्या निर्णयात पूनश्च बदल करण्यात येवू नये उस वक्त जितने भी नाम दिए गए थे छत्रपती शिवाजी महाराज चौक जर्नादन नारायण ऐसे बहोत सारे नाम दिए गए उसमे यह ठराव पास हूवा की अभी यह ठराव बदली नही होगा अगर वो ठराव पास हूवा उस ठराव के सुचक थे मा. महापौर डिपंल मेहता और अनुमोदक दिनेश जेन में यह समझना चाहता हूॅ की उस वक्त जो महासभा में ठराव पास हूवा २०२१ में जो ठराव पास हूवा२०१६ मे जो ठराव पास हूवा आज उसका नाम बदलने की बात हो रही है तो उस सभा का अवमानना है उस समज जो महापौर थी उनकी अमानना है अगर नही तो यह चौक इतनी देर से बहोत सारी यहॉ पे टॅक्स, खर्चे पे भैस हूई में यह भी जानना चाहूॅगा बार बार चौकका नाम बदला जा रहा है चौक बनाए जाऐगे उस वक्त जो डिसीजन लिए जाऐंगे तो उसका खर्चा कौन करेगा और यह नाम बदलने में कौनसी बात है जो नाम बदलने की आवश्यकता पडी आपकी किसी भी बात मे आपका बहूमत है आप ठराव लाऐगे पास हो जाएगा वह अलग मुद्दा है लेकीन मै आप लोगो से जानना चाहूॅगा की ऐसी क्य वजह थी जो नाम बदलने की जरूरत पडी और अगर मिरा भाईदर शहर की जनता उसका भी सम्मान है तो समान रूप से आपको पुरे तरीकेसे बोलना चाहिए

**भगवती शर्मा:-**

महापौर मॅडम सन्मा. सदस्यने २०१४ के ठराव का विवरण किया में एक चीज बता देना चाहता हूॅ सूचक कौन थे अनुमोदक कौन थे यह विषय प्रशासन द्वारा दिया गया था और उस समय में वॉर्ड क्र.३० लोढा कॉम्पलेक्स उस समय के नगरसेवकोने सार्व. बांधकाम को यह नामकरण देने का सूझाव दिया था महासभामें आके मंजूर हो गया था कोई भी नाम मंजूर हूवा आज हम उसे उद्देश से बोल रहे है हमारा कोई उद्देश नही है हम यह कहना चाहते है की उस समय महापुरूषोने जो वक्तव्य दिया था उनकी क्या गलती थी में इनको एक जानकारी देना चाहता हूॅ १३ ऑक्टोबर २०२२ को प्रशासकीय ठराव हूवा था उसमे संत ज्ञानेश्वर मावली भवन नामकरण हूवा था उपन्यास सम्राट मुन्शी प्रेमचंद भवन राजमाता जिजाऊ भवन हूवा था इन तीन नामोमें कूछ कमी नही है इनको पूरा देश नमन करता है लेकीन उस ठराव के अंदर में संत ज्ञानेश्वर मावली भवन ऐवजी संत ज्ञानेश्वर माऊली वारकरी भवन असा बदल

करायचा असून अनु.क्र. २९० जेष्ठ साहित्यिक कविवर्य हरिवंशराय बच्चन हिंदी भाषा भवन असा बदल करण्यास मा. प्रताप सरनाईक विधानसभा सदस्य हयांनी मागणी केलेली आहे. इसके अनुसार यह तीन नाम बदल दिए गए उपन्यास सम्राट मुन्शी प्रेमचंद उसकी जगह पे जेष्ठ साहित्यिक कविवर्य हरिवंशराय बच्चन क्या सम्राट मुन्शी के उपर कोई उंगली उठा सकता है बहोत बडे थे उसके जगह हरिवंशराय बच्चन लिया गया था में जानता है मुन्शी प्रेमचंद की गाथा कितनी बडी है राजमाता जिजाऊ भवन इसको भी बदल दिया गया उसके जगह नरवीर तानाजी मालसुरे मराठा भवन यह किया गया मेरा किसीपे आरोप प्रत्यारोप लगाने का उद्देश नही कही नाम उस ठराव का हवाला दे रहे है कई बार बदले गए है अलग अलग पक्ष द्वारा किए गए है इनको इस महासभा में मान्यता दि गई है आज जो हमारे सदस्यने नाम की सुचना दि है वो नाम भी एक स्वतंत्रता सेनानी था उन्होने इस देश के लिए कुर्बानी दि उसको भी हम कोटी कोटी नमन करते है इसलिए हमारे सदस्य द्वारा दिया गया नाम है उसमे कुछ भी कमी नही है

**रूबिना शेख :-**

महापौर मॅडम आज अच्छे अच्छे मुद्दे लाए गए उसपे डिस्कर्शन हूवा हमारे शहर में साडे तीन साल से लोकल बॉडी नही थी शहर में बहोत सारी तकलीफे है शहर में पाणी और सडक का मुद्दा है इतने सारे मुद्दे है फिर पहली महासभामें यह मुद्दा लाने का क्या मक्सद है यह मुझे अपने सिनियरसे समझना है तो आप खुलासा दे दो

**मा. महापौर :-**

उन्होने खुलासा दिया है अभी आपका विषय है आपको ठराव रखना है क्या ?

**अनिल सावंत :-**

नामकरणाचा ठराव आलेल आहे आमच्या सदस्यांनी विचारल्याप्रमाणे टिपू सूलतानजीचे नाव का बदलायचे त्याचे स्पष्टीकरण त्यांनी द्यायला पाहिजे. नाव का बदलू नये त्याचे स्पष्टीकरण द्यायला आम्ही तयार आहोत.

**भगवती शर्मा :-**

आम्ही महापौर मॅडमना उत्तर दिलेले आहे.

**मा. महापौर :-**

विषयामध्ये काय आहे सदर चौकाचे नाव बदलण्याबाबत विविध सामाजिक संघटना, संस्था व स्थानिक संस्था कडून लेखी विनंत्या प्राप्त झाल्या आहेत. म्हणून हे नामकरण करत आहोत.

**अनिल सावंत :-**

महासभेमध्ये एखाद्या महापुरूषाचे नाव सर्वानुमते दिले जाते त्यावेळी देखील बरेचसे अर्ज आलेले असतात.

**मा. महापौर :-**

बरेच नामकरण असेच होतात आतापर्यत जी नामकरण केली आहेत ती संघटनेच्या किंवा नागरिकांच्या माध्यमातून ज्यांनी चांगले काम केले आहे त्याप्रमाणे आपण करत असतो. सर्वाच्या मताने हे व्हायला पाहिजे.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम हा मुद्दा वेगळा आहे आपण ज्यावेळी नाव देतो त्यावेळी देखील बऱ्याच सामाजिक संस्था की हया महापुरुषाचे नाव दया त्या महापुरूषाचे नाव दया असे सांगत असतात. त्यानंतर जे प्रतिनिधी असतात ते प्रपोज करतात त्यानंतर विचार करून आपण नाव देतो. आता पुन्हा कोणती तरी संस्था येवून सांगते ते नाव बदला आपला स्टॅन्ड काय?

**मा. महापौर :-**

आता बरेच असे नामकरण झालेले आहे.

**हसमुख गेहलोत :-**

महापौर मॅडम जेव्हा भगवती शर्मा हयांनी जेव्हा स्पष्टीकरण दिले तेव्हा सावंत साहेब तुम्ही बाहेर गेले होते. का बदल केला त्याच्या अगोदर किती बदल केले. आपण भविष्यामध्ये कधी बदल करणार नाही असे सांगून त्यामध्ये देखील बदल केले आहेत. हमारे पंतप्रधान श्री. राजीव गांधी जो पहले रह चूके

**अनिल सावंत :-**

विषय काय आहे.

**हसमुख गेहलोत :-**

उदा. दे रहा हूँ दूसरा विषय ऐसा है स्वर्गीय बाळासाहेब ठाकरेजीने कहॉ था की मेरी पार्टी किसीमे विलीन हो जाऐगी तो मैं अपनी दुकान बंद कर दूंगा तीसरा विषय जीस कॉंग्रेस की आप बात कर रहे हो उस कॅाग्रेस पे गांधीजीने कहॉ था की कॉग्रेस की सत्ता आने की कोई जरूरत नही है अगर हमे आजादी मिलती है तो आज के बाद कॉग्रेस का पूरी तरह से २.४९ बंद कर देना चाहिए आपने उनकी भी बात नही मानी

(सभागृहात गोंधळ)

**जय ठाकूर :-**

मा महापौराच्या परवानगीने मैने टिपू सूलतान पे बात की थी मेरा एक भी विषय टिपू सूलतानसे हटके नही था मेरा सारा टॉपीक टिपू सूलतानसे रिलेटेड था टिपू सूलतान पे बात करीए

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

सर्वांनी बसून घ्या. अनिलजी आपका ठराव है तो रखो।

**आफरीन हुसेन :-**

डेप्यूटी मॅडम आय एम फस्ट टाईम इन हाऊस ॲन्ड आय ओर्नड आय रिस्पेक्ट एव्हरी टॉपीक डिसीजन ऑफ ११ ओ क्लोक आफ्टर वी सिटींग ऑन द फ्लोर इट फिल्स शेमफूल बीईग इन अ यूथ ॲन्ड कमिंग टू अ हाऊस वी देअर आर बीन इलेक्टेड पीपल सिनीयर पीपल ॲन्ड स्टील वी कमिंग इन द हाऊस ॲन्ड फायटींग फॉर अवर पीपल आऊटसाईड धीस हाऊस डझन्ट बीलॉंग कॉंग्रेस बीजेपी ॲन्ड एनी अदर पार्टी वी कम हीयर ॲन्ड स्पीक अवर पीपल टॉपीक कॅन बी ऐनीथींग बट एव्हरी टाईम रिलीजन थींग पूटींग अप अ नारा ऑफ जय श्री राम ऑर छत्रपती शिवाजी इव्हन वी सेड दॅट बट वी डू नॉट एनी डीस्क्रीमीनेशन इन धीज हाऊस आय शुल्ड से ऑन द टॉपीक ॲन्ड वी शूल्ड स्पिक ऑन द टॉपीक.

**अनिल विराणी :-**

हिंदी किंवा मराठीत बोलावे.

**हेतल परमार :-**

महापौर मॅडम आपकी परवनगीसे बात बोलना चाहती हूॅं यहॉ पे हर कोई पढा लिखा है पर यहॉ पे हिंदी और मराठीमे बात करनी चाहिए एज्यूकेशन का यहॉ पे कोई लेना देना नही है यहॉ हिंदी और मराठी मे बात किजीए इनको हिंदी मराठी नही आता है।

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

सर्वांनी खाली बसून घ्यावे.

(सभागृहात गोंधळ)

**आकांक्षा विरकर :-**

आपने जो इग्लिश में बात किया मिरा भाईंदरचे मराठी भाषेचा वापर करणे. भारतीय जनता पार्टी में एज्यूकेटेड पिपल है आपने इग्लिंश बात किया सबको समझ मे आता है पर आप मराठी में बात किजीए।

(सभागृहात गोंधळ)

**हेतल परमार :-**

मॅडम त्यांना माफी मागायला सांगा. आज पहिली महासभा आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सर्वांनी बसून घ्या. मॅडम तुम्ही काय बोलल्या.

**रुबीना शेख :-**

मैने सिर्फ यही बोला कूछ समझ नही आ रहा है।

**हसमूख गेहलोत :-**

महापौर मॅडम उस सदस्यने कुछ बोला नही है तो उस विषय को आगे नही बढाना चाहिए यह आपसे बिनंती है।

**अनिल सावंत:-**

प्रकरण क्र. १६, मिरारोड (पुर्व) वॉर्ड क्र. ०९ येथील हजरत टिपु सुलतान चौक नाव बदलणेबाबत वरील विषयास संबंधित मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनाने दिलेला गोषवारा सुस्पष्ट आहे की मा. महासभा दि. २३/०६/२०२१ ठराव क्र. २३ नुसार विविध रस्ते सार्वजनिक जागा यांचे नामकरण करण्यासाठी धोरण निश्चित करणे नुसार महासभेने मंजूरी देत महापालिकेच्या नामकरणाबाबत पूर्वी घेतल्या निर्णयात पुन:श्च बदल करण्यात येऊ नये असा सर्वानुमते ठराव पारित करण्यात आलेला आहे. त्यामुळे सदर नाव बदल्यास येऊ नये या उपर बदल करावयाचा असल्यास या चौकाला "श्री. छत्रपती शिवाजी महाराज" किंवा "भारतरत्न खान अब्दुल गफारखान" किंवा "परम वीर चक्र सन्मानित वीर हब्दुल हमीद" यांचे नाव देण्यात यावे असा मी ठराव मांडत आहे.

**जय ठाकूर :-**

माझे अनुमोदन आहे.

**महापालिका सचिव :-**

प्रकरण क्र. १६ वर दोन ठराव आले आहेत प्रथम सुचक अनिल सावंत हयांनी मांडलेला ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक संजय पवार हयांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर:-**

संजय पवार हयांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ७१ विरोधात १३ तटस्थ ० इतकी मते पडली आहेत संजय पवार हयांचा ठराव बहूमतानी मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १६ :-**

मिरारोड (पुर्व) वॉर्ड क्र. ०९ येथील हजरत टिपु सुलतान चौक नाव बदलणेबाबत.

**ठराव क्र. १६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध रस्ते, चौक व वास्तू यांचे नामकरण करण्याचे अंतिम अधिकार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची 'ड' मधील प्रकरण क्र. ११ (२) नुसार महानगरपालिकेस / मा. महासभेस प्रदान करण्यात आलेले आहेत.

मिरारोड (पूर्व) वॉर्ड क्र. ०९ येथील उड्डाणपुल ते लोढा पार्क रस्त्यावरील चौकास सध्या टिपु सुलतान यांचे नाव देण्यात आलेले आहे. सदर चौकाचे नाव बदलण्याबाबत विविध सामाजिक संघटना, संस्था व स्थानिक नागरिकांकडून लेखी विनंत्या प्राप्त झालेल्या आहेत.

त्या अनुषंगाने, देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात महत्त्वपूर्ण योगदान देणारे क्रांतिकारक अशफाक उल्ला खान यांच्या स्मरणार्थ सदर चौकास "स्वातंत्र्यसेनानी अशफाक उल्ला खान चौक" असे नामकरण करण्यात यावे, असा ठराव मा. महासभेसमोर मांडण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. संजय पवार        अनुमोदन :- श्रीम. दिपीका अरोरा**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | शर्मा मानशी रमेश | १ | सुनिल चंपालाल चौधरी | **निरंक** |
| २ | ॲड. श्रध्दा संदिप कदम | २ | रिजवाना अनवर खान | |
| ३ | तिवारी अशोक सुर्यदेव | ३ | सना खलील देशमुख | |
| ४ | पंकज पांडेय (दरोगा) | ४ | जय राजेंद्र ठाकूर | |
| ५ | मयेकर रजनीकांत पांडुरंग | ५ | तारेन वेंचर मेंडोन्सा | |
| ६ | गोहील शानू जोरावरसींग | ६ | शेख रुबिना फिरोज | |
| ७ | दत्ता जया रथीन | ७ | आयरिन पॉल कॉड्रस | |
| ८ | सिंह मदन उदितनारायण | ८ | अनिल दिवाकर सावंत | |
| ९ | दिव्या प्रसाद परब | ९ | रफिक गुलाब पठाण | |
| १० | योगिता सतीशचंद्र शर्मा | १० | आफरीन मुझफ्फर हुसेन सय्यद | |
| ११ | गणेश गोपाळ शेट्टी | ११ | सौ.रुबिना फैजूल्ला शेख | |
| १२ | तरुण सुभाष शर्मा | १२ | अशरफ अहमद मिस्त्री | |
| १३ | स्मिता विशाल पाटील | १३ | शॉन लिओ कोलासो | |
| १४ | प्रेमनाथ गजानन पाटील | | | |
| १५ | गुप्ता कुसुम संतोष | | | |
| १६ | पुरोहीत मधुसूदन मनोहरलाल | | | |
| १७ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| १८ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | | | |
| १९ | मेबल नोएल कोरीया | | | |
| २० | जैन सुनिता रमेश | | | |
| २१ | परेश जयंतीलाल शाह | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| २२ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | | |
| २३ | डॉ. भव्या पिपलिया (शाह) | | |
| २४ | आभा अमेय पाटील | | |
| २५ | ॲड. रवि व्यास | | |
| २६ | कोमल विठ्ठल नावन्धर | | |
| २७ | भगवती तुगनचंद शर्मा | | |
| २८ | सुरेश खंडेलवाल | | |
| २९ | महेश नरेश म्हात्रे | | |
| ३० | सावंत दिपक कल्याणराव | | |
| ३१ | करुणा किशोर पाटील | | |
| ३२ | डोंगरे सचिन सुरेश | | |
| ३३ | विशाल जगन्नाथ पाटील | | |
| ३४ | लक्ष्मण गणपत जंगम | | |
| ३५ | मेहता डिंपल विनोद | | |
| ३६ | स्नेहा शैलेश पांडे | | |
| ३७ | गेहलोत हसमुख मोहनलाल | | |
| ३८ | रुपाली शिंदे मोदी | | |
| ३९ | वैती विजया हेमचंद्र | | |
| ४० | जैन प्रिती चंद्रकांत | | |
| ४१ | थेराडे संजय अनंत | | |
| ४२ | ज्योत्सना जालींदर हसनाळे | | |
| ४३ | पारधी तुषार यशवंत | | |
| ४४ | यशोदा अनिल ताटे | | |
| ४५ | मोहन गोपाळ म्हात्रे | | |
| ४६ | सुरेखा प्रकाश सोनार | | |
| ४७ | मनस्वी प्रमोद पाटील | | |
| ४८ | मनिष प्रितम पराशर | | |
| ४९ | अनिता जयवंत पाटील | | |
| ५० | जाट प्रतिभा चंदु | | |
| ५१ | भावसार वंदना संजय | | |
| ५२ | नवीन गुप्तेश्वर सिंह | | |
| ५३ | आनंद दत्ताराम मांजरेकर | | |
| ५४ | अरोरा दिपीका पंकज | | |
| ५५ | बेलानी हेमा राजेश | | |
| ५६ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | |
| ५७ | निर्मला बाबुराव सावळे | | |
| ५८ | ॲड. मयुरी सचिन म्हात्रे | | |
| ५९ | विवेक महेंद्र उपाध्याय | | |
| ६० | परमार हेतल रतीलाल | | |
| ६१ | भट दिप्ती शेखर | | |
| ६२ | संजय बाळाजी पवार | | |
| ६३ | जैन दिनेश तेजराज | | |
| ६४ | कांबळी श्रध्दा सुधीर | | |
| ६५ | सिमा कमलेश शाह | | |
| ६६ | दुबे मनोज रामनारायण | | |
| ६७ | अनिल रवजीभाई विराणी | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ६८ | भानुशाली वर्षा गिरधर | | |
| ६९ | संजय वसंत थरथरे | | |
| ७० | भोईर जयेश भानुदास | | |
| ७१ | भोसले अनिल बाबुराव | | |

**ठराव बहूमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**महापालिका सचिव :-**

प्रकरण क्र १७, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील मौजे डोंगरी, तारोडी, चौक, पाली, उत्तन व मोर्वा या ०६ महसुली गावांसाठीच्या क्षेत्रासाठी "मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण" यांनी तयार केलेल्या मंजूर विकास योजनेमधील मौजे उत्तन येथील स.क्र. २४२पै., व इतर या जमीनीवरील आ.क्र.२० "कत्तलखाना" हे आरक्षण वगळणेच्या अनुषंगाने फेरबदल करणे.

**परेश शाह :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील ०६ गावासह बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रामधील ०२ गावाची एकत्रित विकास योजना MMRDA यांनी तयार करुन ती शासनास सादर केली असता सदर विकास योजना भागश: दि.१३/०५/२०१३ व तद्नंतर दि.०३/०६/२०१६ रोजी उर्वरित विकास योजना मंजूर केली असून त्यामध्ये मौजे उत्तन येथील स.क्र.२४२ व इतर या जागेवर आरक्षण क्र.२० "कत्तलखाना" (क्षेत्र ३६७३.०० चौ.मी.) प्रस्तावित करण्यात आले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे-उत्तन, पाली, चौक, तारोडी, डोंगरी व मोर्वा या ०६ गावांसाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेची "नियोजन प्राधिकरण" म्हणून नियुक्ती केली आहे. उक्त मंजूर विकास योजनेमध्ये मौजे उत्तन येथील स.क्र. २४२ पै., २८२पै., २८३अ पै., या जमिनीवर आरक्षण क्र. २० "कत्तलखाना" (आरक्षणाचे क्षेत्र ३६७३.०० चौ. मी.) प्रस्तावित असून सदरचे, आरक्षण अद्याप विकसीत झाले नसल्याने व त्याची आवश्यकता शहरातील नागरिकांना नाही.

सदरचे आरक्षण विकसित करणेकरीता १४५ व १४६ चे तत्कालिन विद्यमान आमदार यांनी सुमारे ५० कोटी रुपयांचा शासनाचा निधी मंजुर केला होता. सदरच्या कत्तलखाना आरक्षणाच्या विरोधात उत्तन व भाईंदर परिसरातील नागरिकांनी तीव्र विरोध दर्शविला होता तसेच तत्कालिन शिवसेनेचे माजी खासदार, राष्ट्रवादीचे माजी आमदार व भारतीय जनता पक्षाचे माजी आमदार यांनी आयुक्तांना भेटून सदर विषयाचे गांर्भिय, जनतेचा आक्रोष, नागरिकांच्या आंदोलनाची तयारी याची कल्पना दिल्यानंतर १४५ व १४६ चे तत्कालिन विद्यमान आमदार यांनी पत्र देऊन शासन निधी इतर कामांकडे वर्ग केला आहे.

मिरा भाईंदर शहरात सर्व जात, धर्म पंथाचे नागरिक राहत असून त्यांना कत्तलखान्याची आवश्यकता नाही व त्यास नागरिकांचा तीव्र विरोध आहे त्यामुळे मौजे उत्तन येथील स.क्र. २४२ पै., २८२पै., २८३अ पै., या जमिनीवरील मंजूर विकास योजनेमधील आरक्षण क्र. २० "कत्तलखाना" (आरक्षणाचे क्षेत्र ३६७३.०० चौ. मी.) हे प्रस्तावित आरक्षण रद्द करुन त्याऐवजी म्युनसिपल परपज (कत्तलखाना वगळून) असे आरक्षण प्रस्तावित करणेकामी उक्त अधिनियमातील कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यास ही सभा मान्यता देत असून, सदर फेरबदलाबाबत पुढील सर्व वैधानिक कार्यवाही करुन फेरबदल प्रस्ताव शासनास मंजूरीसाठी सादर करणेकामीची कार्यवाही महानगरपालिका आयुक्त यांनी करावी.

तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रासाठीची सुधारीत विकास योजना मंजूर करणेकरीता शासनाकडे प्रस्तावित आहे. त्यामधील प्रस्तावित कत्तलखान्याचे आरक्षण हे देखील वगळलेले आहे. सदर विकास योजनेमध्ये कोठेही कत्तलखानाचे आरक्षण प्रस्तावित करु नये याकरीता ही सभा मान्यता देत आहे.

**दिनेश जैन :-**

माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत:-**

महापौर मॅडम कत्तलखाना रद्द करण्याचा ठराव झालेला आहे त्याच्या विरोधात आमचा ठराव आहे. १५ लाखाची पॉप्यूलेशन आहे लंच टाईममध्ये नगरसेवक बोलले की आम्ही स्थानिक आहेत भूमीपूत्र आहेत आम्हाला नॉनवेज खायला परवानगी देण्यात यावी. शहरामध्ये कूठे तरी कत्तलखाना पाहिजे की नको.

(सभागृहात गोंधळ)

**अनिल सावंत:-**

शॉन कोलासो हयांनी "ज" चा प्रस्ताव मांडला होता धावगी येथे घनकचरा प्रकल्प तो उत्तनवासी सहन करतात त्याचा प्रस्ताव आलेला आहे तो करून टाका उत्तनवासी एवढी वर्षे सहन करतात.

**मा. उपमहापौर:-**

वेळ झालेली आहे ही मिटींग संपलेली आहे.

**मा. महापौर:-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे. उदया छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमीत्ताने कार्यक्रम आहे. अतिरिक्त आयुक्त मॅडम आपल्याला सर्व सदस्यांना आमंत्रण देत आहे.

**विजया वैती:-**

महापौर मॅडम सूचना आहे महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज हयांचा अश्वरूढ पूर्णकृती पूतळा उभारलेला आहे तिकडे भगवा नाही तो भगवा झेंडा लावण्यात यावा.

**मा. महापौर:-**

प्रशासनानी त्यांची नोंद घ्यायची आहे.

**अतिरिक्त आयुक्त:-**

सन्मा. सदस्य उदया छत्रपती शिवाजी महाराज हयांची जयंती आहे ती जयंती साजरी करणार आहोत त्याचा सकाळी ८.१५ वाजता आणि संध्याकाळी असे दोन कार्यक्रम आहेत सकाळी शिवाजी महाराज अश्वरूढ पूतळयास पूष्पहार मा. महापौराच्या हस्ते अर्पण करणार आहेत त्यानंतर काशिमिरा नाका येथील शिवाजी महाराजांच्या अश्वरूढ पूतळयास पुष्पहार अर्पण केला जाईल. तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूतळयास पूष्पहार अर्पण केला जाईल त्यानंतर मुख्यालयात कार्यक्रम आहे छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हयांच्या अर्धाकृती पूतळयाला आपण पूष्पहार अर्पण करणार आहोत तसेच दूसऱ्या मजल्यावर शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पूष्पहार अर्पण करणार आहोत तसेच संध्याकाळचा जो कार्यक्रम आहे तो ६.०० वाजता घोडबंदर किल्ला इथे आपण सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे. ह्या कार्यक्रमात पोवाडा शिव जन्मोत्सव असे कार्यक्रम आपण आखलेले आहेत तुमच्या वॉर्डमध्ये देखील काही कार्यक्रम असतील परंतू तूम्हाला विनंती आहे हा मनपाचा कार्यक्रम आहे आणि अडीज ते तीन तासाचा कार्यक्रम आपण ठेवलेला आहे त्यामूळे सर्वांना मा. महापौराच्या वतीने आणि मा. आयुक्तांच्या वतीने आग्रहाचे आमंत्रण आहे तर सर्वानी हया कार्यक्रमाला उपस्थित राहावे ही विनंती .

**प्रकरण क्र. १७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील मौजे डोंगरी, तारोडी, चौक, पाली, उत्तन व मोर्वा या ०६ महसुली गावांसाठीच्या क्षेत्रासाठी "मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण" यांनी तयार केलेल्या मंजूर विकास योजनेमधील मौजे उत्तन येथील स.क्र. २४२पै., व इतर या जमीनीवरील आ.क्र.२० "कत्तलखाना" हे आरक्षण वगळणेच्या अनुषंगाने फेरबदल करणे.

**ठराव क्र. १७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील ०६ गावासह बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रामधील ०२ गावाची एकत्रित विकास योजना MMRDA यांनी तयार करुन ती शासनास सादर केली असता सदर विकास योजना भागश: दि.१३/०५/२०१३ व तद्नंतर दि.०३/०६/२०१६ रोजी उर्वरित विकास योजना मंजूर केली असून त्यामध्ये मौजे उत्तन येथील स.क्र.२४२ व इतर या जागेवर आरक्षण क्र.२० "कत्तलखाना" (क्षेत्र ३६७३.०० चौ.मी.) प्रस्तावित करण्यात आले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे-उत्तन, पाली, चौक, तारोडी, डोंगरी व मोर्वा या ०६ गावांसाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेची "नियोजन प्राधिकरण" म्हणून नियुक्ती केली आहे. उक्त मंजूर विकास योजनेमध्ये मौजे उत्तन येथील स.क्र. २४२ पै., २८२पै., २८३अ पै., या जमिनीवर आरक्षण क्र. २० "कत्तलखाना" (आरक्षणाचे क्षेत्र ३६७३.०० चौ. मी.) प्रस्तावित असून सदरचे, आरक्षण अद्याप विकसीत झाले नसल्याने व त्याची आवश्यकता शहरातील नागरिकांना नाही.

सदरचे आरक्षण विकसित करणेकरीता १४५ व १४६ चे तत्कालिन विद्यमान आमदार यांनी सुमारे ५० कोटी रुपयांचा शासनाचा निधी मंजुर केला होता. सदरच्या कत्तलखाना आरक्षणाच्या विरोधात उत्तन व भाईंदर परिसरातील नागरिकांनी तीव्र विरोध दर्शविला होता तसेच तत्कालिन शिवसेनेचे माजी खासदार, राष्ट्रवादीचे माजी आमदार व भारतीय जनता पक्षाचे माजी आमदार यांनी आयुक्तांना भेटून सदर विषयाचे गांभिर्य, जनतेचा आक्रोष, नागरिकांच्या

आंदोलनाची तयारी याची कल्पना दिल्यानंतर १४५ व १४६ चे तत्कालिन विद्यमान आमदार यांनी पत्र देऊन शासन निधी इतर कामांकडे वर्ग केला आहे.

मिरा भाईंदर शहरात सर्व जात, धर्म पंथाचे नागरिक राहत असून त्यांना कत्तलखान्याची आवश्यकता नाही व त्यास नागरिकांचा तीव्र विरोध आहे त्यामुळे मौजे उत्तन येथील स.क्र. २४२ पै., २८२पै., २८३अ पै., या जमिनीवरील मंजूर विकास योजनेमधील आरक्षण क्र. २० "कत्तलखाना" (आरक्षणाचे क्षेत्र ३६७३.०० चौ. मी.) हे प्रस्तावित आरक्षण रद्द करुन त्याऐवजी म्युनसिपल परपज (कत्तलखाना वगळून) असे आरक्षण प्रस्तावित करणेकामी उक्त अधिनियमातील कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यास ही सभा मान्यता देत असून, सदर फेरबदलाबाबत पुढील सर्व वैधानिक कार्यवाही करुन फेरबदल प्रस्ताव शासनास मंजूरीसाठी सादर करणेकामीची कार्यवाही महानगरपालिका आयुक्त यांनी करावी.

तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रासाठीची सुधारीत विकास योजना मंजूर करणेकरीता शासनाकडे प्रस्तावित आहे. त्यामधील प्रस्तावित कत्तलखान्याचे आरक्षण हे देखील वगळलेले आहे. सदर विकास योजनेमध्ये कोठेही कत्तलखानाचे आरक्षण प्रस्तावित करु नये याकरीता ही सभा मान्यता देत आहे.

**सुचक :- श्री. परेश शाह अनुमोदन :- श्री. दिनेश जैन**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रशांत दळवी:-**

महाराष्ट्र राज्याच्या राजकारणात, प्रशासनात तसेच सर्वांगीण विकासाच्या विविध क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाचा अमीट ठसा उमटवणारे, तत्कालीन उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार हे राज्यातील कोट्यवधी जनतेसाठी प्रेरणास्थान राहिले आहेत. त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे राज्याच्या विकास प्रक्रियेला गती मिळाली असून, पायाभूत सुविधा, जलसंपदा, सिंचन, नगरविकास, कृषी व औद्योगिक प्रगती या क्षेत्रांत त्यांनी घेतलेले धाडसी व लोकहितकारी निर्णय महाराष्ट्राच्या विकास इतिहासातील महत्त्वपूर्ण टप्पे ठरले आहेत.

सामान्य नागरिकांच्या प्रश्नांबाबत असलेली त्यांची संवेदनशीलता, प्रशासनावर असलेली पकड आणि विकासाभिमुख धोरणांमुळे त्यांनी जनमानसात स्वतंत्र व सशक्त ओळख निर्माण केली आहे. सार्वजनिक जीवनात त्यांनी दिलेले योगदान हे केवळ राजकीय नव्हे तर सामाजिक बांधिलकीचे प्रतीक आहे.

स्व. अजितदादा पवार यांच्या या उल्लेखनीय कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे व त्यांच्या योगदान गौरव राखणे ही एक सार्वजनिक व सामाजिक जबाबदारी असल्याने मिरा-भाईंदर महानगरपालि मा. महासभेमार्फत हा शोक प्रस्ताव सादर करून, त्यांच्या कार्यास भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात आहे.

**भगवती शर्मा :-**

माझे अनुमोदन आहे.

**दु:खवटा ठराव क्र. १८ :-**

महाराष्ट्र राज्याच्या राजकारणात, प्रशासनात तसेच सर्वांगीण विकासाच्या विविध क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाचा अमीट ठसा उमटवणारे, तत्कालीन उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार हे राज्यातील कोट्यवधी जनतेसाठी प्रेरणास्थान राहिले आहेत. त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे राज्याच्या विकास प्रक्रियेला गती मिळाली असून, पायाभूत सुविधा, जलसंपदा, सिंचन, नगरविकास, कृषी व औद्योगिक प्रगती या क्षेत्रांत त्यांनी घेतलेले धाडसी व लोकहितकारी निर्णय महाराष्ट्राच्या विकास इतिहासातील महत्त्वपूर्ण टप्पे ठरले आहेत.

सामान्य नागरिकांच्या प्रश्नांबाबत असलेली त्यांची संवेदनशीलता, प्रशासनावर असलेली पकड आणि विकासाभिमुख धोरणांमुळे त्यांनी जनमानसात स्वतंत्र व सशक्त ओळख निर्माण केली आहे. सार्वजनिक जीवनात त्यांनी दिलेले योगदान हे केवळ राजकीय नव्हे तर सामाजिक बांधिलकीचे प्रतीक आहे.

स्व. अजितदादा पवार यांच्या या उल्लेखनीय कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे व त्यांच्या योगदान गौरव राखणे ही एक सार्वजनिक व सामाजिक जबाबदारी असल्याने मिरा-भाईंदर महानगरपालि मा. महासभेमार्फत हा शोक प्रस्ताव सादर करून, त्यांच्या कार्यास भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदन :- श्री. भगवती शर्मा**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**अनिल सावंत :-**

वटवृक्षाच्या छायेखाली झाडझुडपंच नव्हे तर गवतालाही उगवण्याची शामत नसते. राजकारणातील भीष्माचार्य शरदरावजी पवार यांच्या बोटाला धरून अजित दादांनी राजकारणात प्रवेश केला. अमिताभ बच्चन, लता मंगेशकर, सुनील गावस्कर ज्या घरात असतात त्यांच्या पुढच्या पिढीला स्वतःची ओळख निर्माण करणे अशक्यप्राय. अजितदादांनी हे नेहमीच अनुभवले परंतु स्वतःचे नेतृत्व पीठ उभे केले. फांदी फुटण्याची शक्यता असतानाच वृक्षाच्या मुळावर घाव घातला जावा तसे हे दादांच्या जाण्याने झाले. जे झाले ते अविश्वसनीय आणि दुर्दैवी. महाराष्ट्राच्या इतिहासात वीज मंडळ नफ्यात आले ते दादांमुळेच शेतकऱ्यांना गुमान वीज बिल भरा असे सांगणारे दादाच, कर्जमाफीची शेतकऱ्यांना आस असताना कर्ज फेडावे लागेल असे ठामपणे निवडणुकीच्या काळात सांगणारे दादाच मंत्रालयात सकाळी सातच्या ठोक्याला ते हजर असतात. विषयाचा अभ्यास आणि प्रशासनावर घट्ट पकड आणि स्पष्ट वक्तेपना यामुळेच कार्यकर्ते आणि अधिकारी दादांना वचकून असत. दादांचा कामाचा झपाटा जबरदस्त होता काम करण्याचे जणू त्यांना व्यसनच जडले होते

त्यांच्या मातोश्री हयात आहेत आपल्या अपत्याची अंतिम यात्रा पाहण्यापेक्षा अधिक दुःख त्या आईसाठी काय असेल. नेत्यांवर अपेक्षा लढणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी भले एक पक्षप्रमुख आणि उद्धार करता गेला असेल पण त्या आईस गोविंदाग्रज लिहून गेले त्याप्रमाणे दुर्दैव नगरच्या शिखरी विधवा दुःखी आई मांडीवर मेले मुल तो हृदया धक्का बसला राजहंस माझा निजला असे वाटेल कॉंग्रेस आणि शिवसेना यांची मीरा-भाईंदर विकास आघाडी परिवारातर्फे अजित दादांच्या आप्तेष्टांप्रती सहवेदना आणि दादांना भावपूर्ण श्रद्धांजली.

**जय ठाकुर :-**

माझे अनुमोदन आहे.

**दु:खवटा ठराव क्र. १९ :-**

वटवृक्षाच्या छायेखाली झाडझुडपंच नव्हे तर गवतालाही उगवण्याची शामत नसते. राजकारणातील भीष्माचार्य शरदरावजी पवार यांच्या बोटाला धरून अजित दादांनी राजकारणात प्रवेश केला. अमिताभ बच्चन, लता मंगेशकर, सुनील गावस्कर ज्या घरात असतात त्यांच्या पुढच्या पिढीला स्वतःची ओळख निर्माण करणे अशक्यप्राय. अजितदादांनी हे नेहमीच अनुभवले परंतु स्वतःचे नेतृत्व पीठ उभे केले. फांदी फुटण्याची शक्यता असतानाच वृक्षाच्या मुळावर घाव घातला जावा तसे हे दादांच्या जाण्याने झाले. जे झाले ते अविश्वसनीय आणि दुर्दैवी. महाराष्ट्राच्या इतिहासात वीज मंडळ नफ्यात आले ते दादांमुळेच शेतकऱ्यांना गुमान वीज बिल भरा असे सांगणारे दादाच, कर्जमाफीची शेतकऱ्यांना आस असताना कर्ज फेडावे लागेल असे ठामपणे निवडणुकीच्या काळात सांगणारे दादाच मंत्रालयात सकाळी सातच्या ठोक्याला ते हजर असतात. विषयाचा अभ्यास आणि प्रशासनावर घट्ट पकड आणि स्पष्ट वक्तेपना यामुळेच कार्यकर्ते आणि अधिकारी दादांना वचकून असत. दादांचा कामाचा झपाटा जबरदस्त होता काम करण्याचे जणू त्यांना व्यसनच जडले होते

त्यांच्या मातोश्री हयात आहेत आपल्या अपत्याची अंतिम यात्रा पाहण्यापेक्षा अधिक दुःख त्या आईसाठी काय असेल. नेत्यांवर अपेक्षा लढणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी भले एक पक्षप्रमुख आणि उद्धार करता गेला असेल पण त्या आईस गोविंदाग्रज लिहून गेले त्याप्रमाणे दुर्दैव नगरच्या शिखरी विधवा दुःखी आई मांडीवर मेले मुल तो हृदया धक्का बसला राजहंस माझा निजला असे वाटेल कॉंग्रेस आणि शिवसेना यांची मीरा-भाईंदर विकास आघाडी परिवारातर्फे अजित दादांच्या आप्तेष्टांप्रती सहवेदना आणि दादांना भावपूर्ण श्रद्धांजली.

**सुचक :- श्री. अनिल सावंत**　　　　**अनुमोदन :- श्री. जय ठाकुर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**अनिल सावंत :-**

मिरा रोडच्या विकासाचे शिल्पकार म्हणून ज्यांचे नाव सदैव अत्यंत आदराने घेतले जाते, असे मिरा रोडचे संस्थापक कै. सय्यद नझर हुसेन (जन्म: २४ ऑक्टोबर- निधनः २७ जून २०२४) रोजी झाला. कै. सैयद नजर हुसेन यांच्या दूरदृष्टी, चिकाटी आणि दृढनिश्चयामुळे मिरा रोडच्या सर्वांगीण विकासाची भक्कम पायाभरणी झाली. मिरारोडच्या विकासाची पाया भरणी त्यांनी हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या हस्ते केली यावरून त्यांची दूरदृष्टी दिसून येते. मिरारोडची त्यांनी केवळ भौतिक सुविधांची उभारणी केली नाही, तर सामाजिक सलोखा, एकात्मता आणि परस्पर विश्वासाची भक्कम वीण विणली.

अपार कष्ट, लोकसेवा, प्रामाणिकपणा आणि विकासाभिमुख कार्यपद्धती ही त्यांच्या जीवनकार्याची वैशिष्ट्ये होती. समाजहित हेच त्यांचे सर्वोच्च ध्येय राहिले आणि त्या ध्येयपूर्तीसाठी त्यांनी आयुष्यभर अथक परिश्रम घेतले.

त्यांनी दाखवलेला विकासाचा मार्ग आजही आपल्याला दिशा देत आहे आणि त्यांचा समृद्ध वारसा पुढील पिढ्यांसाठी दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक राहील.

या महासभेमार्फत आम्ही त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करीत आहोत.

**जय ठाकुर :-**

माझे अनुमोदन आहे.

**दु:खवटा ठराव क्र. २० :-**

मिरा रोडच्या विकासाचे शिल्पकार म्हणून ज्यांचे नाव सदैव अत्यंत आदराने घेतले जाते, असे मिरा रोडचे संस्थापक कै. सय्यद नझर हुसेन (जन्म: 24 ऑक्टोबर- निधनः 27 जून2024) रोजी झाला. कै. सैयद नजर हुसेन यांच्या दूरदृष्टी, चिकाटी आणि दृढनिश्चयामुळे मिरा रोडच्या सर्वांगीण विकासाची भक्कम पायाभरणी झाली. मिरारोडच्या विकासाची पाया भरणी त्यांनी हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या हस्ते केली यावरून त्यांची दूरदृष्टी दिसून येते. मिरारोडची त्यांनी केवळ भौतिक सुविधांची उभारणी केली नाही, तर सामाजिक सलोखा, एकात्मता आणि परस्पर विश्वासाची भक्कम वीण विणली.

अपार कष्ट, लोकसेवा, प्रामाणिकपणा आणि विकासाभिमुख कार्यपद्धती ही त्यांच्या जीवनकार्याची वैशिष्ट्ये होती. समाजहित हेच त्यांचे सर्वोच्च ध्येय राहिले आणि त्या ध्येयपूर्तीसाठी त्यांनी आयुष्यभर अथक परिश्रम घेतले.

त्यांनी दाखवलेला विकासाचा मार्ग आजही आपल्याला दिशा देत आहे आणि त्यांचा समृद्ध वारसा पुढील पिढ्यांसाठी दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक राहील.

या महासभेमार्फत आम्ही त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करीत आहोत.

**सुचक :- श्री. अनिल सावंत** **अनुमोदन :- श्री. जय ठाकुर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**जय ठाकुर :-**

सन्मानीय चंद्रदेव महादेव सिंघ यांचे देहावसान दि. १६/०८/२०२५ रोजी झाले. त्यांचा जन्म दि. ०२/०१/१९४४ रोजी झाला. मिरा भाईंदर शहराच्या विकासामध्ये त्यांचा महात्वाचा वाटा आहे. शेवटपर्यंत काँग्रेसी राहिलेले सिंग साब यांनी काँग्रेस पक्षामध्ये विविध पदे भूषवून पक्ष वाढीसाठी अपार कष्ट घेतले. शहर अध्यक्ष, ग्राम पंचायात सदस्य (१९८४), नगरसेवक, शिक्षण समिती सभापती, उत्तर भारतीय सेवा समाज, इत्यादी पदांवर काम करून त्यांनी शहराच्या विकासामध्ये त्यांनी प्रचंड हातभार लावला. महासभेतर्फे त्यांना भावपूर्ण आदरांजली.

**अनिल सावंत :-**

माझे अनुमोदन आहे.

**दु:खवटा ठराव क्र. २१ :-**

सन्मानीय चंद्रदेव महादेव सिंघ यांचे देहावसान दि. १६/०८/२०२५ रोजी झाले. त्यांचा जन्म दि. ०२/०१/१९४४ रोजी झाला. मिरा भाईंदर शहराच्या विकासामध्ये त्यांचा महात्वाचा वाटा आहे. शेवटपर्यंत काँग्रेसी राहिलेले सिंग साब यांनी काँग्रेस पक्षामध्ये विविध पदे भूषवून पक्ष वाढीसाठी अपार कष्ट घेतले. शहर अध्यक्ष, ग्राम पंचायात सदस्य (१९८४), नगरसेवक, शिक्षण समिती सभापती, उत्तर भारतीय सेवा समाज, इत्यादी पदांवर काम करून त्यांनी शहराच्या विकासामध्ये त्यांनी प्रचंड हातभार लावला. महासभेतर्फे त्यांना भावपूर्ण आदरांजली.

**सुचक :- श्री. जय ठाकुर अनुमोदन :- श्री. अनिल सावंत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**हेतल परमार :-**

फिल्म इंडस्ट्रीजचे नामांकित श्री. रामानंद सागरजी यांचे पुत्र आनंद रामानंद सागरजी यांचे निधन झाले आहे. मी मिरा भाईंदरच्या वतीने फिल्म इंडस्ट्रीजमधील रामानंद सागरजी यांच्या कुटूंबाचे सांत्वन करुन आनंद रामानंद सागरजी यांना भावपुर्ण श्रध्दांजली देत आहे.

**दिनेश जैन :-**

माझे अनुमोदन आहे.

**दु:खवटा ठराव क्र. २२ :-**

फिल्म इंडस्ट्रीजचे नामांकित श्री. रामानंद सागरजी यांचे पुत्र आनंद रामानंद सागरजी यांचे निधन झाले आहे. मी मिरा भाईंदरच्या वतीने फिल्म इंडस्ट्रीजमधील रामानंद सागरजी यांच्या कुटूंबाचे सांत्वन करुन आनंद रामानंद सागरजी यांना भावपुर्ण श्रध्दांजली देत आहे.

**सुचक :- श्रीम. हेतल परमार अनुमोदन :- श्री. दिनेश जैन**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**दिनेश जैन :-**

मिरारोड येथील शांतीनगर वसाहतीचे शिल्पकार, शांती स्टार बिल्डर श्री. आशिष रमेशचंद्र शाह यांचे हार्ट अटॅकने निधन झाले आहे. त्यांचा शोकप्रस्ताव मी मांडत आहे.

**हेतल परमार :-**

माझे अनुमोदन आहे.

**दु:खवटा ठराव क्र. २३ :-**

मिरारोड येथील शांतीनगर वसाहतीचे शिल्पकार, शांती स्टार बिल्डर श्री. आशिष रमेशचंद्र शाह यांचे हार्ट अटॅकने निधन झाले आहे. त्यांचा शोकप्रस्ताव मी मांडत आहे.

**सुचक :- श्री. दिनेश जैन अनुमोदन :- श्रीम. हेतल परमार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**शॉन कोलासो :-**

मिरा-भाईंदर शहराचे ज्येष्ठ नेते व माजी लोकप्रतिनिधी स्व. गिल्बर्ट जॉन मेंडॉसा यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करीत आहोत. दि. १८ ऑगस्ट २०२५ रोजी त्यांच्या निधनाने शहराने दूरदर्शी, अभ्यासू व जनतेशी नाळ जपणारा नेता गमावला. १९९० साली स्थापन झालेल्या मिरा-भाईंदर नगरपालिकेचे ते पहिले अध्यक्ष होते तसेच २००९ साली मिरा-भाईंदर विधानसभा मतदारसंघाचे पहिले आमदार म्हणून त्यांनी शहराच्या विकासाला दिशा दिली.

त्यांची समाजनिष्ठा, साधेपणा व लोकहितासाठीची तळमळ सदैव स्मरणात राहील. या महासभेतर्फे त्यांना विनम्र श्रद्धांजली अर्पण करून त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभावी, ही प्रार्थना व्यक्त करतो.

**अशरफ मिस्त्री :-**

माझे अनुमोदन आहे.

**दु:खवटा ठराव क्र. २४ :-**

मिरा-भाईंदर शहराचे ज्येष्ठ नेते व माजी लोकप्रतिनिधी स्व. गिल्बर्ट जॉन मेंडॉसा यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करीत आहोत. दि. १८ ऑगस्ट २०२५ रोजी त्यांच्या निधनाने शहराने दूरदर्शी, अभ्यासू व जनतेशी नाळ जपणारा नेता गमावला. १९९० साली स्थापन झालेल्या मिरा-भाईंदर नगरपालिकेचे ते पहिले अध्यक्ष होते तसेच २००९ साली मिरा-भाईंदर विधानसभा मतदारसंघाचे पहिले आमदार म्हणून त्यांनी शहराच्या विकासाला दिशा दिली.

त्यांची समाजनिष्ठा, साधेपणा व लोकहितासाठीची तळमळ सदैव स्मरणात राहील. या महासभेतर्फे त्यांना विनम्र श्रद्धांजली अर्पण करून त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभावी, ही प्रार्थना व्यक्त करतो.

**सुचक :- श्री. शॉन कोलासो** **अनुमोदन :- श्री. अशरफ मिस्त्री**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर:-**

उर्वरित विषयासाठी दि. २०/०२/२०२६ रोजी दूपारी ३.०० वाजता सभा घेण्यात येईल. आजची सभा तहकुब करण्यात येत आहे.

**(सभा तहकुब झाल्याची वेळ सायं. ७.०० वा.)**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(दिनेश कैलास कानगुडे)
**महापालिका सचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**